
# वृषाली जोशी

# चार्ल्स डिकन्स



## कथासंग्रह

# चार्ल्स डिकन्सच्या कथा

मूळ लेखक – चार्ल्स डिकन्स

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

## या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# चार्ल्स डिकन्सच्या कथा

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

**आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.**

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# चार्ल्स डिकन्सच्या कथा

लेखक : चार्ल्स डिकन्स

अनुवादिका: वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ११ मार्च २०२१

©esahity Pratishthan®2021

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

कथांचा क्रम

चार्ल्स डिकन्स

1. कुणाचीच नसलेली गोष्ट
2. खुनाच्या केसची सुनावणी
3. कच्च्या नातेसंबंधांची गोष्ट
4. शाळेत जाणाऱ्या मुलाची गोष्ट
5. डॉक्टर मेरीगोल्ड
6. मुगबाय जंक्शन

# चार्ल्स डिकन्स



चार्ल्स डिकन्स हा १८१२ मध्ये इंग्लंड मध्ये जन्मलेला व १८७० मध्ये मृत्यू पावलेला व्हिक्टोरियन काळातील मोठा कादंबरीकार व कथालेखक असून, त्याची ऑलिव्हर ट्विस्ट,

डेव्हीड कॉपरफिल्ड यासारखी पात्रे जगप्रसिद्ध झाली. A Tale Of Two Cities ही त्याची गाजलेली कादंबरी होय.

त्याच्या सहा गोष्टींचे भाषांतर या पुस्तकात केले आहे.

‘कुणाचीच नसलेली गोष्ट’ यात असे दाखवले आहे की सामान्य माणसाच्या गरजा / मते नेहमीच उपेक्षिली जातात व गरीबांचे जग कसे श्रीमंतांच्या खिसगणतीतही नसते. वर्गभेदावर आधारित अशा या गोष्टीत डिकन्स उपेक्षितांचे अंतरंग चितारतो.

‘खुनाच्या केसची सुनावणी’ ही एक अतींद्रिय शक्तीची अस्पष्टता व धूसरता पांघरलेली भीतीदायक गोष्ट आहे. खून करणारा संशयित माणूस गुन्हेगार म्हणून पकडला जाण्यासाठी, खून झालेल्याचे भूत, निवेदक असलेल्या ज्युरीचा सतत पिच्छा पुरवत असते.

‘कच्च्या नातेसंबंधांची गोष्ट’ यात मायकेल या गरीब व एकाकी कथानायकाला प्रेयसीने, मित्राने, काकाने, आवडत्या पुतण्याच्या आईने, फसवले आहे. तो गरीब असल्याने या सर्वांनी त्याची उपेक्षा केली आहे. यातून बाहेर पडण्यासाठी, तो त्याच्या कल्पनाशक्तीने त्याचे खरे नसलेले, पण त्याला हवेहवेसे वाटणारे चित्र उभे करतो.

डिकन्स स्वतः कधी शाळेत जाऊ शकला नाही. पण त्याच्या मुलांच्या शिक्षणातून, त्याला 'शाळेत जाणाऱ्या मुलाची गोष्ट' सुचली असावी. वर्गातील लहान व मोठ्या मुलांचे मजेशीर संबंध तो यातून रंगवतो. उदार मोठा मुलगा, चीजमन याच्याविरुद्धचे लहान मुलांचे गैरसमज व गुप्त, अप्रामाणिक बेत कसे फोल ठरतात, हे यात दाखवले आहे.

फिरता विक्रेता असणारा डॉक्टर मेरीगोल्ड उर्फ चीप जॅक याचे आयुष्य त्याने दत्तक घेतलेल्या एका मुक्या बहिऱ्या मुलीमुळे कसे बदलते, हे यात छान सांगितले आहे.

'मुगबाय जंक्शन' हे आठ गोष्टी असलेले पुस्तक असून, त्यातील ही एक गोष्ट आहे. हे सात रेल्वे लाईन्स एकमेकांना छेद देणारे काल्पनिक स्टेशन असून, जॅक्सन हा त्यातील कथानायक, मनाचा काही कौल मिळून, त्याचा दुःखी भूतकाळ विसरण्यासाठी तिथे उतरतो. त्याने पाहिलेले, ऐकलेले व अनुभवलेले प्रसंग यात येतात.

# Nobody's Story

# कुणाचीच नसलेली गोष्ट



एका मोठ्या, रुंद व खोल नदीच्या किनारी तो रहात होता. ती नदी नेहमीच समुद्राच्या दिशेने सुसाट धावत निघालेली होती. जगाच्या सुरवातीपासून ती उसळत होती. कधी तिने तिचे पात्र बदलून, ते कोरडे व उजाड पाडून, नवीन प्रवाह पत्करला. पण ती सतत वहात राहिली आणि जगाच्या अंतापर्यंत वहात राहील. तिच्या जोरदार अगम्य प्रवाहापुढे कोणाचे काही चालत नाही. जिवंत प्राणी नाहीत , फुले नाहीत, पाने नाहीत, सजीव वा निर्जीव

यापैकी कुणाचेही काहीही अवशेष नाहीत, तिच्यापुढे काहीच टिकत नाही. अज्ञात सागरापुढे काहीच टिकत नाही. पृथ्वी जशी सतत सूर्याभोवती फिरत असते, तसाच नदीचा खळाळता प्रवाह कशालाही न जुमानता सागराकडे झेपावत असतो.

तो गजबज असलेल्या गर्दीच्या ठिकाणी रहात असे आणि जगण्यासाठी खूप मेहनत करे. एखादा महीना काम न करता, त्याला पुरेसे श्रीमंत होण्याची काही आशा नव्हती. पण देवदयेने तो समाधानी होता. तो आनंदाने श्रम करे. त्याचे कुटुंब मोठे होते. त्याचे मुलगे व मुली रोज सकाळी उठल्यापासून, रात्री झोपेपर्यंत काम करून चरितार्थ चालवत. त्याचे नशीब असेच होते व तो याहून वेगळे काही शोधत नव्हता.

तो रहात असे, तिथे शेजारी खूप ढोलकी, तुतारी [रणशिंग] यांचे आवाज येत व भाषणबाजी चाले. पण त्याला त्याच्याशी काही कर्तव्य नसे. त्या शेजारच्या मोठ्या कुटुंबामध्ये खूप आरडाओरडा व गडबड गोंधळ चाले व अगणित गोष्टी घडत. त्याचे त्याला खूप आश्चर्य वाटे.

ते त्याच्या घरासमोर लोखंडी, संगमरवरी, ब्रॉंझचे व ब्रासचे पुतळे घडवत. घोड्यांच्या घाणेरड्या शेपट्या व पायांनी त्याच्या घरात अंधार येई. हे सर्व काय आहे, याचा विचार करून त्याला

नवल वाटे. त्याच्या विनोदी स्वभावाप्रमाणे तो हसून त्याच्या कामाकडे वळे.

त्या मोठ्या कुटुंबाने [तेथे सर्व उच्चभ्रू व गडबड करणारे लोक रहात.] त्याचा स्वतःबद्दल विचार करण्याचा, व स्वतः कसे वागायचे हे ठरवण्याचा त्रास वाचवला होता. तो म्हणाला, “खरे तर, माझ्या हातात वेळ खूप कमी असतो. मी आपल्या काउंटीचे जे पैसे भरतो, त्याबद्दल तुम्ही माझी काळजी [?] घेत असाल, तर ठीक आहे.” पण त्या मोठ्या कुटुंबाला पैशांचे काही पडलेले नव्हते. “तुम्हाला जास्त कळते, असे समजून मी सुटकेचा निःश्वास टाकून तुमचा उतराई होईन.” तो म्हणे. त्यामुळे ढोलकी, तुतारी [रणशिंग] यांचे आवाज व भाषणबाजी आणि घोड्यांचे कुरूप पुतळे, हे सर्व मोडून पडावे, यासाठी तो प्रार्थना करे.

रागावून व गोंधळून त्याची भुवई उचलत तो म्हणे, “मला हे काही समजत नाही. पण कदाचित मी जाणून घेऊ शकलो, तर त्याला नक्कीच अर्थ असणार.”

तो काय बोलला, त्यातील काही भागावर संशय घेत, ते मोठे कुटुंब बोलले, “याचा अर्थ जितके गुण उर्फ पैसे जास्त, तितकी किर्ती आणि मान जास्त मिळतो.”

तो “ओहो” म्हणाला व ते ऐकून विचार करू लागला.

पण जेव्हा त्याने लोखंडाचे, संगमरवरी, ब्रॉंझचे व ब्रासचे पुतळे पाहिले, तेव्हा त्याला समजेना, की त्याच्या देशातील गुणवान, एके काळच्या लोकर व्यापाऱ्याचे वारस असणारे वारविकशायरचे किंवा काहीशा तशाच प्रकारचे लोक, असे कसे काय वागू शकतात? या गोंधळाच्या भयंकर रोगट प्रकारापासून त्याला व त्याच्या मुलाबाळांना ज्यांचे ज्ञान वाचवू शकेल, अशी कोणीच माणसे त्याला सापडली नाहीत. ज्यांच्या धीटपणाने त्याच्या पूर्वजांना कुळे म्हणून राबावे लागले व ज्यांच्या वेगळ्या शहाणपणामुळे ज्यांनी थक्क करून टाकणारे बरेच काम केले अशा अत्यंत नम्र लोकांना जगण्याची नवीन उंची मिळाली. काही चांगले नसलेले लोक त्याला सापडले व काही तर अगदी वाईट असलेले.

तो म्हणाला, “जाऊ दे. मला काहीच कळत नाही.”

म्हणून तो घरी गेला व शेकोटीजवळ बसून मनातील विचार काढून टाकायचा प्रयत्न करू लागला.

त्याची शेकोटीशेजारील जागा काळ्या रस्त्यांनी वेढलेली व सुनसान होती. पण त्याच्यासाठी ती मूल्यवान जागा होती. त्याच्या बायकोचे हात कष्टाच्या कामांमुळे कडक झाले होते. ती लवकर म्हातारी झाली होती. पण त्याची ती आवडती होती.

सकस अन्नाच्या अभावी त्याच्या मुलांची वाढ खुंटली होती. पण त्याला ती मुले सुंदर दिसत. सर्व गोष्टींपेक्षा या माणसाची अगदी मनापासूनची इच्छा होती, की त्याच्या मुलांनी शिकावे. “जरी मी कधी ज्ञान मिळवण्याचा रस्ता चुकलो असेन, तरी त्यांनी चांगले शिकावे. मी केलेल्या चुका सुधाराव्यात. पुस्तकातील आनंदाचे व ज्ञानाचे पीक मला घेता आले नसले, तरी तरी त्याना ते घेणे सोपे जावे.”

पण या माणसाच्या मुलांना कायद्याची भाषा शिकवण्यासाठी, शेजारील मोठ्या कुटुंबात भांडणे व मारामारी सुरु झाली. कुटुंबातील काही लोक ठासून म्हणाले, की इतर कशाहीपेक्षा अशा गोष्टी मुलभूत स्वरूपाच्या असून त्या करणे आवश्यक आहे. तर मोठ्या कुटुंबातील काहीजणांनी पत्रके लिहिली, परिषद भरवली, दंड आकारला, तोंडी बोलून बघितले. खूप गोष्टी करून बघितल्या. एकमेकांना ख्रिश्चन कोर्टात खेचले. चिखलफेक केली. धक्काबुक्की केली. मूर्खासारखे एकमेकांवर कोसळून पडले. दरम्यान संध्याकाळी शेकोटीशेजारी बसून, या माणसाने तिथे चाललेली राक्षसी कृत्ये पाहिली. मुलांना जवळ बोलावून त्याने पाहिले, तर त्याची मुलगी मनावर मोठे ओझे असल्यासारखी वागत होती आणि मुलगा त्याची मौजमजा हरवून, दुष्ट गुन्हेगारी प्रवृत्तीचा बनू लागला होता. मुलांमधील

बुद्धीमत्ता, लबाडी व संशयात बदलतांना बघून तो शेजाऱ्याना मूर्ख ठरवायची इच्छा करू लागला.

तो बोलला, ‘हे काय होते आहे, ते मला काही समजत नाही. पण हे सर्व चुकीचे वाटते आहे. नाही. माझ्या डोक्यावर असलेल्या ढगांमधील स्वर्गाला अनुसरून मी या अन्यायाविरुद्ध आवाज उठवतो.”

परत शांत होऊन, [तो स्वभावाने दयाळू असल्यामुळे, त्याचा राग सहसा तात्पुरता असे] त्याने त्याच्या सुट्टीकडे, रविवारकडे पाहिल्यावर त्याच्या लक्षात आले, की हे किती एकसुरी व दमवणारे आहे. आणि त्यामुळे त्याच्या विनाशाच्या गाडीबरोबर त्याला किती नशा चढते आहे. मग त्याने त्या मोठ्या कुटुंबाला विनंती करत म्हटले, “आम्ही कामकरी लोक आहोत आणि मला झगमगता संशय आहे की कुठल्याही स्थितीतील कामकरी लोक तुमच्याहीपेक्षा अधिक बुद्धिवादी लोकांकडून, मला समजते त्याप्रमाणे मनाला उभारी देणाऱ्या व उल्हसित करणाऱ्या गोष्टीसाठी तरसलेले असतात. आता आम्हाला जेव्हा ते मिळत नाही, तेव्हा काय होत असेल ते बघा. चला. मला त्रास न देता माझे मनोरंजन करा. मला काही छानसे दाखवून माझी सोडवणूक करा.”

पण या बोलण्याकडे दुर्लक्ष करून, मोठे कुटुंब त्यांची वागणूक तशीच चालू ठेवते. जगातील काही आश्चर्ये, निर्मितीची थोरवी, काळाबरोबरचे ठळक बदल, निसर्गचक्र व सुंदर कलाविष्कार दाखवण्यासाठी, जेव्हा काही आवाज हळूवारपणे ऐकू येतात, तेव्हा त्याला हे दिसण्यासाठी, म्हणजेच त्याच्या आयुष्यातील कुठल्याही काळात तो ते बघू शकावा, म्हणून ते केले जातात. आरडाओरडा, वेडेवाकडे बोलणे, लेखी तक्रारी, धापा टाकणे, चाचरत बोलणे, स्मरण करणे, नावाने हाका मारणे, चिखलफेक करणे, 'मी असे करू धजत नाही', 'मी असे करेन यावर थांबून रहाणे' आणि 'संसदेतील गोंधळासारखी क्षीण प्रश्नोत्तरे चालवणे', हे सर्व काही मोठ्या कुटुंबात चालू होते. रानटीपणे आजूबाजूला बघताना, त्याला बिचाऱ्याला भीतीने धक्का बसत होता.

त्याच्या घाबरलेल्या कानांवर हात ठेवत, तो म्हणाला, "मी या सर्वाला कारणीभूत आहे का? निव्वळ माझ्या कौटुंबिक अनुभवातून उद्भवलेल्या, निष्पापतेने केलेल्या विनंतीला व स्वतःचे डोळे उघडे ठेवायच्या सामान्यज्ञानाला मग काय अर्थ राहीला? मला समजत नाही. गोष्टी अशा थराला आणून काय उपयोग आहे!"

तो त्याच्या कामावर ओणवा होऊन, नेहमी स्वतःला प्रश्न विचारत असे. कामगारांमध्ये प्लेगची साथ आल्याची बातमी सगळीकडे पसरू लागली आणि हजारोंनी ते मरू लागले. याचा शोध घेतांना, त्याला ते खरे असल्याचे समजले. जवळील तंबूत मेलेल्यांना व मरणाऱ्यांना एकत्र ठेवत होते. त्यातून त्याचे जीवन चालले होते. नेहमी अंधारी, व प्रदूषित वातावरणात नवीन विष उकलले जात होते. दणकट आणि कमकुवत, म्हातारे आणि वयाने लहान, आई आणि वडील, सगळ्यांना सारखीच बाधा होत होती.

त्याच्याकडे पळून जायचे काय साधन होते? तो होता, तिथेच राहिला. त्याची प्रिय माणसे त्याने मरतांना पाहिली. त्याला दिलासा देण्यासाठी, एक दयाळू धर्मोपदेशक त्याच्याकडे आला. पण तो उत्तरला,

“अरे धर्मोपदेशका, तू मला काय मदत करणार, माझ्या भावना गोठून, माझा आनंद दुःखात बदलणाऱ्या या कठोर जागी माणसांना रहावे लागत आहे. माझ्या उरलेल्या मोजक्या दिवसातील प्रत्येक मिनिट म्हणजे ज्या ढिगाखाली मी चिरडतो आहे, अशी दलदल आहे. मला माझे पहीले स्वर्गातील क्षण, द्या, त्यातील थोडासा प्रकाश व हवा द्या, मला शुद्ध पाणी द्या, मला

स्वच्छ होण्यास मदत करा. आमचा हुरूप नष्ट करणारे, आम्हाला बेपर्वा व भावनाशून्य करणारे हे जड वातावरण व ओझे झालेले आयुष्य, आम्हाला नको. आमच्यातील मरणाऱ्यांना दयाळूपणे अलगद उचलून तुम्ही नेलेत. जिथे आम्हाला या भयानक बदलांची व त्यांच्या पवित्रतेची ओळख झाली, अशा लहानशा खोलीबाहेर नेणारे तुम्ही सर्वात चांगले शिक्षक आहात. तुम्हाला गरीबांचा कळवळा आहे. सगळ्या प्रकारच्या मानवी दुःखाबद्दल तुम्हाला आस्था आहे, म्हणून मग मी अगदी स्वेच्छेने तुमचे ऐकेन.''

मग तो परत कामावर रुजू झाला. काळे कपडे घातलेला त्याचा मालक येऊन त्याच्याशेजारी उभा राहीला, तेव्हा तो एकाकी आणि उदास होता. मालकालाही बराच त्रास झाला होता. त्याची सुंदर, चांगली, तरुण बायको एकुलते एक मूल त्या साथीने ओढून नेले होते.

``मालक, हे सहन करायला कठीण आहे, हे मला माहिती आहे. पण धीर धरा. मला जमल्यास मी तुम्हाला धीर देतो.''

त्यच्या सहृदयतेबद्दल मालकाने आभार मानले व बोलला, ``ओहो, तुम्ही कामगार लोक! तुमच्यापासून संकट सुरु झाले. जर

तुम्ही आधीच तंदुरुस्तीने व चांगले राहिला असता, तर मी विधुर झालो नसतो आणि आजच्यासारखा शोक करत बसलो नसतो.”

तो मान हलवत म्हणाला, “हे जसे आले, तशी बहुतेक संकटे आमच्यामुळे येतात, हे मला समजू लागले आहे. आणि कोणीच आमची पर्वा करणार नाही. क्षुल्लक कारणांमुळे एकमेकांपासून दूर न जाता, आम्ही एकजुटीने राहिलो, तर आम्ही योग्य गोष्टी करू शकू. जोपर्यंत आमचे वरिष्ठ आम्हाला आमच्या गरजा नीट भागतील एवढे पैसे देत नाहीत, तोपर्यंत आम्ही तंदुरुस्तीने व चांगले राहू शकत नाही. त्यांनी शिकवल्याशिवाय आम्हाला समजू शकत नाही. खरे पहाता, जे आमची व्यवस्था बघतात, ते आम्हाला पुरवठा करतात. त्यांनी आम्हाला शिकवल्याशिवाय आम्हाला कळणे शक्य नाही. आम्हाला बुद्धिवादी विचार करता येत नाही. त्यामुळे त्यातून आम्ही आमचे मनोरंजन करु शकत नाही. त्यांनी आमचे मनोरंजन केल्याशिवाय, आम्हाला ते मिळू शकत नाही. आम्ही आमचे काही चुकीचे देव घेऊन बसतो. ते मात्र त्यांचे देव सर्व सार्वजनिक ठिकाणी बसवतात. अपूर्ण सूचना दिल्यामुळे, दुर्लक्ष केल्यामुळे व मानवी मौजमजेला नाकारल्यामुळे, त्याचे वाईट दुष्परिणाम होतात. हे सर्व आमच्याबाबतीत होईल. मात्र आमच्यापाशी संपणार नाही. ते

खूप लांब, दूरवर पसरेल. ते नेहमीच तसे होते व पूर्वीही झालेले आहे. प्लेगसारखेच! शेवटी मला वाटते, मला सर्व कळले.”

पण मालक परत म्हणाला, “ओहो, तुम्ही कामगार मंडळी! काहीतरी त्रासाशिवाय तुमचा आमचा संबंध येतोच कुठे!”

तो म्हणाला, “मी क्षुद्र आहे व माझा तुमचा संबंध येत नसेल [कदाचित तशी तुमची इच्छाही नसेल.] तो फक्त काही संकटातच येत असेल. पण हे माझ्यापासून कधीच सुरु झाले नाही. माझ्याबरोबर संपणारही नाही. मरण येणार, हे नक्की. ते मला येणार व माझ्यापुढेही कोणाला तरी येणार.”

तो बोलला, त्यात खूपच तथ्य होते. त्या मोठ्या कुटुंबाला त्या साथीचा वारा लागला होता. त्यामुळे ते लोक फार घाबरून गेले होते. सर्व प्रसंगी, मानवतावादी दृष्टीकोनातून, प्लेग वा अन्य एखादा रोग रोखण्यासाठी आवश्यक त्या योग्य गोष्टी करण्यासाठी, ते मोठे कुटुंब त्याच्याशी जुळवून घ्यायचा विचार करत होते. पण लवकरच त्यांची भीती नाहीशी होऊ लागली. मग ते परत त्यांच्या कुटुंबामध्येच दंग झाले व ते त्याच्यासाठी काही करेनात. त्यामुळे चाबूक परत आला --- पूर्वीप्रमाणेच फारसा तीव्र नव्हता --- पण लवकरच सूडभावनेने पेटला. परत त्या कुटुंबाचा गडबडगोंधळ व आरडाओरडा सुरु झाला. मात्र याचा त्याला

काय त्रास होतो, याची थोडीसुद्धा दखल घ्यायला, त्यांच्यापैकी कोणी तयार नव्हते.

त्यामुळे फार जुन्या पद्धतीने कुणी जगले वा मेले नाही. तर अशी ही एकंदरीत कुणाचीच गोष्ट नाही.

त्याला नाव नाही. तुम्ही विचारले कुठे? कदाचित ते लेगीऑन असेल. त्याचे नाव काय होते, याला फारसे महत्व नाही. आपण त्याला लेगीऑन म्हणू.

जर तुम्ही कधी वॉटरलूजवळील बेल्जियन गावांमध्ये गेला असतात, तर तुम्हाला हे दिसले असते. एखाद्या शांत चर्चमध्ये, संस्मरणीय दिवशी कर्नल अ, मेजर ब, कॅप्टन क, ख, ग; लेफ्टनंट फ, ह; ऑफिसर्स ळ, क्ष, ज्ञ आणि एकशे तीस सैनिक यांच्यासाठी व देशासाठी विश्वासू असे ध्वज उभारलेले दिसले असते. ही कुणाचीच नसलेली गोष्ट सौरमालिकेतील पृथ्वीचे स्थान व तिची मूळ घटना याची गोष्ट आहे. लढाईतील त्यांचा वाटा ते उचलतात. विजयात त्यांचा सहभाग असतो. ते पडतात. त्यांचे नाव रहात नाही. फक्त प्रेत रहाते. त्यांना सजवून, उच्चभ्रू लोकांच्या धुळकट रस्त्याने नेले जाते. ओहो! या ख्रिसमसला आपण त्यांची आठवण काढू. आतषबाजीच्या लखलखाटात त्याचे विस्मरण व्हायला नको.

# The Trial For Murder
# खुनाच्या केसची सुनावणी



माझ्या हे लक्षात आले आहे, की बुद्धिमान आणि सुसंस्कृत माणसांचे मानसशास्त्रीय अनुभव जेव्हा विचित्र प्रकारचे असतात, तेव्हा ते सांगायला त्यांच्या अंगी धैर्याची गरज असते. ऐकणाऱ्याच्या मनावर त्याचा काय परिणाम होईल, ते

आपल्याला हसतील का, याची त्यांना भीती वाटत असते. समुद्रसापासारखा विचित्र खरा प्राणी पाहिलेला प्रवासी, त्याबद्दल सांगायला घाबरत नाही. पण तोच प्रवासी भविष्यातील त्याला चाहूल लागलेली काही घटना, आडाखे, स्वप्ने, एखाद्याचे अनपेक्षित असे विचित्र वर्तन किंवा काही उल्लेखनीय मानसिक आंदोलने सांगायला खूप आढेवेढे घेतो.

सहसा आपण आपले असे नेमक्या स्वरूपाचे नसलेले अनुभव, दुसऱ्याला सांगत नाही. परिणामस्वरूपी, अशा वेगळ्या प्रकारच्या अनुभवांचा साठा, विचित्र व अपूर्ण असल्यासारखा वाटतो आणि तो खरेच तसा असतो.

मी आता जे काही सांगणार आहे, त्यासाठी मला आधारभूत किंवा विरोधात्मक उपपत्तीची गरज नाही. मला बर्लिनच्या एका पुस्तकविक्रेत्याचा इतिहास माहिती आहे, सर डेव्हिड ब्रुस्टरने सांगितलेली एका कैलासवासी भविष्यवेत्त्याच्या बायकोची केस माहिती आहे आणि माझ्या मित्रमंडळींमध्ये घडलेल्या दृष्टीभ्रमाची केस मला अगदी इत्यंभूत माहिती आहे. या शेवटच्या केसमधील त्रास झालेली बाई माझ्या दूरच्या नात्यातीलदेखील नव्हती. डोक्यातील चुकीचे गृहीतक माझ्या स्वतःच्या केसमधील काही भागाचे स्पष्टीकरण मागू शकेल --- पण फक्त काही बूड नसलेल्या

भागाचे! माझ्यात वंशपरंपरेने आलेल्या काही गुणविशेषांशी त्याचा तसा काही संबंध नाही. मला पूर्वी असा काही अनुभव आलेला नाही.

इंग्लंडमध्ये लक्ष वेधून घेणारे, असे किती खून किती वर्षांपूर्वी झाले, त्याचे एवढे काही नाही. एकामागून एक घडलेल्या भयंकर दुष्ट अशा कित्येक खुनांबद्दल आपण ऐकलेले आहे. पण मी या खुनाची आठवण पुसून टाकू शकलो असतो, तर मी नक्की पुसून टाकली असती. न्यूगेट तुरुंगात ते प्रेत जेव्हा पुरले गेले, तेव्हा मी मुद्दाम गुन्हेगाराची काही व्यक्तिगत ओळख दिली नाही.

जेव्हा पहिल्यांदा खुनाचा शोध लागला, तेव्हा कुणावर संशय घेतला गेला नाही --- किंवा मला असे म्हटले पाहिजे, कारण मी माझ्या बोलण्यात फार नेमकेपणा आणू शकत नाही. की ज्याची नंतर कोर्टात उलट तपासणी सुरु झाली, त्या अमुक माणसावर संशय आहे --- असे कुठेच जाहीर झाले नाही. त्यावेळेस वर्तमानपत्रातदेखील त्याच्यावर काही संशय घेतल्याचे छापले गेले नाही. त्यामुळे त्याच्यासंबंधी काही माहिती छापली जाणे शक्य नव्हते. ही महत्वाची गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे.

माझ्या न्याहारीच्या वेळी सकाळी वर्तमानपत्र उलगडतांना, मला पहिल्यांदा याचा शोध लागला व मला ते खूप रुचीपूर्ण

वाटले. मी ते लक्ष देऊन वाचले. मी ते तीनदा नाही, तरी दोनदा वाचले. झोपायच्या खोलीत हा शोध लागला. आणि हे जेव्हा छापून आले, तेव्हा माझ्या मनात एक घटनासाखळी --- किंवा त्याला काय म्हणावे कुणास ठाऊक --- पण चमकून गेली. मी त्याचे वर्णन समाधानकारक शब्दात करू शकणार नाही. त्यात मला असे पाहिल्यासारखे वाटले, की माझ्या उठाबसायच्या खोलीतून जाऊन लागणाऱ्या झोपायच्या खोलीत एका वाहत्या नदीचे अशक्य चित्र काढले होते. जरी तात्पुरते त्यातून जातांना, असे स्पष्ट होत होते, इतके स्पष्ट होत होते, की मी सुटकेचा निःश्वास टाकत पलंगावर प्रेत नसल्याची खात्री केली.

मला अशी जाणीव झाली, ती काही मोठी अद्भुतरम्य जागा नव्हती. ती सेंट जेम्स रस्त्याच्या कोपऱ्यावरील पिकॅडेली भागात होती. ती मला सर्वस्वी नवीन होती. मी त्यावेळी आरामखुर्चीत बसलो होतो. मला शहारे येऊन, ती जाणीव झाली. हे लक्षात घ्या, की आरामखुर्ची तिथे सहज हलत होती. [खोलीला दोन खिडक्या होत्या आणि खोली दुसऱ्या मजल्यावर होती.] खाली पिकॅडेली भागातील हलणाऱ्या वस्तूंवर नजर फिरवून माझे डोळे ताजेतवाने करण्यासाठी, मी एका खिडकीजवळ गेलो. ती हिवाळ्यातील एक तेजस्वी सकाळ होती. रस्ता आनंदी दिसत

होता व चमकत होता. वारा जोरात वहात होता. मी बाहेर पाहिले, तेव्हा माझी नजर बागेतून खाली पडलेल्या पानांच्या ढिगाऱ्यावर स्थिर झाली. तो ढीग जोराच्या वाऱ्याने उडून गोलगोल फिरत होता. पाने उडाल्यावर मी पलीकडील बाजूला एकामागे एक अशी चालणारी दोन माणसे पाहिली. ती पश्चिमेकडून पूर्वेकडे चालली होती. पुढचा माणूस त्याच्या खांद्यावरून सतत मागे बघत होता. दुसरा त्याच्या मागोमाग साधारण तीस पाऊलांवर त्याचा उजवा हात काही धोका असल्यासारखा खुणेने उंच करत चालला होता.

लोकांच्या गर्दीत त्याचे असे धमकी दिल्यासारखे विचित्र हावभाव, माझे लक्ष वेधून घेण्यास कारणीभूत ठरले. पुढची अजून उल्लेखनीय परिस्थिती म्हणजे, कोणी त्याच्याकडे लक्ष देत नव्हते. पदपथावरून चालतांना, ते दोघे गर्दीतून सहजतेने मार्गक्रमणा करत होते. कोणीही त्याना जागा देत नव्हते, स्पर्श करत नव्हते किंवा त्यांच्याकडे बघत नव्हते. माझ्या खिडकीवरून जाण्यापूर्वी, त्यांनी माझ्याकडे बघितले. मी त्यांचे चेहरे अगदी ठळकपणे पाहिले. मला समजले, की मी त्याना कधीही ओळखू शकेन. मला त्यांच्यापैकी कुणाच्याही चेहऱ्यात काही खास आढळले असे नव्हे, पण फक्त पुढे चाललेला माणूस फारच

वाकलेला होता. आणि मागून चालणाऱ्या माणसाचा रंग अशुद्ध मेणासारखा होता.

मी बिनलग्नाचा माणूस आहे. माझा नोकर आणि त्याची बायको एवढीच माझी माणसे आहेत. मी एका बँकेच्या शाखेत काम करतो. विभागप्रमुख म्हणून माझ्या जबाबदाऱ्या तशा हलक्या स्वरूपाच्या आहेत. त्या हिवाळ्यात मी शहरात होतो व मला काही बदलाची गरज होती. मी आजारी नव्हतो पण बराही नव्हतो. मी माझ्या एकसुरी आयुष्यामुळे उदास झालो होतो. मला थोडे अपचनही झाले होते. माझ्या नावाजलेल्या डॉक्टरांच्या मते, माझ्या तब्येतीची अवस्था फार बळकट असे वर्णन करण्यासारखी नव्हती. मी विनंती केल्यावरून, त्यानी मला तसे लिहून दिले होते.

खुनाची परिस्थिती हळूहळू समजून येत होती. लोकांच्या मनात असे पक्के होत गेले, की मी त्याना माझ्यापासून दूर ठेवतो आहे. जगाच्या उद्दीपित मानसिकतेबद्दल मला फारच थोडे माहिती होते. पण मला माहिती होते, की संशयित खुन्यावर त्याच्या इच्छेने त्याने खून केल्याचे सिद्ध झाले आहे आणि त्याला न्यूगेट येथील कोर्टात सुनावणीसाठी बोलावले आहे. सर्वसाधारण पूर्वग्रह आणि बचावाच्या तयारीला वेळ देण्यासाठी, मध्यवर्ती गुन्हेगारी कोर्टात ही सुनावणी पुढे ढकलली गेल्याचेही मला

माहिती होते. मला पुढे हेदेखील माहिती झाले असते, पण झाले नाही, की पुढची तारीख साधारण केव्हा पडणार आहे.

माझी बैठकीची खोली, झोपायची खोली व कपडे बदलायची खोली एकाच मजल्यावर आहेत. शेवटची खोली बंदिस्त असून तिथे जाण्यासाठी झोपायच्या खोलीतूनच जावे लागते. त्यात मध्ये दार आहे, हे खरे आहे. एकदा जिन्यात गेल्यावर, माझ्या बाथरूमचे काही बांधकाम त्याला आडवे असे काही वर्षे चालले होते. त्यावेळी त्याचाच एक भाग म्हणून, तिथे दार ठोकले गेले आणि त्याला ताडपत्री बसवली गेली.

एका रात्री उशीरा मी माझ्या झोपायच्या खोलीत उभा होतो. माझा नोकर झोपायला जाण्यापूर्वी मी त्याला काही सूचना देत होतो. कपडे बदलायच्या खोलीच्या एकमेव दाराकडे माझे तोंड होते व ते बंद होते. माझ्या नोकराची दाराकडे पाठ होती. मी त्याच्याशी बोलत असतांना, मी ते उघडलेले पाहिले. त्यातून एक माणूस डोकावला. तो अगदी प्रामाणिकपणे व चमत्कारीकपणे माझ्याकडे हातवारे करत बघत होता. पिकॅडेली भागातील रस्त्याने पहिल्या माणसाच्या मागून चालणारा, तो माणूस होता. अशुद्ध मेणासारखा त्याच्या चेहऱ्याचा रंग होता.

ती आकृती हातवारे करत मागे सरकली. तिने दार लावून घेतले. मी झोपायची खोली ओलांडून जातो न जातो तोच, मी कपडे बदलायच्या खोलीचे दार उघडले व आत पाहिले. माझ्या हातात पेटलेली मेणबत्ती होती. मला ती आकृती तिथे दिसण्याची अपेक्षा नव्हती व ती दिसलीही नाही.

माझा नोकर जागरूकपणे आश्चर्यचकित झाला. मी त्याच्याकडे वळून म्हणालो, “डेरिक, तुझा विश्वास बसेल का, की मी आता इथे काही पाहिले --- “ मी माझा हात डेरिकच्या छातीवर ठेवला तेव्हा अचानक तो भयंकर रीत्या थरथरला व म्हणाला, “अरे देवा, हो, सर! एक मृत माणूस तिथे आहे.”

आता माझा विश्वास बसत नाही, की जॉन डेरिक या माझ्या विश्वासू व माझ्याकडे वीसपेक्षा जास्त वर्षे असलेला नोकराला मी स्पर्श केला तेव्हा त्याला काय वाटले असेल, याची मलाही कल्पना नव्हती, की मी अचानक अशी आकृती बघेन. डेरिकमध्ये इतका नवलपूर्ण बदल झाला की मी जेव्हा त्याला स्पर्श केला, तेव्हा तो त्या क्षणी काही अमानवी, गूढ पाहिल्यासारखा दचकला.

मी जॉन डेरिकला ब्रँडी आणायला सांगितली आणि त्याला थोडी दिली. मी देखील आनंदाने थोडी घेतली. आधीच्या रात्री काय घडले, त्याबद्दल मी त्याच्याशी अवाक्षर बोललो नाही.

त्याबद्दल विचार करता माझी खात्री होती, की मी पिकॅडेली भागात एका प्रसंगी तो चेहरा पाहिला पण त्यापूर्वी तो चेहरा मी कधी पाहिला नव्हता. मी खिडकीशी उभा असतांना माझ्याकडे बघणारा व आता मला दारातून डोकावताना दिसलेला माणूस हा एकच असल्याचे माझी स्मरणशक्ती सांगत होती. मी त्याला तोच तो असल्याचे ओळखले होते.

मी रात्री अस्वस्थ होतो. माझी खात्री होती, तरी ते स्पष्ट करणे अवघड होते. ती आकृती परत आली नसती. दिवसा मला झोपेने घेरले. पण जॉन डेरिकला हातात वर्तमानपत्र घेऊन आलेले पाहिल्यावर, मी जागा झालो.

असे वाटले की ते वर्तमानपत्र, म्हणजे त्याचा मालक आणि माझा नोकर यांच्यातील मोठ्याने घातलेला वाद होता. त्यात मला पुढील सुनावणीसाठी मध्यवर्ती गुन्हेगार कोर्टात हजर रहाण्याचा आदेश होता. यापूर्वी मला असे कोर्टात हजर रहाण्याचा अजिबात अनुभव नसल्याचे जॉन डेरिकला माहिती होते. त्याचा विश्वास होता --- काही कारणाने की असाच, ते मला त्यावेळेस माहिती

नव्हते. ज्युरींच्या मंडळाने सवयीप्रमाणे, माझ्यापेक्षा कमी शिक्षण असलेल्याला निवडले होते आणि प्रथम त्याने ते मान्य करून, कोर्टात हजर रहाण्याचे नाकारले होते. ते आणणाऱ्या माणसाने ते अगदी मामुली असल्यासारखे थंडपणे घेतले होते. तो म्हणाला की माझे हजर रहाणे वा न रहाणे, याचे त्याला काही देणेघेणे नाही. मी त्या गंभीर व धोकादायक गोष्टीचे काय करावे, हा त्याचा नव्हे तर माझा प्रश्न होता.

हे बोलावणे घ्यावे की नाही, याबद्दल एकदोन दिवस माझा निर्णय होत नव्हता. त्या गूढ गोष्टीबद्दल मला परिणाम किंवा रुची याची जराही जाणीव नव्हती, याबद्दल मी अगदी ठाम होतो. शेवटी, माझ्या नीरस आयुष्यात काही बदल होईल, असे म्हणून मी जायचे ठरवले. माझा कोर्टात जायचा दिवस नोव्हेंबरमधील एक गार सकाळ होती. पिकॅडेली भागात दाट तपकिरी धुके पडले होते. पूर्वेकडे ते छळ केल्यासारखे काळे पडत चालले होते. कोर्टाचे जिने व पॅसेज मला उजेडाने गच्च भरल्यासारखे वाटत होते. कोर्टही तसेच होते. मला वाटते, ऑफिसर माणसांनी मला कोर्टाच्या आत घेतल्यापासून मला तिथे बरीच गर्दी दिसत होती, पण त्या दिवशी खुन्याची सुनावणी असल्याचे, मला माहिती नव्हते. मला वाटते मी कोर्टात शिरेपर्यंत, मला दोनपैकी कुठल्या

कोर्टात आणले आहे, हे मला माहिती नव्हते. पण हे काही चांगले लक्षण म्हणून घ्यायला नको. कारण मनातून मी कुठल्याच गोष्टीबद्दल पूर्ण समाधानी नव्हतो.

मी माझी जागा घेतली व कोर्टात सर्वत्र पाहिले. धुक्याच्या ढगातून श्वास घेणे जड जात होते. काळी वाफ एखाद्या अंधारी पडद्यासारखी मोठ्या खिडक्यांबाहेर तरंगत होती. वाळलेल्या गवतावरील गाड्यांची चाके घसपटल्याचा आवाज, लोकांच्या गर्दीचे आवाज, त्याच्या शिट्ट्या वा गाण्यांचे आवाज हे सगळे त्यात मिसळून हवेचे प्रदूषण वाढले होते. थोड्याच वेळात दोन जज्जनी आत येऊन त्यांची जागा घेतली. कोर्टात शांतता पसरली. खुन्याला पिंजऱ्यात आणायचा आदेश देण्यात आला. तो आला. लगेचच मला तो पिकॅडेली भागात मी पाहिलेल्या दोन माणसातील पहिला असल्याचे समजले.

जर माझे नाव पुकारले गेले असते, तर मी ऐकू जाईल अशा आवाजात, काय उत्तर दिले असते कुणास ठाऊक! पण यादीत ते सहावे की आठवे होते. त्या वेळेपर्यंत मी बोलू शकलो. आता असे बघा, मी इथे पाऊल ठेवल्याबरोबर, लक्षपूर्वक आस्थेने बघणारा कैदी खूप दात ओठ खात रागावला आणि वकीलसाहेबांकडे बघून हातवारे करू लागला. मला आव्हान

देण्याची त्याची इच्छा स्पष्टपणे दिसत होती. मग तो थांबला तेव्हा वकील त्याच्या पक्षकाराशी काही कुजबुजला व मान हलवली. नंतर मला त्या वकीलाकडून कळले, की तो कैद्याला असे म्हणाला होता, “काही झाले तरी त्या माणसाला आव्हान दे.” पण तो त्याचे काही कारण देऊ शकला नाही. त्याने कबूल केले, की पुकारले जाईपर्यंत माझे नावदेखील त्याला माहिती नव्हते.

दोघांनी आधीच स्पष्ट केले होते, की मी त्या कैद्याच्या स्मरणशक्तीला मुद्दाम ताण देऊ नये.

आणि त्याच्या लांबलेल्या सुनावणीतील इत्यंभूत माहिती माझ्या सांगण्याने पुन्हा सांगणे गरजेची होऊ देऊ नये. मी फक्त ज्युरी एकत्र असण्याच्या दहा दिवसरात्रींचे माझे माझ्या स्वतःच्या चौकस व्यक्तिगत अनुभवाला साजेसे म्हणणे सांगेन. ते खुन्याच्या नव्हे तर वाचकांच्या उत्कंठाशमनासाठी सांगतो आहे. न्यूगेट कॅलेंडरकडे मी लक्ष वेधत नाही.

मी ज्युरींचा मुख्य म्हणून नेमला गेलो. सुनावणीच्या दुसऱ्या दिवशी सकाळी, पुरावे ऐकल्यावर दोन तासांनी, मी चर्चच्या घड्याळाचे टोले ऐकले.] माझे डोळे ज्युरीतील सर्व लोकांवर फिरले. मला त्यांना मोजायला फारच कष्ट पडले. मी खूप वेळा

मोजले, तरी तोच त्रास राहिला. थोडक्यात, मी त्यांना एक ते अनेक समजलो.

माझ्यानंतर असलेल्या ज्युरीतील सभासदाला मी स्पर्श केला आणि त्याला म्हणालो, “कृपया आपली संख्या मोजा.” माझी विनंती ऐकून त्याला नवल वाटले. डोके वळवून तो मोजू लागला. अचानक तो बोलला, “का? आपण ते --- रा, पण नाही हे शक्य नाही, बाराजण आहोत.”

त्या दिवशीच्या माझ्या मोजण्याप्रमाणे, खोलात जाऊन मोजल्यास आम्ही बरोबर होतो. पण एकंदरीत काही घोटाळा होता. तिथे काही कुणाची आकृती --- छाया नव्हती. पण आता मला भविष्यातील एका आकृतीचे अंतरिक पुसट दृष्य खात्रीने दिसू लागले.

लंडनच्या हॉटेलमध्ये ज्युरी बसलेले होते. एका मोठ्या खोलीत वेगवेगळ्या पलंगांवर आम्ही झोपलो. आम्हाला सुरक्षित ठेवणाऱ्या ऑफिसरची आमच्यावर सतत नजर होती. त्या ऑफिसरचे खरे नाव चोरून ठेवायचे काही कारण मला दिसत नाही. तो बुद्धिमान, खूप नम्र व दयाळू होता. [मला हे ऐकून आनंद झाला.] त्याला शहरात मोठा मान होता. त्याचे तिथे असणे आम्हाला मान्य होते. त्याचे डोळे चांगले, मिशा हेवा

करण्यासारख्या काळया व आवाज घंटानाद केल्यासारखा होता. त्याचे नाव मिस्टर हर्कर होते.

रात्री जेव्हा आम्ही आमच्या बारा अंथरुणात शिरलो, तेव्हा मिस्टर हर्करचा पलंग दरवाज्याजवळ ओढण्यात आला. दुसऱ्या दिवशी रात्री, तो आडवे पडायला तयार नव्हता. त्याला अंथरुणावर बसलेले पाहून, मी जाऊन त्याच्याशेजारी बसलो. त्याला मी चिमूटभर तंबाखू दिली. ती घेतांना त्याने त्याच्या हाताने मला स्पर्श केला,

तेव्हा त्याच्या अंगावर शहारा आला. तो बोलला, “हे काय आहे?”

मिस्टर हर्करच्या नजरेचा वेध घेऊन व खोलीत नजर टाकून मला अपेक्षित असलेली आकृती दिसली --- ती पिकॅडेली भागातील दुसऱ्या माणसाची होती. मी उठून चार पाऊले टाकली. मग थांबलो आणि भोवताली मिस्टर हर्करकडे पाहिले. तो निर्विकार होता. तो हसतहसत चांगल्या आवाजात बोलला, “क्षणभर मला वाटले, आपल्यात पलंग नसलेला तेरावा ज्युरीचा माणूस आहे. पण तो चंद्रप्रकाश होता.”

मिस्टर हर्करकडे गुपित उघड न करता, मी त्याला खोलीतल्या खोलीत थोडे फिरण्यासाठी आमंत्रित केले आणि मी आकृतीवर लक्ष ठेऊ लागलो. ती माझ्या अकरा सहकाऱ्यांच्या उशीजवळ काही क्षण उभी राहिली. ती नेहमी पलंगाच्या उजव्या बाजूस गेली. आणि नेहमी पायाच्या बाजूने ओलांडून, पुढील पलंगाकडे गेली. तिच्या डोक्याच्या हालचालीवरून असे दिसत होते, की तिला खाली वाकून प्रत्येक झोपलेल्या व्यक्तीचे नीट निरीक्षण करायचे होते. त्या आकृतीला माझी वा माझ्या पलंगाची चाहूल लागली नाही. माझा पलंग मिस्टर हर्करच्या पलंगाशेजारी होता. एका उंच खिडकीतून चंद्रप्रकाश आत येत होता, तेथून ती आकृती जणू हवेतून जिना चढल्यासारखी बाहेर गेली.

दुसऱ्या दिवशी न्याहारीच्या वेळी, असे दिसले, की मी व मिस्टर हर्कर सोडून, प्रत्येकाने काल रात्री खुनी माणसाचे स्वप्न पाहिले होते. आता मला असे खात्रीने वाटू लागले, की पिकॅडेली भागात चालणाऱ्या दोन माणसांपैकी [बहुधा] दुसऱ्या माणसाचा खून झाला होता. त्याने लगेच दिलेल्या जबानीमुळे मला असे आकलन झाले. पण यासाठी मी तयार नसतांना, हे अचानक झाले.

सुनावणीच्या पाचव्या दिवशी, जेव्हा उलट तपासणी पूर्ण होत आली, तेव्हा मृत मनुष्य त्याच्या झोपायच्या खोलीतून बेपत्ता असल्याचा शोध लागल्यापासून, आणि नंतर खुनी माणूस खणत असलेल्या ठिकाणी ते प्रेत लपवून ठेवलेले आढळल्यापर्यंतचे, सर्व पुरावे सादर करून झाले. ओळख परेडमध्ये साक्षीदाराने खुन्याला ओळखले, तेव्हा त्याला ज्युरींकडे निर्णयासाठी सोपवण्यात आले. काळा गाऊन घातलेला ऑफिसर वाट काढत महत्वाचा असलेला लॉकेटचा पुरावा घेऊन माझ्याकडे येत होता, तेव्हा पिकॅडेली भागात चालणाऱ्या दुसऱ्या माणसाची छोटी आकृती अचानक गर्दीतून येताना ऑफिसरला दिसली. त्याने स्वतःच्या हाताने मला त्या व्यक्तीचे छोटे चित्र असलेले लॉकेट दिले व मी त्या गळयातील लॉकेटमधील छोट्या आकृतीकडे बघण्यापूर्वी खालच्या आवाजात ती आकृती म्हणाली, “मी तेव्हा तरुण होतो आणि तेव्हा माझा चेहरा रक्ताने भरलेला नव्हता.” ते ज्युरीतील माझ्या भावांकडून पुढच्याकडे जात जात शेवटी माझ्याकडे आले. पण त्यांच्यापैकी कुणालाच तो त्या खून झालेल्या माणसाचा चेहरा असल्याचे कळले नाही.

सहसा आम्ही जेव्हा मिस्टर हर्करच्या ताब्यात असू, तेव्हा टेबलावर आम्ही पहिल्यांदा अर्थात दिवसाच्या कामावर भरपूर

चर्चा करत असू. पाचव्या दिवशी उलटतपासणी बंद झाल्यावर आमच्यासमोर तो प्रश्न पूर्ण स्वरूपात उभा ठाकला. आता आमची चर्चा जास्त उद्दीपित स्वरूपाची आणि गंभीर होत होती. आमच्यापैकी एकजण चर्चमधील कार्यालयातील असून, तो फारच मूर्ख होता. त्याला अगदी पुढीलमागील हरकतींसकट सरळसरळ पुरावा मिळाला. पण तो चर्चमधील तीन जाड्या लोकांनी बाजूला सारला. ते जणू त्यांनी केलेल्या पाचशे खुनांची रदबदली करण्यासाठी आल्यासारखे वाटत होते. जेव्हा ते थट्टेखोर मूर्ख मध्यरात्री अती गोंधळ घालत होते, तेव्हा आमच्यापैकी काहीजण झोपायच्या तयारीत होते. मला परत खून झालेला मनुष्य दिसला. तो गंभीरपणे माझ्याकडे बघत, त्यांच्यामागे उभा होता. मी त्यांच्याकडे गेलो व त्यांच्या बोलण्यात सामील झालो, तेव्हा ताबडतोब तो निघून गेला. ही त्याची आमच्या मोठ्या खोलीत वेगळ्या प्रकारे प्रकट होण्याची सुरवात होती. जेव्हा आमची बारा ज्युरींची मोट बांधली जायची, तेव्हा मला त्यांच्यात खून झालेल्या माणसाचे डोके दिसायचे. जेव्हा त्यांच्यात काही कागदांची देवाणघेवाण चाले, तेव्हा तो फक्त मलाच न चुकता निवडत असे.

सुनावणीच्या पाचव्या दिवशी जेव्हा त्याची छोटी आकृती प्रकट झाली, तेव्हा हे लक्षात घेतले पाहिजे की मी ती कोर्टात कधी पाहिली नव्हती, आम्ही बचावासाठी कोर्टात उतरलो, तेव्हा तीन बदल घडून आले. दुसरे दोन मी एकदम स्पष्ट करतो पण पहिला म्हणजे, ती आकृती आता सतत कोर्टात होती. पण ती स्वतःहून माझ्याशी कधी बोलली नाही. पण त्यावेळी जो कुणी बोलत असेल त्याच्याशी बोलली. उदाहरणार्थ खून झालेल्याचा गळा सरळ चिरला गेला होता. बचावाचे सुरवातीचे भाषण करतांना असे सुचवले गेले, की खून झालेल्याने स्वतःच ते केले असावे. त्याच क्षणी त्या आकृतीने भयंकर परिस्थिती निर्माण केली [हे त्या आकृतीने पूर्वी लपवले होते.] व ती बोलणाऱ्याच्या कोपरावर जाऊन बसली. त्याच्या श्वासनलिकेच्या इकडे तिकडे फिरत डाव्या उजव्या हातात सुरा घेत, जोरजोरात असे सुचवू लागली, की अशी स्वतच स्वतःला कुठल्याही हाताने जखम करून घेणे शक्य नाही. दुसऱ्या एका प्रसंगी, साक्षीदार म्हणून एक बाई जेव्हा कैदी मित्रत्वाने वागणारा असल्याचे सांगू लागली, तेव्हा ती आकृती खऱ्या मनुष्यासारखी भयानक जोराने कैद्यावर धावून गेली. त्याच क्षणी ती आकृती तिच्यासमोर, खुन्याचा पूर्ण चेहरा निरखत जमिनीवर उभी राहिली. हात उगारून व बोट ताणून. कैद्याचे पाप दाखवू लागली.

तिसऱ्या बदलाने माझ्यावर वेगळाच व जास्त परिणाम केला. तो काय होता, ते मी स्पष्टपणे सांगतो. पण त्याची काही उपपत्ती तयार करत नाही. तरी ती ज्यांना सांगितली गेली, त्याना ती समजली, असे नाही. उलट त्यांना त्यामुळे भीती वा काळजी वाटली. मला असे वाटले, की ते मला माहिती नसलेल्या व मी दुसऱ्यांना त्याचे स्पष्टीकरण देऊ शकत नसलेल्या कायद्याने, सांगितले गेले नसते, तरीही त्याने काही अदृष्यपणे, मूकपणे त्यांच्या मनावर गडद सावली पसरवली असती. जेव्हा बचाव करणाऱ्या प्रमुख मंडळाने सुचवले की आत्महत्येची गृहीतके आणि त्या आकृतीने सुशिक्षित माणसांच्या कोपरावर बसून भीतीदायक पद्धतीने, त्याने त्याचा स्वतःचा गळा कापणे शक्य नसल्याचे सांगितले, हे नाकारणे शक्य नव्हते. त्यामुळे भाषणातील जोर गमावलेले मंडळ काही क्षण गडबडून गेले. त्याच्या बुद्धिमान भाषणातील सलगता गेली. त्याने रुमालाने कपाळावरील घाम पुसला व एकदम पांढरा पडला. जेव्हा साक्षीदार समोर आली, तेव्हा तिचे डोळे खात्रीपूर्वक काही दर्शवणाऱ्या बोटाच्या दिशेने बघत होते. कैद्याच्या चेहऱ्यावर त्रास आणि अनिश्चितता होती. अजून दोन उदाहरणे देतो. सुनावणीच्या आठव्या दिवशी, दुपारच्या नेहमीच्या काही मिनिटांच्या सुट्टीनंतर, जज्ज येण्यापूर्वी मी इतर ज्युरींबरोबर कोर्टात परत आलो.

पिंजऱ्यात उभे राहून, मी विचार केला, माझे डोळे गॅलरीच्या दिशेने उचलेपर्यंत, तिथे आकृती नव्हती. पण तिथे ती मला पुढे वाकून उभी असलेली दिसली. जसे काही तिला जज्ज येऊन बसले की नाही, याची खात्री करायची असल्याप्रमाणे, ती एका सभ्य बाईकडे चालली होती. नंतर लगेच ती बाई किंचाळली, चक्कर येऊन पडली व तिला बाहेर नेले गेले.

मोठ्या मानाने, शहाणपणे व शांतपणे सुनावणी ऐकणारा जज्ज आला. जेव्हा केस संपली, तेव्हा तो त्याच्यापुढील कागद चाळू लागला. खून झालेला मनुष्य, म्हणजे त्याची आकृती, जज्जच्या दरवाज्याने आली. जज्जच्या टेबलाशी गेली आणि त्याच्या खांद्यावरून तो उलटत असलेल्या कागदांकडे पाहू लागली. जज्जच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. त्याचा हात थांबला. मला चांगली माहिती असलेली थरथर त्याच्या अंगावर उमटली. गळून गेल्यासारखा तो म्हणाला, "लोकहो, माफ करा. वाईट हवेमुळे मी काही वेळ त्रासल्यासारखा झालो होतो"

पेलाभर पाणी प्यायल्यावर तो ठीक झाला.

त्या न संपणाऱ्या दहा दिवसांपैकी सहा त्याच त्याच प्रकारच्या दिवसात --- तेच जज्ज आणि तेच बाकावर बसलेले लोक, तोच तो पिंजऱ्यातील खुनी, टेबलावरील तेच वकील,

छताला भिडणाऱ्या आवाजातील त्याच सुरात विचारलेले प्रश्न आणि उत्तरे, जज्जच्या पेनाची तीच कुरकुर, आतबाहेर करणारे तेच लोक, दिवसाचा नैसर्गिक प्रकाश असून, ठराविक वेळी लावलेले तेच दिवे, खिडकीबाहेरील तेच धुक्याने वेढलेले पडदे, तडतड वाजणारे तेच पावसाचे पाणी, दिवसामागून दिवस वाळूवर उमटणारी कैद्यांची तीच ती पाऊले, जड दारे उघडल्याचा व लावल्याचा तोच तो आवाज --- कंटाळवाणे सगळे तेच ते एकसुरी! मी खूप मोठा काळ ज्युरी सदस्य असल्याचे मला वाटू लागले. पिकॅडेली आणि पुरातन बॅबिलॉन मला सारखेच वाटू लागले. खून झालेला माणूस ठळकपणे माझ्या डोळ्यात राहिला. इतर कुणाहीपेक्षा त्याच्या खुणा कधीच पुसट झाल्या नाहीत. खरे तर मी हे सांगायला पाहिजे, की मी एकदाही खून झालेला माणूस खुनी माणसाकडे कसा बघत होता, ते पाहिले नाही. मला पुन्हा पुन्हा नवल वाटले, 'तो कसा काय आला नाही?' पण तो कधीच आला नाही. त्याने माझ्याकडे पाहिलेही नाही. लॉकेटमधील लहान स्वरूपात तो प्रकट झाल्यापासून, सुनावणीच्या शेवटपर्यंत नाही. रात्री दहाला सात मिनिटे असतांना, मी वाट बघायचे सोडून दिले. चर्चचा तो मूर्ख माणूस व त्याची ती दोन बांडगुळे यांनी आम्हाला इतका त्रास दिला, की आम्ही दोनदा कोर्टातील जज्जला त्याचा निकाल परत वाचायची विनंती केली.

आमच्यापैकी नऊजणांना त्या परीच्छेदांबद्दल जराही संशय नव्हता. माझा विश्वास आहे, की कोर्टातील कुणालाही नव्हता. त्या मूर्ख त्रिमूर्तीला काही कल्पना नव्हती. अडथळयामुळे ते त्याच कारणासाठी भांडू लागले. आम्ही बराच वेळ तिथे थांबलो. शेवटी बारा वाजून दहा मिनिटांनी ज्युरी कोर्टात आले.

ज्युरींच्या बरोबर समोर, कोर्टाच्या दुसऱ्या बाजूला खून केलेला माणूस उभा होता. मी माझी जागा घेतल्यावर तो माझ्याकडे लक्षपूर्वक पाहू लागला. त्याचे समाधान झाले, असे वाटले. त्याने त्याचे डोक्यावरचे वस्त्र पहिल्यांदाच हातावर घेऊन, हळूहळू हलवले. मी आमचा निकाल वाचला, ‘‘दोषी’’ वस्त्र कोसळले. सर्व काही संपले. त्याची जागा रिकामी झाली.

तेथील पद्धतीप्रमाणे जज्जने खुनी माणसाला विचारले, त्याला फाशीची शिक्षा सुनावण्यापूर्वी काही सांगायचे आहे का तेव्हा तो हळू पुटपुटला, जे दुसऱ्या दिवशी महत्वाच्या वर्तमानपत्रात छापले गेले. ते अर्धवट ऐकू येईल असे, थरथर असलेले व असंबद्ध होते. त्यात तो सुनावणी बरोबर झाली नसल्याची तक्रार करत असल्यासारखे वाटत होते. कारण ज्युरीतील मुख्य माणसाचा त्याच्याबद्दल वाईट पूर्वग्रह होता. त्याचे उल्लेखनीय उद्गार असे होतेः

“माझ्या देवा, मला माहिती आहे मी दुर्दैवी माणूस आहे. जेव्हा मुख्य ज्युरी माझ्याजवळ आला, तेव्हाच मला समजले हा काही मला सोडणार नाही. कारण मला कळण्यापूर्वी तो कसा माहिती नाही, पण रात्री माझ्याशेजारी आला. त्याने मला जागे केले. आणि माझ्या गळयाभोवती फास आवळला.”

# The Poor Relation's Story

# कच्च्या नातेसंबंधांची गोष्ट



ख्रिसमसमध्ये शेकोटीजवळ छान गोल करून सर्वजण बसले असतांना, एकेकाने आपली आपली गोष्ट सांगायचे ठरले. पण कुटुंबातील इतक्या माननीय लोकांसमोर आपली गोष्ट सांगायला

तो थोडा आढेवेढे घेत होता. त्याने नम्रपणे सुचवले, की आपला माननीय पाहुणा जॉन [ज्याने स्वतःची तब्येत उत्तेजक पेयांमुळे बिघडवली होती.] याने कृपया सुरवात करावी. त्याच्या स्वतःच्या बाबतीत तो म्हणाला, की खरे तर अशा तऱ्हेने नेतृत्व करायची त्याला सवय नव्हती. पण त्यानेच सुरवात करावी असा आरडाओरडा सर्वजण करू लागल्याने, त्याने त्याचे हात चोळणे सोडले व खुर्चीखालून त्याचे पाय बाहेर काढून सुरवात केली.

मला यात काही संशय नाही की [कच्चे नातेसंबंध बोलले.] इथे जमलेल्या आपल्या कुटुंबातील सर्वांना, मी नक्कीच आश्चर्यचकित करून सोडेन. विशेषतः आपला खास पाहुणा जॉन, ज्याने इथे येऊन आपल्याला संबोधित करण्याचे आमंत्रण स्वीकारले आहे, त्याचा मी ऋणी आहे. पण मी तर कुटुंबातील फार महत्वाची व्यक्ती नाही. तरी माझ्याकडून प्रयत्नपूर्वक जे खरे सांगितले जाईल, त्यामुळे तुम्हाला आश्चर्य वाटेल. मी जो असायला हवा आहे, तो मी नाही. कदाचित पुढे जाण्यापूर्वी मी कोण असायला पाहिजे, यावर नजर टाकतो.

मी चुकत नसेन तर, मला वाटते --- आपल्या कुटुंबातील जमलेले लोक गरज पडल्यास, मला सुधारतील आणि असे होऊ शकेल. [इथे त्याने कच्च्या नातेंसंबंधातील विरोधाभासाकडे

तिरपा कटाक्ष टाकला.] मी कोणाचा शत्रू नसून माझाच शत्रू आहे. मला आयुष्यात कशातच यश मिळाले नाही. मी व्यापारात अयशस्वी झालो कारण मी अव्यापारेषु व्यापार केला. सगळ्यांवर फार विश्वास ठेवला. माझ्या भागीदाराला रुची असलेल्या डिझाइन्सवर मी अती विश्वास ठेवला. मी प्रेमात हरलो, कारण ख्रिस्तीना मला फसवू शकेल, असे मला स्वप्नातही वाटले नाही. मी फार विश्वासार्हता दाखवली. माझे काका चिल यांच्या माझ्याकडून असलेल्या अपेक्षा मी पुऱ्या करू शकलो नाही, कारण मी जगात वागतांना, जेवढा काटेकोर असायला हवा होतो, तेवढा नव्हतो. एकंदरीत आयुष्यभर माझा फायदा घेतला गेला, पण मी नाराजच राहिलो. सध्या मी एकोणसाठ ते साठमधील वयाचा, ठराविक तीन महिन्यांनी मला मिळणाऱ्या तुटपुंज्या पैशांवर जगणारा, अविवाहित मनुष्य आहे. मला असे दिसते आहे, की आपले माननीय पाहुणे, जॉन माझ्याकडून जास्त काही अपेक्षा करणार नाहीत.

हल्ली मी काय करतो व माझ्या सवयी काय आहेत, ते सांगतो.

मी क्लॅफॅम रस्त्यावरील खानावळीत, मागील बाजूस असलेल्या स्वच्छ चांगल्या घरात रहातो. दिवसा मी घरी नसतो.

सहसा मी सकाळी नऊला काही व्यवसायासाठी जात असल्याचे निमित्त करून, बाहेर पडतो. मी वेस्टमिन्स्टर पुलाजवळील जुन्या प्रसिद्ध कॉफीच्या दुकानात, पाव व लोणी आणि अर्धा कप कॉफी असा नाश्ता घेतो आणि शहरात जातो. --- आणि का कुणास ठाऊक --- पण गारावेजच्या कॉफीच्या दुकानात बसतो. बदल म्हणून चालतो. काही कार्यालयांकडे बघतो. मला सहन करू शकतील इतके चांगले मित्र असलेल्या माझ्या काही ओळखीच्या लोकांकडे व नातेवाइकांकडे वा शेअर कार्यालयात जातो. हवा थंड असेल, तर शेकोटीजवळ उभा रहातो. माझा पाच वाजेपर्यंतचा दिवस मी असा घालवतो. मग साधारण तेरा पेनीमध्ये जेवतो. संध्याकाळी माझे मनोरंजन करण्यासाठी माझ्याकडे अजून थोडे पैसे असतात. मी घरी जातांना, जुन्या प्रस्थापित कॉफीच्या दुकानांकडे बघत जातो. एक कप चहा व कदाचित एखादा टोस्टही घेतो. घड्याळाचा मोठा काटा पुन्हा सकाळच्या प्रहराकडे झुकतो, तेव्हा मी परत क्लॅफम रस्त्याला लागतो व माझ्या खोलीवर जाऊन झोपतो. शेकोटी वापरणे खर्चिक व कचरा होणारे असल्याने, मी ती वापरत नाही.

कधीकधी माझ्या ओळखीच्या किंवा नात्यांपैकी एकजण खूप आग्रह करून मला सुट्टीच्या दिवशी जेवायला बोलावतात

पण मी तेव्हा सहसा बागेत फिरायला जातो. मी गबाळा असल्यामुळे मला टाळले जाते, असे नाही, कारण मी अजिबात गबाळा नाही. मी नेहमी छान काळा सूट घालतो. [किंवा ऑक्सफर्डचे मिश्रण असलेला, काळा व फार चांगला बसणारा] पण मला हळू बोलायची सवय आहे. शांत असल्यामुळे व जास्त उत्साही नसल्याने, मला समजते, की मी फार चांगला जोडीदार नाही.

या सर्वसामान्य नियमाला अपवाद म्हणजे माझ्या चुलत भावाचा मुलगा, छोटा फ्रँक. मला त्या मुलाबद्दल विशेष प्रेम आहे. तोही मला मानतो. तो स्वभावाने वेगळा मुलगा आहे. मी म्हणू शकतो की गर्दीत तो पळत सुटतो आणि मग तो कुठे आहे, ते विसरतो. पण त्याचे व माझे छान जमते. मला वाटते, काही काळात तो मुलगा यशस्वीपणे कुटुंबातील माझ्या अवस्थेला पोचेल. आम्ही फार बोलत नाही, तरीही आम्ही एकमेकांना समजून घेतो. आम्ही हातात हात घालून फारसे न बोलता चालतो. मला काय म्हणायचे आहे, ते त्याला समजते व मीही त्याला समजून घेतो. जेव्हा तो खूप लहान होता, तेव्हा मी त्याला खेळण्यांच्या दुकानाच्या शोकेसपाशी नेत असे व त्याला आतील

खेळणी दाखवत असे. जर माझी तशी ऐपत असेल तर मी त्याला खूप काही वस्तू भेट म्हणून घेऊन देईन, हे त्याला कळत असे.

छोटा फ्रँक आणि मी पुरातन पुतळे किंवा ऐतिहासिक स्थळे बघायला जात असू. त्याला ते फार आवडे. पूल व इतर फुकट बघता येणारी दृष्ये देखील त्याला आवडत. माझ्या वाढदिवसाच्या निमित्ताने आम्ही इ-ला-मोड बीफ मध्ये जेवलो आणि अर्ध्या तिकिटात आम्हाला आवडणाऱ्या नाटकाला गेलो. मी त्याला सांगितले होते, लोम्बार्ड रस्त्यावर खूप श्रीमंती गोष्टी आहेत, तेव्हापासून त्याला तिथे फिरायला आवडे. त्यामुळे आम्ही नेहमी तिथे फिरत असू. त्या लोम्बार्ड रस्त्यावरून मी एकदा त्याच्याबरोबर चालत होतो. तेव्हा शेजारून चालणारा एक मनुष्य म्हणाला, “सर, तुमच्या मुलाचा हातमोजा पडला.” इतक्या क्षुल्लक गोष्टीवरून मी काही सांगू बघत असल्याबद्दल तुम्ही मला माफ कराल. पण अचानक तो माझा मुलगा असल्याचा उल्लेख ऐकून, मला गहिवरून आले व माझ्या डोळयात मूर्ख अश्रू उभे राहिले.

जेव्हा तो शाळेत जाऊ लागला, तेव्हा मला भांबावून गेल्यासारखे झाले व काय करावे, ते कळेना. पण त्याच्या शाळेला महिन्यातून एकदा अर्धी सुट्टी असे. तेव्हा मी जाऊन त्याला भेटत

असे. पण तेव्हा त्याला मैदानात खेळायला जायचे असल्याचे व माझ्या भेटीमुळे त्याचा दिनक्रम विस्कळीत होत असल्याचे मला सांगण्यात आल्याने, मी त्याला दिसणार नाही, अशा बेताने त्याला लांबून बघत असे व परत येत असे. त्याची आई उच्च खानदानी कुळातून आलेली असल्याने आणि तिला आम्ही दोघे सारखे एकत्र असलेले आवडत नसल्याने आणि त्याचा स्वभाव लाजाळू असल्याने, माझ्या लक्षात आले की आमची ताटातूट झाल्यास, त्याला माझी गैरहजेरी फार जाणवेल.

मी जेव्हा क्लॅफॅम रस्त्यावर मरेन, तेव्हा मी या जगात नसेन. तेव्हा मी कुरळे केस व तेजस्वी चेहरा असलेला, छातीवरून उघड्या शर्टाची झालर लोंबत असलेला, एक छोटा मुलगा असेन.[माझ्या आईने तो शर्ट घेतला होता, पण मला तो फारसा आवडत नसे.] तो विकला जाण्याच्या लायकीचा देखील नव्हता. त्याचा फार तर एक फ्रँक मिळाला असता. मी माझ्या आवडत्या मुलाला एक लहानसे पत्र लिहिले होते. त्यात मी त्याच्यापासून दुरावा निर्माण झाल्याने, मला दुःख होत असल्याचे लिहिले होते व हे कबूलही केले होते, की असे का करावे लागत आहे, ते मला कळत नाही आहे. मी मला जमेल तसा थोडा उपदेश त्याला केला होता. स्वतःच स्वतःचा शत्रू असण्याच्या परिणामांबद्दल मी

त्याला खडसावले होते. त्याला असे निदर्शनाला आणून दिले होते, की मी तो सोडून, प्रत्येकासाठी फारसा गरजेचा नसलेला आहे. काही कारणाने या कुटुंबात मी माझे स्वतःचे स्थान निर्माण करू शकलो नाही. त्यामुळे मी त्यातून बाहेर पडावे, ते उत्तम! मला अशी भीती वाटत होती, की तो माझ्या सहवासाला मुकेल. याबद्दल त्याचे सांत्वन करण्याचा कसून प्रयत्न केला होता व त्याला असे वाटणे गरजेचे नसल्याबद्दल लिहिले होते.

असे [घसा खाख्ररत व कच्च्या नातेसंबंधांबद्दल थोड्या मोठ्याने बोलत] माझ्याबद्दलचे एकंदरीत मत आहे. आता ही माझ्या गोष्टीची उल्लेखनीय परिस्थिती आहे, हे सर्व चुकीचे आहे. हे माझे आयुष्य नाही. या माझ्या सवयीदेखील नाहीत. मी क्लॅफॅम रस्त्यावर रहात नाही. तुलनात्मक दृष्ट्या बोलायचे झाले तर मी क्वचितच तिथे असतो. मी --- मला तो शब्द उच्चारायची लाज वाटते --- हे मी तुमच्यावर भाव मारण्यासाठी सांगतो आहे असे तुम्हाला वाटेल --- पण मी राजवाड्यात रहातो. ही उमरावांची जुनी वस्ती आहे. पण सर्वांना ती राजवाडा या नावानेच माहिती आहे. इथे माझ्या इतिहासाची विशेषता मी जपून असतो. ती अशी आहेः

मी पंचविशीचा तरुण असतांना, माझा कारकून असलेल्या जॉनला मी माझा भागीदार करून घेतले, तेव्हा हे प्रथम सुरु झाले. तेव्हा मी त्यांच्याकडून खूप अपेक्षा असलेल्या माझे काका चिल, यांच्याकडे रहात होतो. त्यामुळे मी ख्रिस्तिनाला लग्नाची मागणी घालायचा धीर केला. मी तिच्यावर बराच काळ प्रेम करत होतो. ती खूप सुंदर असून सर्व बाबतीत हुशार होती. मी तिच्या विधवा आईवर आंधळा विश्वास ठेवला. तिचे मन कारस्थानी होते व ती पैशांचा हव्यास असलेली बाई होती. पण मी ख्रिस्तिनासाठी तिच्या आईच्या या स्वभावाकडे दुर्लक्ष केले. माझे ख्रिस्तिना सोडून कुणावर प्रेम नव्हते. तिलाही लहानपणापासून सर्व जगापेक्षा मी प्रिय होतो.

तिच्या आईला विचारून ख्रिस्तिनाने माझी मागणी स्वीकारली आणि मी खूप खूश झालो. काकांकडचे माझे आयुष्य तसे नीरस होते. माझी वरच्या मजल्यावरील खोली एकाकी, गार व उदास होती. जणु एखाद्या शिस्तीच्या व अरेरावीच्या किल्ल्यातील तुरुंग होता. पण ख्रिस्तिनाच्या प्रेमामुळे, मला अजून काही नको होते. मी कोणाही माणसाबरोबर माझे नशीब बदलले नसते.

पैशांची हाव हा माझ्या चिलकाकांचा मोठा दुर्गुण होता. जरी ते श्रीमंत असले, तरी कंजुषीने, काटकसरीने व कसेतरी रहात. ख्रिस्तिना फार पैसेवाली नसल्याने, मी आमच्या साखरपुड्याबद्दल त्याना सांगायला घाबरत होतो. पण शेवटी मी त्यांना पत्र लिहिले, की कसे आमचे खरेखुरे प्रेम आहे. एके रात्री झोपायला जाण्यापूर्वी मी ते त्यांच्या हातात दिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी डिसेंबरच्या हवेत कुडकुडत मी खाली काकांच्या गार घरात आलो, तेव्हा काका बसलेले होते, त्या न्याहारीच्या खोलीत मी जड हृदयाने शिरलो. ती लहानशी शेकोटी असलेली मोठी खोली होती. त्या खोलीला मोठी खिडकी होती. त्यातून बेघर लोकांच्या अश्रुसारखा पाऊस आत आला होता. उजाड बागेत बाहेर फुटक्या दगडांची पाउलवाट होती व अर्धवट उखडलेले लोखंडी कुंपण होते. तिथे एका प्रथितयश सर्जनची चिरफाड करायची खोली असलेली कुरूप इमारत उभी होती. [ज्याने माझ्या काकांना हे घर विकले.]

आम्ही इतके लवकर उठत असू की आमची न्याहारी मेणबत्त्यांच्या उजेडात चाले. मी खोलीत गेलो, तेव्हा माझे काका थंडीने फार त्रासून गेले होते. ते एका मिणमिणत्या मेणबत्तीमागे

खुर्चीत इतके आखडून बसले होते, की मी जवळ जाईपर्यंत ते मला दिसलेच नाहीत.

मी माझा हात पुढे केल्यावर, त्यांनी काठी पकडली [कमकुवतपणा मुळे ते घरात काठी घेऊन चालत.] व मला मारत ते म्हणाले, 'अरे मूर्खा,"

जरी काका रागीट व कडक म्हातारा मनुष्य होते, तरी मी ओरडलो, "काका, तुम्ही इतके रागावलेले असाल, अशी अपेक्षा मी करत नव्हतो."

"तू करत नसशील. नाहीतरी तू केव्हा करत होतास? नीच कुत्र्या, तू तुझ्या भविष्याचा असा निर्णय कसा काय घेतलास?"

"हे फार जहरी बोलणे आहे, काका."

"जहरी बोलणे? तुझ्यासारख्या मूर्खावर असेच वाक्बाण सोडले पाहिजेत. अग बेटसी स्नॅप, [नोकराणी] त्याच्याकडे बघ."

आता मी इथे का रहावे? मी त्याना माझ्या कुवतीप्रमाणे, थोडा उपदेश केला. कुणाचाही नव्हे तर स्वतःचाच शत्रू असल्याच्या परीणामांची धमकी दिली आणि त्यांना भीती वाटत असलेल्या, मृत्यूमुळे ताटातूट होणाऱ्या त्यांचे सांत्वन केले. त्यांच्या असे निदर्शनास आणून दिले, की माझी त्यांच्याशिवाय

कुणालाच गरज नाही. जर त्यांना काही कारणाने माझ्यात दोष सापडत असतील, तर मी इथून बाहेर पडलेले बरे राहील.

बेटसी स्नॅप ही सुरकुतलेली, पिवळी, अनेक वर्षे घरी काम करत असलेली एकुलती एक नोकराणी होती. आता सकाळच्या वेळी ती काकांचे पाय चोळत होती. काकांनी तिच्या डोक्यावर त्यांच्या उतरत्या हाताची पकड घेऊन तिला माझ्याकडे बघायला सांगितले. तिने गुडघ्यांवर बसत माझ्याकडे पाहिले. सर्जनच्या वेळी या चिरफाड करायच्या खोलीत काय घडत असेल, असे काळजीयुक्त विचार नकळत त्या दोघांबद्दल माझ्या मनात येऊ लागले.

माझे काका म्हणाले, “या मुळूमुळू रडणाऱ्या घाबरट बाळाकडे बघ. लोक म्हणतात, तो इतर कुणाचा नाही, तर त्याचा स्वतःचाच शत्रू आहे. नाही म्हणू न शकणारा असा हा सभ्य गृहस्थ आहे. नफ्यात चालणाऱ्या, मोठ्या वाढलेल्या धंद्यासाठी एका भागीदाराची गरज असलेला, असा हा माणूस आहे. आणि हा जवळ एकही पेनी नसलेल्या बाईशी लग्न करायला निघाला आहे. माझ्या मरणावर टपून बसलेल्या नीतीभ्रष्ट व उद्धट बाईच्या हातात तो सापडला आहे.”

माझ्या लक्षात आले की माझे काका किती चिडले आहेत, त्यांचा राग किती अनावर झाला आहे व त्यांना माझ्याबद्दल किती घृणा वाटते आहे. त्यामुळेच त्यांच्याकडून हे शेवटचे शब्द उच्चारले गेले आहेत. यापूर्वी कधीही, कुठल्याही कारणाने, ते असे बोलले नव्हते.

जणू माझ्यावर आग पाखडून, स्वतःचाच तिरस्कार केल्यासारखे ते परत बोलले, “मी मेल्यावर --- मेल्यावर --- मेल्यावर! माझा तर्क खराब होईल. अरे, नादान लुकड्या, या घरातील हे तुझे शेवटचे जेवण समज. ते तुझ्या घशात अडको!”

अशा शिव्या दिलेल्या मला न्याहारीसाठी फारशी भूक नव्ह्ती. पण मी माझी सवयीची जागा घेतली. यापुढे माझ्या काकांकडून मी नाकारला जाणार होतो. पण ख्रिस्तिनाच्या प्रेमामुळे मी ते सहन करू शकलो.

त्यांनी नेहमीप्रमाणे त्यांच्या गुडघ्यांवर ठेऊन, त्याचे दूध व पाव फस्त केले. मग त्यांनी माझ्यापासून त्यांची खुर्ची फिरवून घेतली. एवढे झाल्यावर त्यांनी काळजीपूर्वक मेणबत्ती विझवून टाकली. गार, शिळा व करड्या रंगाचा विचित्र दिवस सुरु झाला.

ते म्हणाले, ‘मिस्टर मायकेल, आता तू इथून जाण्यापूर्वी ख्रिस्तिना व तिच्या आईच्या उपस्थितीत मला तुझ्याशी थोडे बोलायचे आहे.”

मी म्हणालो, “ठीक आहे, सर. पण तुम्ही स्वतःला फसवत आहात आणि मला दुष्टपणे खोटे पाडत आहात. तुम्हाला जर असे वाटत असेल, की यात काही भावना पणाला लागल्या आहेत, तर ते शुद्ध स्वतःची काही रुची नसलेले विश्वासू प्रेम आहे.”

याला त्यांनी फक्त असे उत्तर दिले, “तू खोटे बोलतोस.”

आम्ही अर्धवट पसरलेल्या बर्फातून व अर्धवट गोठलेल्या पावसातून ख्रिस्तिना व तिची आई रहात असलेल्या घरी गेलो. माझ्या काकांना ते लोक चांगले माहिती होते. त्या न्याहारी करायला बसत होत्या आणि त्यावेळी आम्हाला आलेले बघून आश्चर्यचकीत झाल्या.

माझे काका आईला म्हणाले, “बाईसाहेब, मी तुमचा नोकर, माझ्या येण्याचा हेतू सांगायचे धाडस करतो. मला समजले आहे की इथे शुद्ध, रुची नसलेले, विश्वासू प्रेम जडले आहे. मी ते पूर्णत्वाला नेण्यासाठी आलो आहे. बाईसाहेब, मी तुमच्याकडे

तुमचा जावई घेऊन आलो आहे आणि मिस तुमच्याकडे तुमचा नवरा. हा माणूस मला पूर्णपणे अनोळखी आहे. पण मी त्याला या शहाणपणाच्या व्यापारापासून आनंद मिळो अशी इच्छा करतो.”

ते रागाने माझ्याकडे बघत बाहेर गेले. त्यानंतर मी त्यांना कधीच पाहिले नाही.

माझ्या आवडत्या ख्रिस्तिनाने प्रभाव टाकून तिच्या आईचे मन वळवले असेल असे समजणे, ही सर्वस्वी चूक होती. [कच्चे नातेसंबंध चालू राहिले.] ज्याच्या गाडीच्या चाकांची घाण या बदललेल्या काळातही माझ्या अंगावर उडते, अशा एका श्रीमंत माणसाच्या गाडीने ती नेहमी जाते. त्याच्याशी तिने लग्न केले? नाही. नाही. तिने माझ्याशी लग्न केले.

आम्ही ठरवले त्यापेक्षा लवकर लग्न केले. त्याचे असे झाले. मी एका स्वस्त खानावळीत मुक्काम ठोकला. तिच्यासाठी मी पैसे वाचवत होतो. एक दिवस ती मोठ्या गंभीरपणे म्हणाली,

“माझ्या प्रिय मायकेल, मी तुला माझे हृदय दिले आहे आणि तुझी बायको होण्याचे वचन दिले आहे. या वचनाची जेव्हा आपल्यात देवाणघेवाण झाली, तेव्हापासून सर्व सुखदुःखात मी तुझी झाले. मी तुला चांगले ओळखते. जर आपले नाते तुटून,

आपण वेगळे झालो तर तुझे सर्व आयुष्य झाकोळून जाईल आणि हे सर्व आताही तुझे चारित्र्य बळकट करेल. जगाशी तुझे असलेले मतभेद यामुळे पुसट होतील.''

मी म्हणालो, ''देव मला मदत करो. ख्रिस्तिना, तू खरे बोललीस.''

तिचा हात माझ्या हातात देत, तरुण मुलीसारखी भक्तिभावाने ती बोलली, ''मायकेल, आता फार काळ आपण एकमेकांपासून दूर रहायला नको. पण मी असे सांगते, की तुझी जशी परिस्थिती आहे त्यात मी समाधानाने राहू शकते आणि मला माहिती आहे, की तू सुखी आहेस. हे मी मनापासून बोलते आहे. आता एकटा झुरू नकोस. आपण दोघे मिळून काय ते करू. माझ्या प्रिय मायकेल, तुला ज्याचा संशय येत नाही व आयुष्यभर जे मला छळत राहील, ते तुझ्यापासून गुप्त ठेवणे ठीक नाही. आपल्या प्रेमाचा विचार न करता माझी आई, मला तुझ्याशी लग्न करण्यापासून परावृत्त करते आहे. आणि माझ्यावर भरवसा ठेऊन तू काही गमावतो आहेस. मी तिचे मन वळवायचा प्रयत्न केला. पण ती पैशांचा विचार करून, मला विचित्र परिस्थितीत लोटून, माझ्यासाठी दुसरा नवरा शोधते आहे. मला हे सहन होत नाही. कारण असे करणे, हे तुला फसवल्यासारखे होईल. त्यापेक्षा मी

तुझ्याबरोबर गरिबीत दिवस काढणे पसंत करेन. तू देशील त्याहून श्रीमंत घर मला नको. मला माहिती आहे की जर मी तुझी झाले तर, तू कष्ट करून धैर्याने वर येशील आणि असे जेव्हा होईल तेव्हा होईल.”

त्या दिवशी मी खरोखर खूश झालो. एक नवीन जग माझ्यासाठी उघडले गेले. लवकरच आम्ही लग्न केले. मी माझ्या बायकोला आनंदी घरात नेले. मी बोललो होतो, त्या घराची ती सुरवात होती. तेव्हापासून आम्ही राजवाड्यात एकत्र रहातो. आमची सगळी मुले तेथे जन्मली. आमच्या पहिल्या मुलीचे, ख्रिस्तियानाचे, आता लग्न झाले. तिचा मुलगा इतका फ्रँक सारखा आहे की एकाला लपवावे व दुसऱ्याला काढावे. माझ्या भागीदाराचे माझ्याशी वागणे चुकीचे आहे, तो मूर्खासारखे माझ्याशी थंडपणे वागू लागला, असे नाही. जेव्हा मी व माझे काका मरणांतिक भांडलो, तेव्हाही त्याने हळूहळू आमचा व्यापार ताब्यात घेऊन, मला बाहेर ढकलले नाही, तर तो माझ्याशी पूर्ण विश्वासाने व मान देत वागला.

आमच्यातील संबंध असे बदलले. माझ्या काकांपासून मी दूर झाल्यापासून त्याने काकांच्या घरापासून माझे सामान मला पाठवले पण [सामानाच्या डब्याचे पैसे त्याने न भरता माझ्या नावे

ते बाकी ठेवले.] नदीकडे लक्ष न देता, मी आमच्या लहानशा धक्क्यावरील कार्यालयात गेलो. तिथे मी जॉन स्पॅटरला काय झाले ते सांगितले. जॉनने उत्तरात असे म्हणाला, की श्रीमंत, म्हातारे नातेवाईक या आभासी गोष्टी असतात. त्या भावना व ते प्रेम चंद्राप्रमाणे अद्भुतरम्य पण खोटे असते. तो मला असे म्हणाला, मायकेल, आपण शाळेत एकत्र होतो. तुझ्यापेक्षा मी वरचढ होतो व जास्त कीर्ती मिळवून होतो."

मी उत्तरलो, "बरोबर आहे, जॉन."

जॉन म्हणाला, "तरीही मी तुझी पुस्तके घेऊन, ती हरवली. तुझे पाकीट, पैसे घेतले व कधीही परत केले नाहीत. तुला माझे खराब झालेले चाकू मी ते विकत घेतले त्यापेक्षा जास्त किमतीला विकत घ्यायला लावले आणि मी मोडलेली खिडकी तुला तुझी म्हणायला लावली."

मी म्हणालो, "जॉन, ते खरे आहे. पण त्याचा उल्लेख करणे ठीक नाही."

"जेव्हा तू पहिल्यांदा या नवजात बाळाच्या व्यवसायात स्थिरस्थावर झालास व तो इतका चांगला चालू लागला, तेव्हा मी

नोकरीच्या शोधात होतो व तू मला तुझ्याकडे कारकुनाची नोकरी दिलीस.”

मी म्हणालो, “ते खरे असले, तरी माझ्या प्रिय जॉन, त्याचा उल्लेख करणे ठीक नाही.”

“मी व्यवसायासाठी चांगले डोके असलेला आहे व माझा उपयोग होतो आहे, असे तुझ्या लक्षात आल्यावर, तू मला कारकुनाच्या कामावरून बढती देऊन, मला तुझा भागीदार बनवलेस.”

मी म्हणालो, “जॉन, इतर लहानसहान परीस्थितीपेक्षा अजून कमी किमतीच्या घटनांचा उल्लेख करण्याची तू आठवण केलीस, कारण मला तुझे गुण व माझ्यातील त्रुटी कळत होत्या आणि कळत आहेत.”

शाळेत त्याला सवय होती तसे माझा हात त्याच्या हातात घेत जॉन म्हणाला, “माझ्या चांगल्या मित्रा” आमच्या हिशेबाच्या खोलीच्या खिडकीतून कडक शिस्तीच्या खिडक्यांसारखी दिसणारी, बाहेरील दोन जहाजे --- नदीच्या भरतीमुळे थोडीशी खालील बाजूस गेलेली दिसत होती, जसे काही जॉन व मी एकमेकांवरील विश्वासाने व आत्मविश्वासाने, जीवननौका वल्हवत

आहोत. “या मित्रत्वाच्या परीस्थितीत, आपल्यात चांगला समजूतदारपणा असू दे. मायकेल, तू फार भोळा आहेस. तू स्वतःचा सोडून कुणाचाच शत्रू नाहीस. जर मी डोके हलवून व खांदे उडवून व सुस्कारे टाकून, आपल्या संबंधाना नुकसानकारक चारित्र्य दिले असते आणि तू माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाचा दुरुपयोग केला असता --- “

मो बोललो, “पण जॉन, तू कधीच त्याचा दुरुपयोग करणार नाहीस.”

तो म्हणाला, “कधीच नाही. पण मी काय म्हणतो --- आपल्यातील सामाईक गोष्टींबद्दल तुला अंधारात ठेऊन, मी तुझा विश्वासघात केला असता. काही सामाईक गोष्टींबद्दल तुला पूर्णपणे खरे व काहींबद्दल अर्धवट सांगितले असते व सतत असेच चालू ठेवले असते. तर दिवसेंदिवस माझी शक्ती वाढली असती व तुझ्यातील त्रुटी आणखी वाढल्या असत्या. शेवटी माझे नशीब फळफळले असते आणि तू आपल्या सामाईक रस्त्यावरून अनेक मैल मागे पडला असतास.”

मी म्हणालो, “बरोबर.”

जॉन म्हणाला, “मायकेल, हे रोकण्यासाठी किंवा यासाठी कमीत कमी संधी मिळण्यासाठी, आपल्यात खूप मोकळेपणा पाहिजे. काही लपवाछपवी नको. आपली रुची पण एकच हवी.”

मी त्याला विश्वासात घेत म्हणालो, “माझ्या प्रिय जॉन, मलाही तेच म्हणायचे आहे.”

मित्रत्वाने चेहरा झळकत असलेला जॉन म्हणाला, “आणि जेव्हा तू फार भोळेपणा करतोस, तेव्हा तू तुझ्या स्वभावातील त्या त्रुटीचा कुणी फायदा घेण्यापूर्वी ती रोकायला तू मला परवानगी द्यायला पाहिजेस. मी त्या त्रुटीची टिंगल करायची अपेक्षा, तू ठेवता कामा नयेस.”

मी मध्येच बोललो, “माझ्या प्रिय जॉन, तू त्याची टिंगल करण्याची मी अपेक्षा करत नाही.”

जॉन म्हणाला, “मी पण नाही.”

मी ओरडलो, “बरोबर तसेच. आपल्या दोघांचे उद्दिष्ट एकच आहे. त्याकडे मानाने वाटचाल करतांना व एकमेकांवर पूर्ण विश्वास ठेऊन, आपल्या भागीदारीचे भविष्य उज्वल ठरेल.”

जॉन म्हणाला, “मला असे होईल, याची खात्री आहे.” एवढे बोलून त्याने प्रेमाने हस्तांदोलन केले.

मी जॉनला घरी राजवाड्यात घेऊन गेलो आणि सबंध दिवस आम्ही मजेत घालवला. आमची भागीदारी चांगली फळफळली. माझ्या अपेक्षेप्रमाणे, माझा मित्र व भागीदार असलेल्या त्याने मला हवे ते दिले. मी स्वतः व व्यवसाय दोन्ही सुधारले. आयुष्य थोडेसे वाढायला मी त्याला मदत केली.

[हात चोळताना शेकोटीकडे बघत, कच्चे नातेसंबंध असे म्हणत] मी फार श्रीमंत नाही. त्याचे मला काही वाटतही नाही. मला माझ्यासाठी पुरेसे आहे. माझ्या सगळ्या सर्वसाधारण गरजा व सुखसुविधा भागलेल्या आहेत. माझा राजवाडा काही फार सुंदर जागा नाही. पण आरामशीर आहे तिथे उबदार, आनंदी हवा आहे. मुख्य म्हणजे ती घरासारखी आहे.

हुबेहूब माझ्या बायकोसारख्या असलेल्या माझ्या मोठ्या मुलीने जॉनच्या मोठ्या मुलाबरोबर लग्न केले आहे. त्यामुळे आमची दोन्ही कुटुंबे रेशमी बंधनात अडकलेली आहेत. एका आल्हादक संध्याकाळी जेव्हा आम्ही सगळे जमलो होतो --- असे क्वचितच होई --- आणि तेव्हा जॉनने व मी आमच्या आवडत्या, जुन्या काळाबद्दल बोलणे सुरु केले.


मला खरेच माहिती नव्हते की माझ्या राजवाड्यात किती एकाकीपणा भरलेला आहे. माझी काही मुले व नातवंडे नेहमी इथे

असतात व त्यांचे तरुण आवाज आनंददायी असतात. ओहो --- ते ऐकून मी फार खूष होतो. माझी सर्वात आवडती, प्रेमळ, नेहमी मला मदत करणारी, सतत माझ्या आसपास असणारी, मला धीर देणारी आणि विश्वासू पत्नी ही माझ्या घरासाठी अनमोल आशीर्वाद आहे. आम्ही एक सांगीतिक कुटुंब आहोत. जेव्हा कुठल्याही वेळी ख्रिस्तिना मला थोडे उदास वा दुःखी बघते, तेव्हा ती पियानोकडे वळते व आम्ही पहिल्यांदा एकमेकांना लग्नाचे वचन दिले, तेव्हाचे एखादे हळूवार गाणे म्हणते. मी इतका भावूक मनुष्य आहे की दुसऱ्या कोणाकडून ते ऐकलेले मला सहन होत नाही. एकदा मी छोट्या फ्रँक बरोबर असतांना ते थिएटरमध्ये वाजवले जात असताना तो मुलगा नवल वाटून म्हणाला, “मायकेल काका, माझ्या हातावर कुणाचे गरम अश्रु पडले!”

माझा राजवाडा असा आहे आणि त्यातील माझे जतन केलेले आयुष्य असे आहे. मी नेहमी छोट्या फ्रँकला घरी आणतो. माझी नातवंडे त्याचे छान स्वागत करतात. ते सगळे मिळून खेळतात. वर्षातील यावेळी --- ख्रिसमस व नवीन वर्षाच्या वेळी मी माझ्या राजवाड्याबाहेर क्वचितच पडतो. कारण या ॠतुत या सर्वांचे येणे मला तिथे रोकून धरते आणि या ॠतुमुळे माझ्या वागणुकीवर मी घरी रहायची प्रेमळ बंधने पडतात.

त्या जमावातून कच्च्या नातेसंबंधाच्या शेकोटीकडे बघत, मान हलवत थंड पण दयाळु आवाज येतो, “आणि राजवाडा --- सुखाच्या परमोच्च बिंदूवर जातो.” आमचा माननीय पाहुणा जॉन ती परिस्थिती अचूकपणे वर्णन करतो, तो राजवाडा सुखाच्या परमोच्च बिंदूवर जातो! माझे सांगून झाले. तुम्ही कृपया ही गोष्ट सगळीकडे पसरवाल का?

# The Schoolboy's Story
# शाळेत जाणाऱ्या मुलाची गोष्ट




मी आता लहान असल्यामुळे --- मी वर्षागणिक वाढतो आहे. पण तरीही मी लहानच आहे --- माझ्याकडे माझ्या मागील वर्षातील साह्सांचा आढावा घेण्यासारखे काही नाही. येथील कुणाला त्यात काही स्वारस्यही नसेल. मला वाटते, धर्मगुरू किती चक्रम आहे किंवा ती कशी पुराणातील विचित्र प्राण्यासारखी

आहे किंवा ते पालकांकडे --- विशेषतः केशकर्तन व वैद्यकीय तपासणीबाबत जागरुक रहाण्यासाठी कसा आग्रह धरतात, हे मी तुम्हाला सांगावे.

आमच्यातील एकाला त्याच्या पहिल्या सत्राच्या हिशेबात दोन गोळ्यांसाठी बारा शिलिंग व सहा पेनीचा भुर्दंड बसला. --- मी असा विचार करायला पाहिजे, की एका गोळीस सहा शिलिंग आणि तीन पेनी म्हणजे तो तसा फार जास्त नव्हता --- पण त्या गोळ्या त्याने कधीच घेतल्या नाहीत, तर त्या त्याच्या जाकीटाची बाही दुमडून, त्यात ठेऊन दिल्या.

आम्हाला आमच्या निवासी शाळेत देण्यात येणारे बीफ तर लाजीरवाणे असे. हे बीफ नसेच. चांगले बीफ चिवट नसते. ते तुम्ही चावू शकता. त्याला दाट रस असतो. पण आम्हाला मिळणाऱ्या बीफमध्ये रसाचा थेंबही आढळत नसे.

आमच्यातील एकजण आजारी पडून घरी गेला. त्याने कुटुंबाच्या डॉक्टरना त्याच्या वडिलांना असे सांगताना ऐकले, की ही बिअर असल्याशिवाय अशी तक्रार येणे शक्यच नाही. ती बिअरच असणार, असेलही.

तरीही बिअर आणि म्हातारा चीजमन [आमच्या वर्गातील मोठा मुलगा] या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. मी तुम्हाला

म्हाताऱ्या चीजमनबद्दल सांगणार आहे. शाळेला फायदा मिळवण्याकरता शाळेच्या गाभाभूत मूळ मान्य तत्वांचा कसा नाश केला गेला त्याबद्दल नव्हे.

बिस्किटाच्या बाहेरील कडक भागाकडे बघा. त्यात ओलसरपणा नाही. तो कडक आहे --- दमट शिशासारखा. ती बिस्किटे खाऊन मग आम्हा मुलांना स्वप्ने पडतात. हाका मारुन इतरांना जागे करण्यासाठी त्यांचा आधार घेतला जातो. त्यात नवल ते काय!

एका रात्री म्हातारा चीजमन झोपेत चालत, रात्रीच्या टोपीवर कोट घालून, मासे पकडायचा गळ व क्रिकेटची बॅट घेऊन, स्वयंपाकघरात गेला. तिथे त्याच्या अवतारावरून साहजिकच त्यांना वाटले, की ते भूत आहे. जर जेवण चांगले पौष्टीक असते, तर त्याने असे केले नसते. जेव्हा आपण सगळे झोपेत चालायला लागू, तेव्हा मला वाटते, त्यांना पश्चात्ताप होईल.

म्हातारा चीजमन लॅटीनचा शिक्षक नव्हता. तो स्वतःच ती भाषा शिकत होता. लहान असताना त्याला पहिल्यांदा तिथे तपकीर ओढणाऱ्या बाईने टांग्यातून हलवत आणले --- एवढे त्याला पक्के आठवते. तो सुट्टीत कधी घरी गेला नाही. त्याचे हिशेब [तो वेगळे काही शिकला नाही.] बँकेत पाठवले गेले व

बँकेमार्फत ते पैसे भरले गेले. त्याला वर्षातून दोनदा तपकिरी सूट मिळे आणि बारा आकाराचे बूट मिळत. ते त्याच्यासाठी नेहमीच फार मोठे असत.

उन्हाळयाच्या सुट्टीत, आमच्यापैकी काही मुले, जी चालत जाण्याच्या अंतरावर रहात, ती येऊन खेळायच्या मैदानाच्या भिंतीशेजारील झाडांवर चढत असत. कारण त्यांना म्हाताऱ्या चीजमनला वाचतांना स्वतःला बघायचे असे. मी आशा करे की तो नेहमी चहाइतका म्हणजे खूप गंभीर असे. जेव्हा ते त्याला शिट्टी मारत, तेव्हा तो वर बघून मान हलवे. ते जेव्हा हॅलो म्हाताऱ्या चीजमन, आज काय जेवलास? असे विचारत, तेव्हा तो उत्तर देई, "उकळलेले मटन" आणि जेव्हा ते म्हणत, "म्हाताऱ्या चीजमन, तुला एकाकी वाटत नाही का? तेव्हा तो म्हणे, "कधी कधी उदास वाटते." मग ते म्हणत, "ठीक आहे, अच्छा रे म्हाताऱ्या!" व निघून जात. पण म्हाताऱ्या चीजमनला फक्त उकळलेले मटन देणे हे अर्थात दिसायला परिणामकारक होते.

पूर्ण सुट्टीभर ते देणे, हीच त्यांची पद्धत होती. जेव्हा ते उकळलेले मटन देत नसत, तेव्हा ते त्याला मेजवानी दिल्याचे भासवून केक देत. आणि मटनाचा खर्च वाचवत.

म्हाताऱ्या चीजमनचे असे चालले होते. सुट्टीमध्ये त्याला एकाकीपणाशिवाय अजून एक त्रास असे, कारण जेव्हा सुट्टी संपलेली नसतांना त्याना यायचे नसून, मुले परत येऊ लागत, तेव्हा त्याना बघून तो आनंदित होई, पण त्याला बघून ते आनंदी होत नसत, ही समस्या होती. तेव्हा तो भिंतीवर डोके आपटून घेई व त्याच्या नाकातून रक्त येऊ लागे. पण साधारणपणे तो आवडता होता. एकदा त्याला बरे वाटावे म्हणून, त्याच्यासाठी वर्गणी गोळा करण्यात आली व सुट्टीपूर्वी त्याला दोन पांढरे उंदीर, एक ससा, एक कबुतर व एक छान छोटे कुत्र्याचे पिल्लू बक्षीस देण्यात आले. म्हाताऱ्या चीजमनने लगेच नंतर त्यांनी एकमेकांना खाल्लेले बघून गळा काढला.

अर्थात म्हाताऱ्या चीजमनला चीजच्या सर्व प्रकारांवरून नावे ठेवली गेली होती. डचमन, कुटुंब चेशायरमन, उत्तर विल्टशायरमन, दुहेरी ग्लोस्टरमन आणि अशीच काही! पण त्याने त्याचे काही वाटून घेतले नाही. वर्षांच्या हिशेबात, तो म्हातारा होता, असे मला म्हणायचे नाही --- कारण तो तसा नव्हता. तो थोराड असल्याने, ते त्याचे टोपण नाव होते.

पण पहिल्यापासून त्याला म्हातारा चीजमन म्हटले गेले.

शेवटी म्हाताऱ्या चीजमनला लॅटीनचा दुसरा शिक्षक केले गेले. वर्षाच्या दुसऱ्या सत्राच्या सुरवातीला एका सकाळी त्याला आणून मिस्टर चीजमन म्हणून शाळेच्या हवाली करण्यात आले. मग आम्ही सगळ्यांनी ठरवले की म्हातारा चीजमन हेर होता. वाळवंटातील एकाने शत्रूच्या वस्तीवर गेले असतांना, त्याला सोन्याच्या बदल्यात स्वतःला विकतांना पाहीले. फार थोड्या सोन्याकरता म्हणजे दोन पौंड, दहा शिलिंग आणि अंघोळ या किमतीला तो विकला गेल्याचे समजले. त्याच्याकरता आमच्या वर्गाने बसवलेल्या सरकारी [लुटुपुटीच्या] कमिशनने असे ठरवले की म्हाताऱ्या चीजमनचे नितीमत्ता गुंडाळून पैशासाठी प्रयत्न चाललेले आहेत. त्याचे "चांदीच्या नाण्यासाठी आपले रक्त विकणे." यावरून हे लक्षात घेऊन कमिशनने हा अंदाज बांधला.

अशा खात्रीलायक रीतीने, म्हाताऱ्या चीजमनला भयंकर फसव्या ठरवले गेले. त्याने जाणूनबुजून, आसपासच्या लोकांची त्याला माहिती असलेली गुपिते फोडून, स्वतःला लोकप्रिय केले. सर्व धैर्यवान मुलांना पुढे बोलावण्यात आले व चीजमनविरुद्ध त्यांची एक संघटना बांधली गेली. या संघटनेचा अध्यक्ष बॉब टार्टर नावाचा मुलगा होता. त्याचे वडील वेस्ट इंडीजमध्ये होते आणि ते लक्षाधीश होते. आमच्या मुलांमध्ये त्याचा मोठा रुबाब

होता. त्याने एक विडंबन काव्य रचले होते. त्याची सुरवात अशी होतीः

“ज्याने विश्वास ठेवायला लावला तो आहे सभ्य शांत

तो अगदी क्वचितच असे बोलत

आणि तरी जो निघाला ओकणारा साप त्याला जे माहित

तोच म्हातारा चीजमन”

अशा तऱ्हेने त्याने डझनापेक्षा जास्त कडवी रचली. ती तो शाळेत सकाळी ठिकठिकाणी जाऊन व नवीन शिक्षकांच्या टेबलाजवळ उभा राहून गात असे. ज्याला तो काय करतो आहे, याची काही फिकीर नव्हती, अशा एका खालच्या जातीच्या, गुलाबी गालाच्या मुलालाही त्याने तयार केले होते. सकाळी तो त्याच्या लॅटीन व्याकरणासह असे गात होताः

“हे करणारा --- म्हातारा चीजमन --- त्याचा कधीच संशय आला नाही --- हे सगळे काही तो माहिती फोडणारा असल्याने --- त्याने ते सिद्ध करेपर्यंत --- उदाहरणार्थ --- जेव्हा त्याने मुलांना विकले --- मी जुडास आहे! --- असे काही, तो म्हणाला.”

या सर्वाचा म्हातारा चीजमनवर फार मोठा परिणाम झाला. त्याला फार केस नव्हतेच. पण जे होते, ते अधिकाधिक पातळ होऊ लागले व गळू लागले. एखाद्या संध्याकाळी तो त्याच्या

बाकावर त्याची मूल्यवान लांब मेणबत्ती विझवताना व हात चेहऱ्यावर घेऊन रडतांना दिसू लागला. पण वर्गातील कोणाही मुलाला त्याची दया आली नाही. फक्त म्हाताऱ्या चीजमनच्या सद्सदविवेकबुद्धीमुळे अध्यक्ष थोडा त्याच्या बाजूला झुकलेला वाटत होता.

म्हाताऱ्या चीजमनचे आयुष्य फारसे चमत्कारिक न होता, पुढे चालू राहिले. अर्थात धर्मगुरुने व तिने यात नाक खुपसले --- कारण ते दोघे सर्व शिक्षकांच्या बाबतीतही तसे करत. पण म्हाताऱ्या चीजमनला या मुलांचा सतत फार त्रास झाला. तो याबद्दल काही बोलत नसला, तरी ते सर्वांना कळत असे. पण अध्यक्षाने त्याला भित्रा ठरवल्याने चीजमनला त्याबद्दल काहीही मोठेपणा देण्यात आला नाही.

त्यामुळे म्हाताऱ्या चीजमनवरील विडंबनकाव्याची कडवी वाढत चालली. ती म्हणणे चालू राहिले. त्याला जगात एक त्याच्याइतकीच सत्ताहीन अशी जेन नावाची मैत्रिण होती. ती म्हणजे लोकांसाठी एक प्रकारचे कपाट होते. ती सर्वांच्या सामानाची काळजी घेई. मला वाटते ती शाळेत प्रथम मदतनीस म्हणून आली --- आमच्यापैकी काही मुले म्हणतात, ती अनाथालयातून आली होती. पण मला माहिती नाही --- एक

वर्षाने केव्हातरी तिचे ते काम संपले. कदाचित मला म्हटले पाहिजे, की ते वर्ष लहान होते. तरीही तिने काही पौंड बँकेत शिल्लक ठेवले होते. ती फार चांगली तरुण बाई होती. ती फार सुंदर होती, असे नव्हे, पण ती फार प्रामाणिक, मनमोकळी व तेजस्वी चेहरा असलेली होती. सर्व लोकांना तिचा लळा होता. ती असामान्य रीत्या नीटनेटकी, स्वस्थ, दयाळु व आनंदी होती. कोणाच्या आईसंबंधी काही पत्र आले असेल, तर तो नेहमी ते जेनला दाखवत असे.

ती म्हाताऱ्या चीजमनची मैत्रिण होती. वर्ग जितका त्याच्याविरुद्ध गेला, तितकी ती त्याच्यामागे खंबीरपणे उभी राहिली. तिच्या स्तब्ध खोलीच्या खिडकीशी ती त्याच्याकडे छानसा हसरा कटाक्ष टाकत असे. त्याने तो दिवसभर उत्साही रहात असे. फळबागेतून, परसबागेतून व बाहेर खेळायच्या मैदानातून जाताना, ती कधीकधी दुसऱ्या रस्त्याने केवळ म्हाताऱ्या चीजमनकडे वळून पहाण्यासाठी जाई. फक्त म्हाताऱ्या चीजमनला एवढे म्हणण्यासाठी, की ‘मुलांनी त्रास दिला तरी, तुझा उत्साह कायम ठेव.’ तो त्याच्या बाकावर असतांना, त्याच्या खोलीचा कोपरान् कोपरा इतका स्वच्छ व नीटनेटका असे आणि जेवणाच्या वेळी त्याच्या ताटात ते सिगरेटची राख बघत, तेव्हा त्याना समजे, की ती खोली कोणी अशी चकचकीत केली आहे.

अशा परिस्थितीत सर्वांनी अनेक सभा घेऊन व चर्चा करून, असे ठरवले की जेनला म्हाताऱ्या चीजमनला ठार मारायला सांगायचे आणि तिने नकार दिला, तर तिला वाळीत टाकायचे. त्यामुळे अध्यक्षाच्या हाताखाली एक मंडळ नेमले गेले. आत्यंतिक गरजेपोटी, मंडळ काय निर्णयाप्रत पोचले आहे, हे तिच्या कानावर घालण्यात आले. तिच्या चांगल्या गुणांमुळे तिला वर्गात मान होता. तिच्याबद्दल असा प्रवाद होता, की तिने तिच्या दयाळु व प्रेमळ हृदयाने एका धर्मगुरुला त्याच्या अभ्यासिकेत संवादातून पटवून दिले होते आणि त्यामुळे एकाजण क्रूर शिक्षेपासून वाचला होता. त्यामुळे मंडळाला तिच्यावर सोपवण्यात येणारे हे काम, खरे तर आवडले नव्हते. तरीही अध्यक्षाने ते तिला करायला सांगितले. ते ऐकून जेन रागाने लाल झाली व रडू लागली. तिने अध्यक्षाला व मंडळाला असे कळवले की ते अत्यंत क्रूर रानटी श्वापदे आहेत व त्याना खोलीतून हाकलून दिले. याचा परिणाम म्हणजे वर्गाच्या पुस्तिकेत ते नोंदवले गेले, [ते शोधून काढले जाईल, म्हणून गुप्त पद्धतीने लिहिले गेले.] की जेनबरोबरच्या सर्व संभाषणाला मनाई केली आहे. परंतु अध्यक्षाने मंडळाला सांगितले, की चीजमनची शिक्षा कमी केली आहे.

जेन म्हाताऱ्या चीजमनशी एकनिष्ठ होती आणि तो मात्र वर्गातील मुलांशी सर्व प्रसंगी व त्यांच्या मतांविषयी खोटे वागत होता --- मात्र त्याच्या मैत्रिणीशी पूर्वीसारखेच गोडीगुलाबीने वागत होता. मंडळ भयंकर रागावले होते. कारण जेनचे वागणे त्यांच्याशी एक प्रकारचे तर चीजमनशी वेगळ्या प्रकारचे होते. त्यामुळे ते म्हाताऱ्या चीजमनशी अजूनच वाईट वागू लागले. एका सकाळी त्याचे बाक रिकामे पडलेले आढळले. उदास चेहऱ्यांमध्ये अशी कुजबुज सुरु झाली, की म्हाताऱ्या चीजमनला हे सहन न झाल्याने, लवकर उठून त्याने स्वतःला तळयात बुडवून घेतले.

म्हाताऱ्या चीजमनच्या परतीची अपेक्षा न करता, न्याहारीनंतर चेहऱ्यांवर गूढ भाव आणून, वर्गाने त्यांचे मत नक्की केले. काहीजणांनी अशी चर्चा सुरु केली की अध्यक्ष त्याला फाशी देणार होता की जन्मठेप? अध्यक्षाच्या [मुलाच्या] चेहऱ्यावर, हे ऐकून खूपच काळजीचे भाव उमटले. तो म्हणाला की त्याच्या देशाच्या [लुटुपुटीच्या] ज्युरींना त्याचा हा नसता खेळ सापडेल आणि ते त्याना आवडेल की नाही, कुणास ठाऊक! वर्गातील काही मुलांना असे वाटले, की त्याने जंगलात पळ काढावा, तिथे लाकूडतोड्याबरोबर कपडे बदली करावेत, व चेहरा काळ्या करवंदांनी काळा करावा. पण जास्त मुले असे

म्हणाली, की तो वर्गातून पळून जाऊन, वेस्ट इंडीजमधील त्याच्या वडिलांच्या मालकीच्या जमिनीवर त्याच्या वडिलांप्रमाणे लखपती बनून उभा राहील.

धर्मगुरू आल्यावर सगळ्यांचे हृदय धडधडू लागले. नेहमी जनतेला संबोधित करतांना, जसा धर्मगुरू रोमन सेनापतीसारखा उभा रहात असे, तसा उभा राहिला. पण जेव्हा त्याला म्हाताऱ्या चीजमनच्या गोष्टीबद्दल माहिती झाले, तेव्हा त्याच्या भीतीपेक्षा त्याला वाटणारे आश्चर्य जास्त मोठे होते. त्याने म्हटले, "आपला माननीय वारकरी [नापास होऊन, त्याच वर्गात वाऱ्या करणारा] मित्र उर्फ चीजमन ज्ञानाच्या छान मोकळया सपाट जमिनीवर होता. हो. हो. मी असे म्हणू शकतो! त्यातील बरेचसे खरे आहे" --- तो एका वडिलांच्या मर्जीविरुद्ध लग्न केलेल्या व त्यामुळे घर सोडलेल्या तरुण स्त्रीचा अनाथ मुलगा होता. कारण तिचा नवरा तरुणपणी मेला होता आणि ती त्या दुःखाने मेली. या दुर्दैवी मुलाला [म्हातारा चीजमन] त्याचे आजोबा त्याच्याकडे बाळ, मुलगा किंवा माणूस म्हणून कधीच बघायला तयार नव्हते. आता तेही वारले होते. त्यांची बरीच इस्टेट होती व त्यांनी इच्छापत्र केलेले नव्हते. त्यामुळे अचानक ती सगळी संपत्ती ज्ञानाच्या छान मोकळया सपाट जमिनीवर असणारा आपला माननीय वारकरी मित्र, म्हातारा चीजमन याच्या मालकीची झाली. पंधरवड्यातील

त्या दिवशी घर्मगुरूने बरीच त्रासिक सुवचने असे म्हणत आटोपती घेतली, “पुन्हा एकदा आमच्यात ये.” जेव्हा तो अजून विशिष्ट पद्धतीने आपण होऊन जायला निघाला, तेव्हा त्याने आम्हा सर्व मुलांकडे एक तीव्र दृष्टीक्षेप टाकला आणि तो गंभीरपणे बाहेर पडला.

आता मंडळाच्या सभासदांमध्ये उर्फ वर्गातील मुलांमध्ये खूपच काळजीचे वातावरण निर्माण झाले. त्यांच्यापैकी बऱ्याचजणांना राजीनामा द्यावासा वाटत होता आणि बरेचजण म्हणू लागले, की आमचे असे म्हणणे कधीच नव्हते. पण तरीही अध्यक्ष त्याच्या मताला चिकटून राहिला. तो म्हणाला की आपण सर्वांनी एकतर म्हाताऱ्या चीजमनच्या बाजूने तरी किंवा विरुद्ध उभे राहिले पाहिजे. जर वागण्याचा काही नियम बनवायचा असेल, तर सगळ्यांनी मिळून बनवायला पाहिजे. त्यामुळे मंडळाला दिलासा मिळेल. पण तसे झाले नाही. अध्यक्ष पुढे म्हणाला की आताचा कल लक्षात घेऊन, तो काही दिवसात त्यांना उत्तम सल्ला देईल. त्याची उत्सुकतेने वाट पाहिली गेली. त्याचे वडील वेस्ट इंडीजमध्ये असल्यामुळे त्याने खूपसे जग पाहिलेले होते.

अनेक दिवस बराच विचार करून अध्यक्षाने त्याच्या राज्यातील सैन्याला [म्हणजे दणकट गुंड मुलांना] व इतर सर्वांना एकत्र बोलावले आणि त्या गोष्टीवर प्रकाश टाकला. तो बोलला की जेव्हा त्याच्या नेमणुकीच्या दिवशी म्हातारा चीजमन हजर झाला, तेव्हा मंडळावर गैरवर्तनाने दबाव आणून सूड घेणे व त्यांना बडवून काढणे, असे त्याचे ठरलेले होते. त्याच्या शत्रूंचा छळ झालेला बघून, तो आनंद घेत, दुःखाने त्याचे रडणे मजेने बघत बसणार होता. अशी शक्यता होती की त्याने धर्मगुरुला त्याच्याशी संवाद करायचे ढोंग करून, जिथे कधी न वापरले गेलेले दोन मोठे दिवे होते व जिथे पालकांना बोलावले गेले होते, अशा एका खासगी खोलीत आमंत्रण धाडले असते --- आणि तिथे धर्मगुरुकडून केल्या गेलेल्या, विविध गैरकृत्यांबद्दल त्याने सहन केलेल्या छळासाठी, नापसंती व्यक्त केली असती. हे झाल्यावर पॅसेजमध्ये लपलेल्या त्याच्या गुंडाला बोलावून धर्मगुरु बेशुद्ध पडेपर्यंत त्याची धुलाई केली असती. मग त्याने असे केले असते, की त्या गुंडाला पाच दहा पौंड द्यायचे आणि मोठ्या दुष्ट पद्धतीने विजय मिळवून ती वस्ती सोडून निघून जायचे.

अध्यक्षाने स्पष्टीकरण दिले, की याशिवाय त्याला आणखी काही सांगायचे नाही आहे. पण मंडळाच्याकडून त्याला कसून विरोध झाला. त्याने असा दृष्टीकोन घेऊन शिफारस केली, की

सगळी रिकामी बाके दगडांनी भरुन टाका. तक्रारीचा पहिला शब्द हा प्रत्येक सभासदांसाठी म्हाताऱ्या चीजमनवर मारा करण्यासाठीची खूण असेल. असल्या धीट उपदेशाने मंडळ एकत्र होऊन चांगलेच पेटून उठले. म्हाताऱ्या चीजमनच्या आकाराचे सोंग खेळायच्या मैदानात उभे केले गेले. मंडळाच्या सर्व सभासदांनी त्या आकृतीला ठिकठिकाणी भोके पाडून ते विद्रूप केले.

जेव्हा दिवस व जागा ठरवली गेली, तेव्हा प्रत्येक सभासद घाबरून बसला होता. चीजमन कसा येईल, यावरून चर्चा व भांडणे रंगली होती. पण सर्वसाधारण मत असे होते, की तो चार घोड्यांच्या गाडीतून विजय साजरा करत, गणवेष घातलेल्या दोन नोकरांना घेऊन व गुंडाना मागे लपवून येईल. त्यामुळे सर्वजण घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकू येण्याची वाट बघत बसले. मात्र म्हाताऱ्रा चीजमन काही तयारी न करता शाळेत चालत आला. जसा तो नेहमी येत असे तसाच, फक्त काळे कपडे घालून आला.

धर्मगुरू म्हणाला, “सभ्य लोकांनो, ज्ञानाच्या छान मोकळ्या सपाट जमिनीवर असणारा आपला माननीय वारकरी मित्र, म्हातारा चीजमन, दोन शब्द बोलणार आहे. तरी सर्वांनी शांत बसा.”

सर्वजण बाकावर हात ठेऊन, अध्यक्षाकडे बघू लागले. अध्यक्षाने तयार होऊन, म्हाताऱ्या चीजमनकडे डोळे वळवले.

त्यानंतर म्हाताऱ्या चीजमनने काय केले, तर तो त्याच्या जुन्या बाकाकडे चालत गेला. जणू त्याच्या डोळयात अश्रू आले असावेत, अशा विचित्रपणे हसत भोवताली पाहिले आणि हळूवार व थरथरत्या आवाजात म्हणाला, “माझ्या जुन्या आवडत्या मित्रानो!”

प्रत्येकाचा हात बाकावरून बाजूला आला. अध्यक्ष अचानक रडू लागला.

म्हातारा चीजमन बोलला, “माझ्या जुन्या आवडत्या मित्रानो! तुम्ही माझ्या चांगल्या नशीबाबद्दल ऐकले असेल. मी या छताखाली खूप वर्ष काढली --- आतापर्यंतचे माझे सर्व आयुष्य! मी असे म्हणू शकतो --- मी अशी आशा करतो, की माझ्यासाठी तुम्हाला हे ऐकून आनंद होईल. तुमचे अभिनंदन केल्याशिवाय मी त्याचा आनंद घेऊ शकत नाही. जर आपल्यात काही गैरसमज असतील, तर माझ्या आवडत्या मित्रानो, मला क्षमा करा व विसरून जा. माझ्या मनात तुमच्याविषयी कोवळीक आहे. आणि तुमच्या मनातही ती असेल. मी उदार हृदयाने तुम्हा सर्वांबरोबर

हस्तांदोलन करू इच्छितो. माझ्या आवडत्या मित्रानो, मी ते करण्यासाठी तुमच्याकडे येतो आहे.''

अध्यक्ष अचानक रडू लागल्यामुळे, सभासदांपैकी काहीजणांच्या डोळ्यातूनही अश्रू येऊ लागले. म्हाताऱ्या चीजमनने लहान मुलासारखा प्रेमाने त्याचा डावा हात अध्यक्षाच्या खांद्यावर ठेवला आणि उजव्या हाताने त्याला जवळ घेतले, तेव्हा अध्यक्ष म्हणाला, ''खरे तर मी याला पात्र नाही. मला इतका मान देऊ नका.'' शाळेमध्ये सर्वत्र हुंदके व रडारड चालू झाली. सगळे म्हणू लागले की त्यांची खरे तर तशी पात्रता नाही. पण म्हातारा चीजमन ते काही मनावर न घेता आनंदाने सगळ्यांजवळ जात होता. शेवटी तो धर्मगुरूजवळ गेला.

मग नेहमी शिक्षा होणारा, कोपऱ्यातील एक नाक ओढणारा छोटा मुलगा जोरात ओरडला, ''म्हाताऱ्या चीजमनचा विजय असो. हुर्ये!'' धर्मगुरूने त्याच्याकडे बघितले व म्हणाला, ''मिस्टर चीजमन सर,'' पण म्हाताऱ्या चीजमनला सर वगैरे म्हणण्यापेक्षा त्याचे जुनेच नाव पसंत असल्याचे त्याने ठासून सांगितले. ते ऐकून सर्वजण रडू लागले. मला माहिती नाही, की किती वेळ हातपाय आपटून आनंद साजरा केल्याचा जोरदार आवाज येत होता व

म्हाताऱ्या चीजमनच्या नावाने त्याच्या विजयाच्या घोषणा दिल्या जात होत्या. असा जल्लोष पूर्वी कधीच झाला नव्हता.

नंतर जेवायच्या खोलीत लोकांची मोठी गर्दी जमली. मोठे पक्षी, साठवलेली फळे, सुका मेवा, जेली, बार्ली- साखरेचे पदार्थ, कोंडा, यापैकी तुम्हाला हवे ते खा व काय आवडेल ते खिशात भरा. हे सगळे म्हाताऱ्या चीजमनच्या खर्चाने! त्यानंतर भाषणे व पूर्ण सुट्टी! सर्व भेटवस्तूंचे तीन चार संच, सगळे म्हाताऱ्या चीजमनच्या खर्चाने! सर्व प्रकारचे खेळ! सर्व शिक्षकांसाठी सेव्हन बेल्समध्ये रात्रीचे जेवण [दरडोई वीस पौंड असा अंदाज लोकांनी केला.] दरवर्षीसाठी एक सुट्टीचा व मेजवानीचा दिवस ठरवला गेला. आणि दुसरा म्हणजे म्हाताऱ्या चीजमनचा वाढदिवस --- .

धर्मगुरूने या सर्वाला परवानगी द्यावी म्हणून लोकांनी जोरदार मागणी केली. हे सगळे म्हाताऱ्या चीजमनच्या खर्चाने!

आणि आम्ही मुले सेव्हन बेल्सच्या बाहेर घोषणा देऊन आत गेलो नाही का? ओहो, नाही!

पण याशिवाय अजून काही होते. पुढील गोष्टी सांगणाऱ्याकडे बघू नका. कारण अजून बऱ्याच गोष्टी आहेत. असे ठरले, की दुसऱ्या दिवशी मंडळाने जेनबरोबर सभा घेऊन मग सर्व संपवावे. जेनला काय वाटले असेल? आपले लोक लांब

चेहरा करून म्हणाले, “काय? ती कायमची गेली?” आणि त्याना असेच उत्तर मिळाले, “हो, नक्की.” तिच्या घरच्या लोकांनी अजून काही सांगितले नाही. बऱ्याच वेळाने पहिल्या मुलाने धर्मगुरूला विचारले की आपली जुनी मैत्रिण जेन खरेच गेली का? धर्मगुरू कडकपणे म्हणाला, “हो, मिस पिट्ट गेली.” जेनला मिस पिट्ट म्हणण्याची कल्पना! काहीजण म्हणाले तिला म्हाताऱ्या चीजमनचे पैसे घेण्याच्या वाईट कारणाने दूर पाठवले गेले. इतर काहीजण म्हणाले वर्षाला दहा पौंड घेण्याचे ठरवून ती म्हाताऱ्या चीजमनच्या सेवेसाठी गेली. आमच्या लोकांना एवढेच समजले, की ती गेली.

दोन तीन महिन्यानंतर जेव्हा एका दुपारी, एक उघडा टांगा गावाच्या सीमेपार असलेल्या क्रिकेटच्या मैदानावर थांबला, तेव्हा त्यातून एक सभ्य गृहस्थ व एक बाईसाहेब उतरले. ते खूप वेळ खेळ बघत बसले. सगळे नियम तोडून, स्काउटमधील तो नाक गळणारा मुलगा येईपर्यंत, कोणीच त्यांच्यासंबंधी फार विचार केला नाही. तो म्हणाला, “ती जेन आहे! दोन्ही संघातले अकराजण खेळ पूर्णपणे विसरले व टांग्याजवळ गर्दी करत पळाले. ती जेन होती! तिने हनुवटीखाली रिबिनीने बांधलेली टोपी घातली होती. आणि तुमचा माझ्यावर विश्वास बसणार नाही. पण जेनने म्हाताऱ्या चीजमनशी लग्न केले होते.

भिंतीचा उंच भाग व बुटका भाग जिथे मिळत होते, तिथे टांगा थांबला होता. सगळी मुले त्यांच्याकडे बघत होती. ती आता नेहमीची गोष्ट झाली. त्यात एक सभ्य गृहस्थ व एक बाईसाहेब असे दोघे होते. ते आजूबाजूला बघत होते. नेहमी तो सभ्य गृहस्थ म्हाताऱ्रा चीजमन व बाईसाहेब जेन होती.

मी पहिल्यांदाच दोघांना बघितले. मग मी त्याना त्या वाटेत बघितले. नंतर आमच्या मुलांमध्ये खूप चांगले बदल झाले. असे समजले की बॉब टार्टरचे वडील लखपती नव्हते. ते कोणीच नव्हते. बॉब सैनिक झाला आणि म्हाताऱ्या चीजमनने त्याला सैन्यातून बाहेर पडण्यासाठी पैसे दिले. टांगा थांबला आणि तो पाहून, सगळे थांबले.

बाईसाहेब हसून म्हणाल्या, “म्हणजे तुम्ही मला कधीच वाळीत टाकणार नव्हतात तर!” सर्व मुलांनी तिच्याशी हस्तांदोलन करण्यासाठी भिंतीजवळ गर्दी केली. “तुम्ही हे कधीच करणार नव्हतात का?”

सगळीकडून आवाज आला, “कधीच नाही! कधीच नाही! कधीच नाही!”

तिला काय म्हणायचे होते, ते मला तेव्हा समजले नाही. पण आता समजले. मी तिचा चेहरा पाहून खूश झालो. तिच्या

चांगल्या वागण्याने, मी तिच्या --- व त्याच्याही --- चेहऱ्यावरून --- नजर हटवू शकलो नाही. सगळ्यांनी मोठ्या आनंदाने त्यांच्याभोवती गर्दी केली होती.

मी एक नवीन मुलगा म्हणून त्यांचे माझ्याकडे लक्ष गेले. त्यामुळे मी पण भिंतीजवळ जाऊन इतरांसारखा त्यांच्याशी हातमिळवणी करायचा विचार केला. मी देखील त्यांना बघून इतरांइतकाच आनंदी झालो. क्षणार्धात मी त्यांच्या ओळखीचा झालो.

म्हातारा चीजमन म्हणाला, “आता सुट्टीला फक्त पंधरा दिवस राहिले आहेत. ती कोण थांबवणार? आहे कुणाची शामत?”

बरीच बोटे माझ्याकडे वळली आणि बरेचजण ओरडले, “तो ते करेल.” कारण मी सांगू शकतो, की तेव्हा तुम्ही सगळे दूर होतात आणि मी जवळ होतो.

म्हातारा चीजमन म्हणाला, “ओहो, पण तो इथे सुट्टीमध्ये एकाकी आहे. त्याने आमच्याकडे आलेले बरे.”

त्यामुळे मी त्यांच्या आनंदी घरी गेलो. तिथे मी जितका असू शकेन तितका आनंदी झालो. मुलांशी कसे वागावे, हे त्यांना समजत होते. उदाहरणार्थ, जेव्हा ते मुलाला खेळायला नेत, तेव्हा

खेळ सुरु झाल्यावर नेत नसत किंवा तो संपायच्या आधी आणत नसत. मुलाला कसे वाढवावे, हे त्यांना कळत होते. त्यांच्या स्वतःकडे पहा. जरी म्हातारा चीजमन अजून फार मोठा नसला, तरी तो केवढा जाणता मुलगा होता. मिसेस व मिस्टर चीजमन यांच्या खालोखाल मला छोटा चीजमन आवडे.

तर अशा तऱ्हेने मी तुम्हाला मला म्हाताऱ्या चीजमनबद्दल जेवढे माहिती आहे तेवढे सर्व काही सांगितले आणि मला वाटते, ते फार जास्त नव्हते, नाही का?

# Doctor Marigold
# डॉक्टर मेरीगोल्ड



मी चीप जॅक आहे आणि माझ्या वडिलांचे नाव विल्यम मेरीगोल्ड होते. काहीजणांना आयुष्यभर वाटत होते, की त्यांचे नाव विलियम आहे. पण माझे वडील सतत म्हणत असत की

नाही ते विल्यम आहे. या वादावर मी असा तोडगा काढला होता, की जर स्वतंत्र देशात एखाद्याला स्वतःचे नाव जाहीर करायचा अधिकार नसेल, तर गुलामीमध्ये त्याला माहिती करून घ्यायचा कितीसा अधिकार असेल? या प्रश्नाकडे नोंदणीच्या माध्यमातून पाहिले, तर विल्यम मेरीगोल्ड हे नाव नोंदणीच्या पूर्वी अस्तित्वात आले --- आणि त्याच्या पारही गेले. जर ते त्या नावाच्या आधी अस्तित्वात असते, तर ते त्याच्याशी फारसे सुसंगत नसते.

मी राणी महारस्त्यावर जन्मलो. पण त्यावेळी तो राजाचा महारस्ता होता. माझ्या आईसाठी माझ्या वडीलांनी डॉक्टर आणले होते. ते दयाळू सभ्य गृहस्थ होते. बाळंतपण सर्वसाधारण स्वरूपाचे असून त्यांनी फी घेतली नाही. पण एक चहाचा ट्रे घेतला. बक्षीस व ऋणाच्या भावनेतून, माझे नाव डॉक्टर ठेवण्यात आले. असा मी डॉक्टर मेरीगोल्ड म्हणून जन्मलो.

सध्या मी एक मोठ्या चणीचा, मध्यमवयीन, पातळसर शर्ट, पँट व कितीही वेळा दुरुस्त केला, तरी व्हायोलीनच्या तारांसारख्या त्याच्या नाड्या मागेच जाणारा, हातवाला कोट घातलेला, माणूस आहे. व्हायोलीन वाजवणाऱ्या माणसाला तुम्ही व्हायोलीन लावण्यासाठी, तारा पिळताना पाहिले असेल. जणू काही तो त्या व्हायोलीनची, ते बिघडल्याची गुप्त कुजबुज ऐकतो

व व्हायोलीन बेसूर वाजते. तसे माझा कोट आणि व्हायोलीनमध्ये साम्य आहे.

मला पांढरी टोपी व गळयाभोवती लपेटलेली सैलसर पांढरी शाल आवडते. बसणे हे माझे आवडते आसन आहे. व्यक्तिगत दागिन्यात, मला मोती आवडतात. तिथे मी अगदी हरवून जातो.

डॉक्टरांनी चहाचा ट्रे घेतल्यामुळे, तुम्ही अंदाज केला असेल, की वडील माझ्यापुढे स्वस्त जॅक ठरले. बरोबर आहे. तसेच झाले. तो छान ट्रे होता. त्यात चर्चमध्ये जाण्यासाठी, वळणावळणाच्या रस्त्याने डोंगर चढणारी एक बाई दाखवली होती. दोन हंस पण त्याच उद्देशाने चालले होते. मी तिला मोठी बाई म्हणतो, तेव्हा ते रुंदीच्या संदर्भात नव्हे. असे असते, तर ती माझ्या नजरेतून उतरली असती. पण मी ते उंचीच्या बाबतीत म्हणत होतो व नाजूकपणाबाबतही! थोडक्यात ती उंच व नाजूक होती.

मी निरागसपणे डॉक्टरांच्या दवाखान्यातील टेबलावर उभा राहून, हास्याचे [किंवा जास्त करून भोकाड पसरण्याचे] कारण बनत असे, तेव्हा मी तो ट्रे तिथे नेहमी पाहिला होता.

माझे स्वतःचे आईवडील जिथे असतील, तिथे मी माझे डोके [त्या वेळी मी माझ्या आईला असे म्हणतांना ऐकले आहे की सोनेरी कुरळे डोके, जरी तुम्हाला हे माहिती नसले की त्यापासून

बनवलेल्या शेकोटीच्या झाडूच्या दांड्यापर्यंत जाईस्तोवर, तो मी नसे.] डॉक्टरांच्या दारात घालत असे. डॉक्टर मला बघून नेहमी आनंदी होत, म्हणत असत, “ओहो, माझ्यासारखा दवाखाना चालवणाऱ्या माझ्या भावा, छोट्या M. D., सहा पेनीच्या नाण्याबद्दल तुझे काय मत आहे?”

तुमचे जीवन असे सतत चालणार नाही. माझे वडील व आई, दोघांच्याही बाबतीत हे खरे होते. जेव्हा जाणे योग्य असेल, तेव्हा जर तुम्ही पूर्णपणे लांब गेला नाहीत, तर तुम्हाला आजारी पडत, कण्हत कुंथत, जावे लागेल. हळूहळू माझे वडील त्यांच्या मार्गाने गेले व आई तिच्या मार्गाने गेली. हे कुणालाही काही त्रास न होता झाले. मी त्यांना पुरले तिथे कुटुंब संपले. जेव्हा जेवणासाठी टेबलावर कापड घातले जायचे, माझे वडील ताटल्या वाजवू लागत. तसे आम्ही आमचे काचसामान लिलावात काढत असू तेव्हा करत असू. पण त्यांनी त्यातली युक्ती गमावली होती. बहुतेक वेळी ते ते सामान पाडून मोडून टाकत. म्हातारी बाई जशी गाडीत बसेल व एकेक नग काढून पदपथावरील म्हाताऱ्याकडे विकायला देईल, तशाच तऱ्हेने तिने सकाळपासून रात्रीपर्यंत कुटुंबातील प्रत्येक वस्तू त्याला दिली व त्यांच्या कल्पनेप्रमाणे त्यांनी तिची वाट लावली. शेवटी म्हातारा त्याच खोलीत म्हातारीबरोबर अंथरुणाला खिळला, तेव्हा दोन दिवस गप्प राहिला, पण नंतर आक्रोश करून रडू लागला. “आता इथे गावात

भरणाऱ्या व कोबी आणि कात्रीच्या चिन्हाने चालणाऱ्या कोकीळ क्लबमधील माझ्या आनंदी मित्रांपैकी प्रत्येकजण, जोरात गाणे गात असतांना, जल्लोष करत असतील --- प्रत्येकजण, आवाज आणि कान या बाबतीत, वापरलेल्या दाताशिवाय व प्रत्येक हाडातील दुःखाशिवाय, त्यांच्या डोक्यातील म्हाताऱ्या चीप जॅकचा कित्ता गिरवत, असे आयुष्य चांगले नाही, तरी बरेच म्हणायचे. अती वाईट असण्यापेक्षा, थोडेच वाईट म्हणायचे. आणि अती जीर्ण असण्यापेक्षा, नवेच म्हणायचे, असे म्हणत असतील. ती म्हाताऱ्या चीप जॅकची लिलावातील प्रतिकृतीच म्हणायची. त्याच्या वेळी सेलमधील वस्तू विकतांना व लिलावाच्या वेळी किंमत पुकारताना, त्याने खरेखुरे सत्य बाहेर काढण्यापेक्षा, बायकांबरोबर बंदुकीची दारू असलेला चहा जास्त प्यायला असेल. त्या वेळेपर्यंत अनेक हजार मैलांना राष्ट्रीय कर्जाने भागून, येईल त्यापेक्षा जास्त इतक्या संख्येने चंद्राजवळ उंच जात, दोन आणि तीन यामधील दराने गरिबांना काहीच मिळाले नसेल.

आता माझे ओकचे हृदय आणि काड्यांची माणसे [माल]यांच्याबद्दल तुम्ही काय म्हणाल? दोन शिलिंग, एक शिलिंग, दहा पेनी, आठ पेनी, सहा पेनी, चार पेनी, दोन पेनी? कोण म्हणाले दोन पेनी? बुजगावण्याची टोपी घातलेला सभ्य माणूस? मला तुमची लाज वाटते. मला लोकांच्या पाठींब्याची

आस धरणाऱ्या त्याची, खरेच लाज वाटते. आता मी तुमच्याबरोबर काय करणार, ते सांगतो. या! तू इतका मागासलेला असल्याबद्दलचा तुझा टोकाचा राग मी सहन करू शकत नाही.

तुम्ही असा लिलाव पुकाराल, तर तुमच्या गावाची पत कमी होईल. मी तुला गरम तव्यावर फेकून देईन व तुला जन्मभराची अद्दल घडवेन. आता ये.

मी तुमचे अनेक वर्षांपूर्वी चीप जॅकशी लग्न केलेल्या म्हातारीच्या प्रतिकृतीमध्ये रुपांतर करून टाकेन. माझे शब्द लक्षात ठेवा. प्रलयानंतरच्या नेहाच्या होडीत एकशिंगी गेंड्याने त्याच्या शिंगांवर मंगलाष्टकांची धून वाजवण्याआधी, ते झालेले असेल. आता बघा! या! दोघांबद्दल आता काय म्हणाल? मी आता तुला काय करतो बघ. असे बघ! जर तू माझा लिलाव पुकारलास, तर गावात तुझीच नाचक्की होईल. या छानशा वक्तव्यानंतर आता तू काय बोलतोस? बोल, दोन पौंड, तीस शिलिंग, एक पौंड, दहा शिलिंग की पाच? की तेवढेही नाही? एवढ्या कमी किमतीत सौदा पटणार नाही. जर तू दिसायला पुरेसा चांगला असतास, तर मी तुला लगेच सगळे देऊन टाकले असते. इकडे बघ. ए बाई, म्हातारा म्हातारीला गाडीत फेका. त्याना लांब घेऊन जा व पुरून टाका. असे माझ्या वडिलांचे विल्यम

मेरीगोल्ड्चे शब्द होते. माझी आई आणि तो, त्याच दिवशी दूर निघून गेले. मी शोक करत त्यांच्यामागे गेलो.

त्यांच्या मरणाबद्दलच्या निरीक्षणाने ते सिध्द केल्याप्रमाणे, त्या चीप जॅकच्या काळात माझे वडील प्रेमळ होते. पण मी वरकडी केली. मी म्हणून हे म्हणत नाही. तुलना करणाऱ्या सगळ्यांनी याला जागतिक मान्यता दिलेली आहे. मी त्याचा अभ्यास केला आहे. इतर लोकमान्य वक्त्यांबरोबर --- संसद सदस्यांबरोबर, मंचावरून भाषण देणाऱ्यांबरोबर मी स्वतःला मोजले आहे --- आणि मला असे आढळून आले आहे की ते चांगले आहेत. मी त्यांच्याकडून थोडी कल्पना उचलली आहे. जे मला वाईट वाटले आहेत, त्यांना मी सोडून दिले आहे. आता मी तुम्हाला काय ते सांगतो. मी माझ्या थडग्यातून हे सांगेन, की ग्रेट ब्रिटनमधील सर्व शिव्यांमध्ये चीप जॅकच्या शिव्या सर्वात वाईट आहेत. आपण व्यावसायिक का नाही? आपल्याला विशेष अधिकार का बहाल केलेले नाहीत? राजकीय फेरीवाल्यांकडून तशी काही अपेक्षा नाही. पण मग आपल्याला फेरीवाल्याचे परवानापत्र का घ्यावे लागते? आपल्यात व त्यांच्यात काय फरक आहे? फक्त आपण चीप जॅक आहोत. ते लाडके जॅक आहेत. मला तर काही फरक दिसत नाही. पण आपल्या बाजूने काय आहे?

इकडे बघा! मतदानाचा काळ आहे. मी शनिवारी रात्री बाजारात माझ्या गाडीवर उभा राहून, वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू विकत होतो. मी बोलत होतो, “इथे लक्ष द्या. माझ्या स्वतंत्र मतदार बंधू भगिनीनो, मी तुम्हाला असे काही देणार आहे, की जे तुम्हाला यापूर्वी कधीच मिळाले नसेल व पुढेही मिळणार नाही. आता मी काय करणार आहे, ते तुम्हाला दाखवतो. इथे तुमची दाढी नेहमीपेक्षा चांगली करेल, अशी वस्तऱ्याची एक जोडी आहे. वजनाने सोन्याच्या बरोबरीचे असणारे एक लोखंडी पाते आहे. इथे एक फ्राइंग पॅन आहे. त्याला कृत्रिम रीत्या गाईच्या मासाचा वास अशा तऱ्हेने दिलेला आहे, की आयुष्यभर तुम्ही त्यात पाव भाजून त्या वासाचा अनुभव घेऊ शकता. इथे चांदीच्या केसमध्ये तापमान, हवेचा दाब व हवेतील आर्द्रता याचा परिणाम न होणारे घड्याळ आहे. तुम्ही रात्री उशीरा सभेहून परत आलात तर त्याने तुम्ही दारावर टकटक करून बायको व मुलांना उठवू शकता. पोस्टमनची पण दारावर टकटक करण्यापासून सुटका होऊ शकते.

इथे सहा ताटे आहेत. तुमचे मूल रडत असेल, तर त्याला ती वाजवून तुम्ही शांत करू शकता. थांबा. मी अजून वेगळी वस्तू काढून देतो. ही फिरणारी पिन आहे. बाळाला दात येत असतांना, त्याने ती तोंडात घालून हिरड्यांवर हळूच फिरवली, तर त्याला दोन दात येऊन ते हसू लागेल. परत थांबा. मी वेगळी वस्तू

दाखवतो. कारण मला तुमचे नेत्रकटाक्ष आवडत नाही आहेत. तुम्हाला काही वस्तू आकर्षक वाटत नाही आहे. इथे आरसा आहे. त्यात तुम्ही जोपर्यंत लिलाव करत नाही, तोपर्यंत किती कुरूप दिसता, ते बघा. आता तुम्ही काय म्हणाल? बोला. किती एक पौंड? तुम्ही नाही, तुम्हाला ते समजले नाही. किती दहा शिलिंग म्हणता आहात का? नाही. कारण तो विक्रेता ते तेवढ्या कमी किमतीला देणार नाही. तर मग, मी तुमच्याबरोबर काय करतो, ते सांगतो. मी या सगळ्या वस्तू गाडीवरील ढिगात ठेवतो --- त्या बघा. त्या तिथे आहेत. वस्त्रे, चपटी घड्याळे, ताटे, फिरणारी पिन, चार शिलिंगला घ्या. आणि या त्रासाबद्दल तुम्हाला सहा पेनी देतो. असा मी चीप जॅक आहे. पण सोमवारी सकाळी, बाजारातील त्याच ठिकाणी, घाईने जॅक येतो. आणि काय म्हणतो? माझ्या स्वतंत्र मतदार बंधू भगिनीनो, मी तुम्हाला अशी काही संधी देणार आहे, [तो माझ्यासारखीच सुरवात करतो.] जशी तुम्हाला कधी आयुष्यात मिळाली नसेल आणि ती अशी की मला संसदेत पाठवणे. आता मी तुमच्यासाठी काय करणार आहे, ते सांगतो. या पृथ्वीच्या सांस्कृतिक व असांस्कृतिक भागापैकी या मोठ्या गावात रुची घेऊन, मी तुमच्यासाठी रेल्वे येथून शेजारील गावाला जोडतो आहे. इथे ब्रिटानिया तुम्हाला हसते आहे. इथे युरोपचे डोळे तुमच्याकडे लागले आहेत. इथे तुम्हाला जागतिक भरभराटीची संधी आहे.

इथे प्राणिज पदार्थांची, मक्याच्या सोनेरी शेतांची, आनंदी घरगुती तबेल्यांची चंगळ असेल. तुम्ही मनापासून टाळ्या वाजवत रहाल. हे सगळे तुम्हाला मिळेल, असा मी आहे. तुम्ही मला निवडून द्याल का? नाही म्हणता? मग मी काय करेन, ते तुम्हाला सांगतो. तुम्ही जे मागाल, ते मी देईन. चर्चवरील व बार्लीवरील कर कमी करेन. जास्तीत जास्त जणांना जागतिक शिक्षण, कमीत कमीजणांकडे जागतिक दुर्लक्ष, सैन्यात सक्तीची भरती थांबवणे व सर्वत्र महिन्यातून प्रत्येकाला एकदा खासगीपणे एक डझन भेटवस्तू! पुरुषांच्या चुका आणि बायकांचे बरोबर असणे --- फक्त सांगा यापैकी काय खरे असेल. मग ते तुम्हाला घ्यायचे तर घ्या किंवा सोडून द्या. मी तुमचा आहे व तुमच्या मतांवर अवलंबून आहे. तुम्ही स्वतंत्र मतदार आहात. मला तुमचा अभिमान आहे. तुम्ही उमदे आणि बुद्धिमान आहात. तुम्ही निवडून दिलेला लोकसभेचा मान्यवर सभासद होण्याची माझी महत्त्वाकांक्षा आहे. मानवी मनाचे पंख जिथपर्यंत पोचू शकतात अशी ती सर्वात उंच जागा आहे --- मी तुम्हाला सांगतो, मी तुमच्यासाठी काय करेन. तुमच्याकडून काही न घेता, मी तुम्हाला सरकारी कार्यालयात नोकऱ्या देईन. त्याने तुमचे समाधान होईल का? नाही? अजून काहीतरी तुम्हाला हवे आहे? ठीक आहे मग मी टांग्यात बसून निघून जाण्यापूर्वी, तुम्हाला सांगतो, मी तुमच्यासारख्याच पुढच्या मोठ्या गावाला जाऊन, हेच सांगेन. तुम्हाला सांगतो, मी काय

करेन. तुमच्या गावात मी दोन हजार पौंड रस्त्यावर ओतेन. ज्यांना मिळतील त्यांना मिळतील. काय म्हणता? तेवढे पुरेसे नाहीत? आता असे बघा ही माझी मर्यादा आहे. यापुढे मी जाऊ शकत नाही. फार तर मी दोन हजार पाचशेपर्यंत ताणू शकेन. तरीही तुमचा नकार असेल, तर मग चला, घोडे जोडा --- काय म्हणता? क्षणभर थांबा. मलाही तुमच्याकडे पाठ फिरवणे आवडणार नाही. चला. मी माझी बोली दोन हजार सातशे पन्नासपर्यंत वाढवली. ठीक आहे? तुमचे तर तुमचे खरे! मी इथल्याइथे गाडीत बसून पैसे मोजतो. आणि तुमच्या मोठ्या गावाच्या रस्त्यांवर ओततो. ज्यांना मिळतील त्यांना मिळतील. ठीक तर मग? याहून जास्त तुम्हाला मिळणे शक्य नाही, बहुधा कमीच मिळेल. कबूल आहे? हुर्यो! लिलाव झाला. म्हणजे आता मी निवडून येणार.

हे आवडते जॅक्स लोकांना धुवून लाज आणतात. पण आम्ही चीप जॅक्स असे करत नाही. आम्ही त्याना त्यांच्या तोंडावर त्यांच्याबद्दल खरे सांगतो. त्याना कःपदार्थ समजतो. धापा टाकणाऱ्या जनसमुदायाला तोंड देण्याच्या कठीण प्रसंगी, आवडते जॅक्स आम्हाला धुवून काढतात/हरवतात. चष्मा सोडला, आमच्या गाडीतील बंदूक सोडून कुठल्याच वस्तूने, चीप जॅकचा हाका मारण्याचा सतत ठोकठोक असा आवाज येऊ शकला नसता. मी नेहमी पाऊण तास हातात बंदूक धरून उभा असतो आणि मला वाटते की मला कधीच ती खाली ठेवायची

गरज भासणार नाही. पण मी जेव्हा त्यांना सांगतो, की बंदूक काय करू शकते आणि तिने काय आणले आहे, तेव्हा आवडते जॅक त्यांच्या बंदुकीची स्तुती करणारी भाषणे ठोकतात मला त्याच्या निम्म्याइतकेही बोलावे लागत नाही. ते त्यांच्या उत्तम बंदूका त्यासाठी रोखतात. शिवाय मी या धंद्यात स्वतः आहे. त्यांच्यासारखा बाजारातून पाठवलेला दलाल नाही. माझ्या बंदुकीना हे माहिती देखील नाही, की मी त्यांच्या स्तुतीपर काय बोलतो. आणि हे त्याना सर्व प्रकारे लज्जित होण्यास व आजारी पडण्यास भाग पाडणारे आहे. ग्रेट ब्रिटनमध्ये चीप जॅकचे हाका मारणे हे वाईट समजले जाते, असे जाहीर रीत्या माझे म्हणणे आहे. त्यांना उबदार करण्यासाठी मी जेव्हा इतर जॅक्सचा विचार करतो, तेव्हा त्यांच्याकडे तुच्छतेने बघण्याचे ढोंग करायचा विचार करतो.

मी माझ्या बायकोबरोबर गाडीवरच प्रेमाने वार्तालाप केला. खरेच सांगतो. ती सफोक राज्यातील तरुण स्त्री होती आणि ते इपस्विच बाजारात घाऊक मकाविक्री करणाऱ्या दुकानासमोर घडले. मागील शनिवारी मी तिला वरती खिडकीत पाहिले आणि मला ती खूपच सुंदर वाटली. मी तिच्याकडे ओढला गेलो. मी स्वतःशीच बोललो, “माझा माल विकला गेला नसेल, तर आता येणाऱ्या शनिवारी मी माझी गाडी त्याच जागी लावेन. मी फारच उत्तेजित झालो होतो. मी ठरवले की, दिवसभर मी भराभरा माल

काढेन व तो सर्व वेळ त्या लोकांना हसत ठेवेन. शेवटी मी [ती वर ज्या खिडकीत होती] तिथे बघून, माझ्या कोटातून थोडे काही काढून, एका मऊ कागदात भरून, म्हटले, ‘सफोकमधील माझ्या उमलणाऱ्या सुंदर इंग्लिश स्त्रियांनो, आजच्या दिवसातील ही शेवटची वस्तू! ही भेट मी फक्त तुम्हाला देतो. तिचा लिलाव करून, कोणाही जिवंत माणसाकडून मी हजार पौंडदेखील घेणार नाही. आता, हे काय आहे? मी हे तुम्हाला सांगतो. हे शुद्ध सोन्याचे बनवलेले आहे. त्याच्यामध्ये भोक असले तरी ते तुटलेले नाही. माझ्याकडील दहाच्या गठ्ठ्यातील सर्वांपेक्षा लहान असले, तरी ते बेड्यांपेक्षा मजबूत आहे. दहाच का? कारण जेव्हा माझ्या पालकांनी त्यांची मालमत्ता माझ्या नावावर केली, तेव्हा, तुम्हाला खरे सांगतो, त्यात बारा चादरी, बारा टॉवेल, बारा टेबल-आच्छादने, बारा मोठे चमचे, बारा लहान चमचे होते. पण मला बोटे दहाच असल्याने तो आकडा जुळत नव्हता. आता अजून काय? या, मी सांगतो.

तो चांदीच्या पत्र्यात गुंडाळलेला सोन्याचा गोल आहे. तो लंडनमधील थ्रेडनीडल रस्त्यावरील सदा सुंदर दिसणाऱ्या वयस्क बाईच्या चकाकणाऱ्या बटेतून, मी काढलेला आहे. जर माझ्याकडे दाखवायला कागद नसता, तर मी हे तुम्हाला सांगितले नसते व तुम्ही माझ्यावर विश्वासदेखील ठेवला नसता. आता अजून काय? ते पूर्ण सोन्यात असलेले, चर्चच्या खजिन्यातील,

माणसाच्या शर्टाच्या हातात व पायात अडकवायचे कफलींग, असे सर्व एकत्रच आहे. आता मी त्याचे काय करणार आहे, ते तुम्हाला सांगतो. त्याचे मी पैसे करणार नाही. उद्या सकाळी बरोबर साडेनऊला, घंटानाद झाल्यावर, तुमच्यापुढे जी सुंदरी हसते आहे, तिला मी ते देणार आहे. आणि तिला घेऊन, मी चर्चमध्ये आमच्या लग्नाची घोषणा करणार आहे. ती हसली आणि तिने अंगठी घेतली. जेव्हा मी सकाळी तिला बोलावले, तेव्हा ती म्हणाली, “प्रिया, तू असा कधीच नव्हतास आणि तुला असे करायचे नव्हते.” मी बोललो, “तो मीच आहे आणि कायम तुझाच आहे. मी नेहमी हे म्हणेन.” तर तीनदा भेटल्यावर, आमचे लग्न झाले. --- चीप जॅकच्या पद्धतीने झाले. चीप जॅकच्या पद्धती कशा पसरतात हे पुन्हा एकदा दाखवले गेले.

ती काही वाईट बायको नव्हती. पण ती रागीट होती. जर देवाला बळी देतांना, तिची त्या अंगठीपासून फारकत झाली असती, तरी मी तिला इंग्लंडमधील कुठल्याही बाईच्या बदल्यात सोडले नसते. ती मरेपर्यंत, आम्ही एकत्र राहिलो. आणि ते तेरा वर्षे चालले.

माझे उमराव, बाईसाहेब आणि सभ्य लोकहो, जरी तुमचा विश्वास बसणार नाही, तरी मी तुम्हाला एक गुपित सांगतो. अशा रागीट बाईबरोबर राजवाड्यातील वर्षे फार वाईट गेली असती.

पण गाडीतील वर्षे छान गेली. गाडीत तुम्ही इतके जवळ बसता, की हजारो गोड जोडपी असतील, तरी त्यातील फक्त पाच सहाच घटस्फोट घ्यायला निघालेली दिसतात. गाडीत वेडेवाकडे ढकलले गेल्याने त्यांची अजून वाईट दशा होते. मला ठरवता येत नाही, गाडीतले घरी येतेच. गाडीतील रक्तरंजितपणा इतका रक्तरंजित असतो व गाडीतील अगोचरपणा इतका अगोचर असतो, की आपल्याला क्वचितच असे आल्हादक आयुष्य मिळेल! मोठ्या गाडीबाहेरील बाजूस लटकलेला माल, रस्त्यावर असतांना त्याखाली सरकवलेला पलंग, लोखंडी भांडे व किटली, थंडीसाठी शेकोटी, धूर जायला धुराडे, टांगती मांडणी, कपाट, घोडा आणि कुत्रा. अजून काय हवे? हिरव्या गल्लीत तुम्ही कडेला थांबता. म्हाताऱ्या घोड्याला वेडेवाकडे चालायला सोडता, शेवटी इथे भेट देऊन गेलेल्या पाहुण्याच्या शेकोटीच्या राखेत, तुम्ही तुमची शेकोटी पेटवता. तुमचे अन्न शिजवता आणि फ्रान्सच्या सम्राटाला तुम्ही तुमचे वडील म्हणत नाही. गाडीत तुम्ही चिडलेले असता. बोचरी भाषा वापरता. तुमचा माल सर्वात कडक असतो आणि तुम्ही तेव्हा कुठे असता? तुमच्या भावनांना नाव द्या.

माझ्या कुत्र्याला माझ्यासारखेच माहिती असते, की ती केव्हा तिथे असते आणि ती ओरडायला लागण्यापूर्वी तो केकाटू लागतो आणि थांबतो. मला आश्चर्य वाटते की त्याला ते कसे कळते. पण

त्याच्या गाढ झोपेतून ती खात्रीची माहिती त्याला जागे करते. मग तो केकाटतो आणि थांबतो. अशा वेळी मला वाटते, मी तो कुत्रा हवा होतो.

त्यातला सर्वात वाईट भाग म्हणजे, आम्हाला मुलगी झाली आणि मी लहान मुलांवर मनापासून प्रेम करतो. ती जेव्हा रागावलेली असते, तेव्हा ती मुलीला मारते. मुलगी चार पाच वर्षांची होईपर्यंत, हे इतके धक्कादायक होते. त्यासाठी मी बरेच वेळा खांद्यावर व म्हाताऱ्या घोड्याच्या डोक्यावर चाबूक ठेवत असे. मग तो कुत्रा छोट्या सोफीपेक्षा जास्त जोरात हुंदके देऊन रडत असे. नाहीतर मी ते कसे थांबवणार होतो? गाडीमध्ये अशा मनस्थितीत अशी गोष्ट, भांडण केल्याशिवाय, करून बघता येत नाही. अशा मारामारीला प्रवृत्त करणे, हे गाडीच्या बाबतीत नैसर्गिक होते. आणि मग मूल पूर्वीपेक्षा अधिकच घाबरते व दुखावले जाते. तिची आई पुढे भेटणाऱ्या लोकांकडे तक्रार करते. मग असे बोलले जाते, "तो दुर्दैवी चीप जॅक बायकोला मारत असल्याचे वाईट दृष्य बघा."

छोटी सोफी इतकी शूर मुलगी होती! जरी मला तिच्याकडे लक्ष द्यायला वेळ नसे, तरी ती लहानपणापासून तिच्या वडिलांशी पूर्णपणे एकनिष्ठ होती. तिचे काळेभोर केस चमकत असत. त्या बटा तिचा चेहऱ्याभोवती पसरलेल्या असत. ती तिच्या आईकडून

गाडीकडे धावत सुटे, तेव्हा तिची आई तिला केस धरून पकडत असे आणि खाली पाडून ठोकून काढत असे, तेव्हा मी फार क्रोधित कसा होत नसे, याचे मला याचे आश्चर्य वाटते.

त्यामुळे मी म्हणत असे, की ती शूर मुलगी होती.

ती कुजबुजत्या स्वरात मला म्हणे, “प्रिय पपा, पुढच्या वेळेस तुम्ही काळजी करू नका. जर मी रडले नाही, तर तुम्हाला समजेल की मला फारसे लागलेले नाही आणि जरी रडले, तरी ते आईने मला अजून मारू नये म्हणून असेल.” तिचा लहानसा चेहरा अजून लाल असे व चमकते डोळे ओले असत.

पण इतर बाबतीत तिची आई तिची चांगली काळजी घेई. तिचे कपडे नेहमी स्वच्छ व नीटनेटके असत. त्यांची काळजी घेतांना ती कधीच थकत नसे. अशी विरोधाभासातील गंमत आहे. आमच्या वस्तीत दलदल असल्याने व हवा चांगली नसल्याने, सोफीला बारीक ताप येत असे. तो ताप ती कसाही सहन करत असली, तरी एकदा ती तिच्या आईपासून इतकी लांब गेली, की ती तिला हातही लावून देईना व काही केल्या तिची समजून पटेना. आई तिला काही करायला बघू लागली, तर ती थरथरून म्हणे, “नाही, नाही, नाही.” तिचा चेहरा माझ्या खांद्यावर लपवित माझ्या मानेभोवती हात टाकून, मला घट्ट पकडून ठेवे. मला माहिती होते, त्यापेक्षा चीप जॅकचा व्यवसाय फारच वाईट होता.

एका गोष्टीबरोबर एका प्रकारचा तर व दुसऱ्या गोष्टीबरोबर वेगळ्या प्रकारचा! [रेल्वे रूळांसारखा सरळ जराही नाही व त्यामुळे शेवटी सगळ्या चिंध्या होऊन जाण्याची मी अपेक्षा करे.] आणि माझे पैसे संपून जात. त्या कारणाने एका रात्री, सोफीची वेळ चांगली नसतांना, खाण्यापिण्याची भ्रांत होऊ लागली किंवा मला गाडी सोडून द्यावी लागली आणि ते मी केले.

मला माझ्या लाडकीला झोपवायला किंवा सोडून जायलाही जागा राहिली नाही. तेव्हा तिने माझ्या मानेला मिठी मारलेल्या अवस्थेत मी फुटपाथवर आलो. आम्हाला बघून सगळे हसू लागले. आम्हाला बघून एक मूर्ख माणूस जोस्कीन [त्यामुळे मी त्याचा द्वेष करे.] बोलला, "दोन कवड्या किमतीची"

माझे हृदय जड होऊन एका दोऱ्याला टांगते आहे, असे वाटून मी बोललो, "ए गधड्या, मी तुला धमकी देतो, की मी तुझ्या खिशातील पैसे नाहीसे करणार आहे व तुला एवढे पैसे देणार आहे की तुझा शनिवारचा रोजगार तू मला भेटायच्या आशेवर मला कुर्बान करशील. असे तू कधीच करणार नाहीस. आणि का नाही? कारण मी शेकडा पंच्याहत्तर टक्क्याने मोठ्या प्रमाणात माल विकून माझे नशीब बनवले आहे. त्यामुळे पुढील आठवड्यात मी आता तुम्हा सर्वांपेक्षा चांगले, उमरावाच्या तोडीचे घर घेणार आहे. आता तुला आज रात्री काय हवे आहे, ते

बोल, मी ते देईन. पण पहिल्यांदा मला हे तुला सांगू दे की या लहान मुलीने माझ्या मानेभोवती हात का टाकले आहेत? तुला माहिती करून घ्यायचे नाही का? तरी मी सांगतो. ती परी आहे.

तिला भविष्यवाणी सांगता येते. तुझा माल विकला जाणार आहे की नाही, हे ती कुजबुजून मला सांगू शकते. आता तुला करवत हवी आहे का? ती नाही म्हणते आहे. कारण ती वापरायला तू फार अडाणी आहेस. इथे एक चार शिलिंग किमतीची करवत आहे, ज्यामुळे एखाद्या हुशार माणसाचे आयुष्याचे वरदान ठरू शकते. चार शिलिंग, साडेतीन, तीन, अडीच, दोन, दीड. पण तुमच्यापैकी कुणालाच ती कुठल्याही किमतीला मिळणार नाही, कारण तुम्ही अडाणी आहात. त्यामुळे ती मनुष्यवध करू शकेल. तीच गोष्ट या तीन विमानानाही लागू आहे. ती पण मी तुम्हाला देणार नाही. त्यामुळे त्याची मागणी करू नका. आता मी तिला विचारणार आहे, की तिला काय हवे आहे. [मग मी पुटपुटतो, "माझ्या लाडके, मला भीती वाटते, तुझे डोके इतके तापले आहे की त्याचा तुला त्रास होईल. ती तिचे मोठे डोळे न उघडता उत्तरते, "बाबा, ते इतके काही तापलेले नाही.]

"ती छोटी भविष्यवेत्ती म्हणते आहे, की तिला माहितीपुस्तक हवे आहे." "मग तू मागितले का नाहीस? हे घे. बघ. यात नीटनेटक्या पद्धतीने माहिती मांडलेली दोनशे पाने आहेत --- तुझा

विश्वास नसेल तर, मोजून बघ. तुझ्यासाठी त्यात आखलेल्या ओळी आहेत. लिहिण्यासाठी टिकणारी टोकदार पेन्सिल आहे. खोडरबर आहे. तुमची आवक काढण्यासाठी, आखलेले तक्ते आहेत. बसण्यासाठी स्टूल आहे. थांब. आणि अंधाऱ्या रात्री चंद्रापासून बचाव करण्यासाठी छत्री आहे. आता एवढ्या सगळ्या वस्तूंसाठीची किंमत किती कमी आहे, बघ. तुला किती वाटते आहे, ती सांगायला लाजू नको. कारण माझ्या भविष्यवेत्तीला ती आधीच माहिती आहे.”

[मग कुजबुजीवर विश्वास ठेवून मी तिचा पापा घेतला --- तिनेही माझा घेतला.] ती म्हणाली, “तू आम्हाला तीन पेनीसारखे लहान समजतोस.” माझा यावर विश्वास बसेना. तिने सांगितले म्हणून मला हे कळले.

तीन पौंड आणि तीन पेनी! वार्षिक चाळीस हजारच्या उत्पन्नाची आकडेमोड करायला छापलेल्या तक्त्यांचा गठ्ठा! वर्षाला चाळीस हजाराची आवक असेल, तर तुम्ही तीन पौंड व सहा पेनी खुशीने देता. मी तुम्हाला माझे मत सांगतो. मी तीन पेनी इतक्या क्षुल्लक समजतो, की मी लगेच तीन शिलिंग म्हणतो., तीन शिलिंग, तीन शिलिंग! इथे तीन शिलिंगसाठी ते विकले गेले. ते नशीबवान माणसाला द्या”

कोणीच लिलावात भाग घेत नव्हते, नुसते एकमेकांकडे बघून, तोंडभरून हसत होते. मी सोफीच्या चेहऱ्याला हात लावला व विचारले की तिला मलूल वाटते आहे का किंवा मळमळते आहे का? मग आता उघडलेल्या सुंदर, शांत डोळ्यांनी माझ्या प्रकाशित वंगणाच्या भांड्याकडे सोडून इतरत्र काहीही न पाहता, ती बोलली, "फारसे नाही, बाबा. ते लगेच थांबेल." मी परत माझ्या चीप जॅकच्या भूमिकेत शिरलो. "मास विकणारा कुठे गेला?" [माझ्या दुःखी डोळ्यांना नुकताच जाडा तरुण मास विकणारा गर्दीच्या कडेला दिसला होता.] ती म्हणते आहे की मास विकणाऱ्याचे नशीब चांगले आहे. तो कुठे आहे? प्रत्येकजणाने लाजऱ्या मास विकणाऱ्याला पुढे ढकलले. तिथे एकच आवाज उसळला. त्याला त्याच्या खिशात हात घालायला भाग पडल्यासारखे वाटत, त्याने माल काढला. अशा तऱ्हेने त्याच्याभोवती जमलेले लोक सामान्यपणे तो माल विकत घ्यायला सहापैकी चारवेळा बिचकत होते. मग अजून तेवढाच माल काढला गेला. आधीच्यातील राहिलेला. मग अजून माल आला. त्यातील राहिलेला त्याने सहा पेनीने स्वस्त विकला. असे केल्याने फार मजा आली. मग आम्ही चष्मे काढले. तो फारसा नफा होणारा माल नव्हता. पण तरीही मी तो मांडला. मी मनात विचार करत होतो, की राजेशाही खजिन्याचा मुख्य त्यावर किती कर बसवतो. शाल घेतलेल्या तरूण स्त्रीचा प्रियकर घरी काय

करत असेल, धर्मगुरूंच्या घरी काय जेवण असेल, पण सौदा करण्यात ते फार जोशात आले नाहीत. त्यांचा बऱ्यापैकी जोश, लिलावात बऱ्यापैकी किमत घेऊन गेला. मग आम्ही स्त्रियांचा माल काढला --- चहाच्या किटल्या, चहाचे सामान ठेवण्याचा खण, साखरेचा पेला, अर्धा डझन चमचे, वरचा निमुळता भाग व चांदीचे दोन कान असलेले लोकप्रिय कप!

आणि हा सर्व वेळ मी काही कारणे काढून, माझ्या गरीब बिचाऱ्या मुलीशी एखाददोन शब्द बोलत होतो. तेवढ्यात पलीकडील अंधाऱ्या रस्त्यावर पहाण्यासाठी ती माझ्या खांद्यावर चढली. "प्रिय मुली, तुला कसला त्रास होतो आहे?" मी विचारले. तेव्हा ती म्हणाली, "काही नाही, पपा. मला काहीच त्रास होत नाही आहे. पण मला पलीकडे पसरलेले चर्चचे सुंदर अंगण दिसत नव्हते ना, म्हणून मी चढले." "ठीक आहे, लाडके." "पपा, माझा दोनदा पापा घ्या आणि मला चर्चच्या मऊ व हिरव्या अंगणात खाली ठेवा." तिचे डोके खांद्यावरून पडलेले जाणवून, मी गाडीत गरकन वळलो आणि तिच्या आईला म्हणालो, "चल. पटकन दार लाव. त्या हसणाऱ्या लोकांना दिसायला नको!" ती ओरडली, "काय झाले?" मी तिला म्हणालो, "अग बये, तू यापुढे माझ्या छोट्याशा सोफीच्या केसांना धरून कधीच ओढणार नाही आहेस. कारण ती हे जग सोडून, तुझ्यापासून दूर गेली आहे."

कदाचित मला बोलायचे होते, त्यापेक्षा कडक शब्दात मी बोललो असेन. पण तेव्हापासून माझ्या बायकोने, तसे केले नाही. तासनतास ती हाताची घडी घालून व जमिनीकडे बघत, गाडीत बसे किंवा कडेने चालत राही. जेव्हा तिचा रागाचा पारा चढत असे, [हे पूर्वीपेक्षा जास्त वेळा होई.] तेव्हा ते तिच्याकडे नवीन पद्धतीने बघत. ती इतका आरडाओरडा करे, की मला तिला थोपवणे भाग पडे. तिला सतत थोडीशी ब्रँडी किंवा तत्सम काही दिल्याशिवाय ती ताळ्यावर येत नसे. काही वर्षात मला नवल वाटू लागले, की मी म्हाताऱ्या घोड्याच्या डोक्यावर थोपटत, कडेने हळू चालत असतांना, रस्त्यावर खूप गाड्या होत्या, पण त्यादेखील माझ्यासारख्याच मरगळलेल्या होत्या. स्वस्त विक्रेत्यांचा राजा मी नसल्यासारखेच, माझ्या मालाकडे बघितले जात होते. उन्हाळ्यातील एका संध्याकाळपर्यंत आमची आयुष्ये फारच उदासीनतेने भरलेली होती. आम्ही एका स्त्रीला मुलीला दुष्टपणे बेदम मारतांना व ती मुलगी असे ओरडताना ऐकले, “आई, अग आई, मला मारू नको”. मग माझ्या बायकोने कान झाकून घेतले व रानटीपणे पळून गेली. दुसऱ्या दिवशी ती नदीत, मेलेली सापडली.

आता गाडीत मी व माझा कुत्रा दोघेच एकमेकांसोबत राहिलो. जेव्हा लिलाव चालू नसेल तेव्हा थोडेसे भुंकावे, हे कुत्रा शिकला. आणि दुसरे सांगायचे म्हणजे, मी सांगितले की तो मान

हलवायला शिकला. “अर्धा क्राउन कोण म्हणाले? अर्धा क्राउन म्हणालेले तुम्हीच का ते सभ्य गृहस्थ?” त्याने लोकप्रियतेचे उंच शिखर गाठले. गर्दीमधील जो कुणी सहा पेनीने अगदी खालच्या स्तरावरील लिलाव सुरु करेल, त्याच्या अंगावर गुरगुरायचे, हे तो स्वतःचे स्वतः शिकला, यावर मी नेहमी विश्वास ठेवला. काही वर्षात तो चांगलेच शिकला. आणि एका रात्री चष्मा लावून मैदानात मी फिरत असतांना मला फिट आली, तेव्हा त्यालाही तिथेच फळीवर चक्कर आली आणि तो मेला.

नैसर्गिकपणे नाजूक स्वभाव असल्याने, मला त्यानंतर भयानक एकाकी वाटू लागले. माल विकतांना, माझी तशी कीर्ती असल्याने, मी त्या भावनेवर विजय मिळवू शके. पण खासगी परिस्थितीत मी कोसळून पडे व त्या दोघींचे मरण माझ्यावर चाल करून येई. नेहमी लोकांमध्ये वावरणाऱ्यांची अशीच गत होते. आम्हाला माल विकतांना बघा. तेव्हा आम्ही एकदम ठीकठाक वाटत असू. पण त्याहून वेगळे काही करतांना, आम्ही लगेच भावनामय होत असू. त्यावेळी माझी एका राक्षसाशी ओळख झाली. माझ्या एकाकी भावना सोडल्या, तर त्याच्याशी बोलण्यासाठी मी फार उंच असेन. कारण साधारण नियम असा आहे, की देशात फिरतांना, आपल्या पोषाखावर बंधने असावीत. जेव्हा माणूस त्याच्या अनोळखी नसलेल्या पोषाखात स्वतःची पैसे मिळवून बघण्याची क्षमता आजमावू बघतो, तेव्हा तो

तुमच्यापेक्षा कनिष्ठ दर्जाचा ठरतो. या राक्षसाकडे बघितल्यावर तो रोमन वाटत होता. त्याचे डोके लहान असून त्यात कमी अक्कल होती. त्याचे डोळे व गुडघे अशक्त होते. त्याचे सांधे आणि मन मोठे असल्याचे, त्याच्याकडे पाहिल्यावर वाटे. त्याला व्यायामाची अजिबात आवड नसावी हे त्याच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत पसरलेल्या देहाकडे बघून कळत होते. तो घाबरट तरुण मनुष्य असला, तरी मैत्रीपूर्ण होता. [त्याच्या आईने पैसे खर्च करून, त्याला घराबाहेर पडायला लावले होते.] दोन जत्रांच्यामधील घोड्याला शांत करताना तो चालत होता, तेव्हा आमची ओळख झाली. त्याचे नाव पिकल्सन असून त्याला रीनाल्डो दि व्हेलास्को असे संबोधले जाई.]

त्याने मला विश्वासात घेऊन सांगितले, की त्याला स्वतःला स्वतःच्या आयुष्याचे ओझे होण्याव्यतिरिक्त, बहिऱ्या व मुक्या असलेल्या सावत्र मुलीशी मालकाने केलेल्या दुष्टपणामुळे, ते आयुष्य अजूनच ओझे बनले होते. तिची आई वारलेली होती. तिची बाजू घ्यायला तिचे कोणीच कैवारी नव्हते व तिला फार राबवले जात असे. तिला ठेवण्यासाठी कुठली जागा नसल्याने, तिला तिच्या मालकाच्या ताफ्याबरोबर फिरवले जाई. या पिकल्सन नावाच्या राक्षसाची असे सांगण्यापर्यंत मजल गेली व त्याला असे खात्रीपूर्वक वाटत होते, की मालक तिला कुठेतरी हरवून टाकायच्या प्रयत्नात आहे. तो इतका आळशी तरूण मनुष्य

होता, की त्याने किती काळ ही गोष्ट दडवून ठेवली असेल, कुणास ठाऊक! पण यथावकाश ती त्याच्या गुप्तचर वर्तुळातून बाहेर सगळीकडे पसरली.

जेव्हा मी पिकल्सन नावाच्या या राक्षसाकडून हा सर्व वृतान्त ऐकला, त्या मुलीच्या लांब, सुंदर केसांबद्दल ऐकले, त्या केसांना धरून तिला बडवण्यात येते, हे देखील ऐकले, तेव्हा माझ्या मनातील राक्षसाचे चित्र बदलले. माझे डोळे भरल्यामुळे मला तो राक्षस दिसेना. डोळे पुसून मी त्याला सहा पेनी दिल्या. [कारण तो जाडा होता, तितकाच बुटका होता.] त्याने दोन तीन पेनी किमतीची पाणी घातलेली जीन घेतली. त्यामुळे तो इतका उत्तेजित झाला, की त्याने त्याचे आवडते विनोदी गाणे, 'शिव्हेरी शॅकी, हे गार नाही का?' हे म्हणायला सुरवात केली. एक रोमन म्हणून त्याला सिद्ध करण्यासाठी, त्याच्या गुरूने त्याला हे गाणे खूप वेळा शिकवण्याचा निष्फळ प्रयत्न केला होता.

त्याच्या गुरुचे नाव मिम असून तो फार घोगऱ्या व कठोर आवाजाचा होता. माझी व त्याची जुजबी ओळख होती. मी त्या जत्रेला साधा नागरिक म्हणून गेलो होतो. माझी माल भरलेली गाडी मी शहराबाहेर ठेवली होती. माझे इतर गाड्यांची मागील बाजू तपासणे चालू होते. शेवटी एका चिखलाने बरबटलेल्या गाडीसमोर डुलकी काढतांना, मला ती बिचारी मुकी व बहिरी

मुलगी दिसली. मला पहिल्यांदा वाटले की ती रानटी जनावरांच्या खेळामधून निसटली असावी. पण नंतर विचार करताना मला असे वाटले, की जर तिच्यावर दया दाखवून, तिची योग्य प्रकारे काळजी घेतली गेली, तर ती मला मुलीसारखीच होईल. त्या दुर्दैवी रात्री, सोफी तिचे सुंदर डोके माझ्या खांद्यावर पडून, देवाघरी गेली नसती, तर ती वयाने त्या दुर्दैवी मुलीएवढीच असती.

थोडक्यात, मी मिमशी खासगीत बोललो. तो गंभीरपणे शपथा घेणारा भयानक माणूस होता. तो पिकल्सनच्या मालाच्या मध्ये उभा राहून थाळी बडवत होता. मी त्याच्याकडे माझा प्रस्ताव मांडला. तो म्हणाला, "तिचा तुला भार होईल. तू हे झेंगट कशासाठी गळयात घेतो आहेस? त्याच्या भल्यामोठ्या संभाषणाचा मतितार्थ एवढाच होता, की त्याला पट्ट्यांची एक जोडी हवी होती. मी त्याला म्हणालो, "मी तुला उत्तम पट्ट्यांच्या अर्धा डझन जोड्या आणून देतो आणि तिला माझ्याबरोबर घेऊन जातो."

भयानकपणे मिम म्हणाला, "तू म्हणतो आहेस, त्याप्रमाणे मला जेव्हा माल मिळेल, तेव्हा मी विश्वास ठेवेन, त्यापूर्वी नाही." त्याने दुसरा काही विचार करायच्या आत, मी मला करता येईल तेवढी घाई केली आणि व्यवहार पूर्ण केला. त्यामुळे पिकल्सनने निःश्वास सोडला. लांबच्या मार्गाने सरपटणाऱ्या प्राण्यासारखे

लहानशा मागील दारी येऊन त्याने थरथरत, हेलकावत व कुजबुजत आम्हाला निरोप दिला.

मी ताबडतोब तिला माझी मुलगी समजून, कायम माझ्याजवळ ठेवण्यासाठी, सोफीचे नाव देऊन टाकले. आम्ही गाडीतून प्रवास करायला लागलो, तेव्हा ते सोफीसाठी व माझ्यासाठी आनंदाचे दिवस होते. लवकरच आम्ही एकमेकांना समजून घ्यायला लागलो. देवदयेने तिला हे समजले, की मी तिच्या बाबतीत दयाळू व सच्चा आहे. अगदी कमी कालावधीत तिला माझा लळा लागला. कोणी इतके आपलेसे होणे, याचे काय अप्रूप असते, ते तुम्ही कधीतरी एकटेपणा अनुभवल्याशिवाय तुम्हाला समजणार नाही.

जर तुम्ही मला सोफीला शिकवतांना प्रयत्न करतांना पाहिले, तर तुम्ही हसाल --- किंवा उलटे --- ते तुमच्या स्वभावावर अवलंबून आहे. तुम्ही तर्कदेखील करू शकणार नाही, की पहिल्यांदा मला कुठल्या गोष्टींची मदत मिळाली. विंडसरकडे जाताना दिसणारे रस्त्यावरील मैलांचे दगड! मला एका पेटीत मोठी अ, ब, क इत्यादी सर्व अक्षरे सुटीसुटी मिळाली. विंडसरला जातांना मी तिला ती अक्षरे क्रमवार पद्धतीने दिली. मग प्रत्येक मैलावर मी तिला राजप्रासादाकडे निर्देश करणारी तीच अक्षरे, परत त्याच क्रमाने दाखवली. पुढच्या वेळी मी तिला गाडीवर ती

अक्षरे क्रमवार पद्धतीने खडूने लिहून दिली. त्याच्या पुढील वेळी मी तिला डॉक्टर मेरीगोल्ड ही अक्षरे दिली व ती माझ्या कोटावर कोरून ठेवली. आम्हाला भेटणारे लोक आमच्याकडे बघून कदाचित बघत रहात व हसत. पण तिला त्यामुळे शिकता येत असेल, तर मी लोकांची पर्वा का करू? खूप प्रयत्नांती व त्रास घेऊन, ती शेवटी ते शिकली. आणि मग आमचे शिकवणे --- शिकणे सोपे झाले. माझा तुमच्यावर विश्वास आहे. पहिल्यांदा ती गाडी व राजप्रासादाकडे निर्देश करणारे आधार घेत शिकली.

आम्ही आमच्या खुणाही ठरवल्या. त्या शेकडो होत्या. काही नवीन गोष्टींबद्दल माझ्याशी कसा संवाद साधावा, याचा विचार करत, कधीकधी ती माझ्याकडे बघत बसे. तिला काय हवे आहे, ते ती स्पष्ट करू लागली [किंवा मला तसे वाटले. हे काय दर्शवते?] --- आणि मग ती माझी मुलगीच बनून गेली. त्या दुःखी रात्रीपासून ती कशी पळाली व ती आकाशात कुठे होती, ते सांगण्याचा प्रयत्न ती करत आहे, असे मला वाटू लागले. तिचा चेहरा आल्हादक होता. आता कोणी तिचे चमकदार काळे केस ओढू शकत नव्हते. सर्व काही सुरळीत झाले होते. तिच्या नजरेत असे काही भिडणारे होते, की गाडी शांत व स्तब्ध झाली होती. पण उदास झाली नव्हती. [लक्षात घ्या की चीप जॅकच्या पद्धतीप्रमाणे आम्ही त्याचा उच्चार लेमॅन जोली करतो व हसतो.]

ती माझी नजर जाणून घ्यायला शिकली, ते खरच नवलपूर्ण होते. जेव्हा मी रात्री विक्री करे, तेव्हा बाहेरून कुणाला न दिसता ती गाडीत बसून रहात असे. ती माझ्या डोळ्यात उत्सुकतेने बघे व बरोबर मला हवी ती वस्तू काढून देई. मग ती आनंदाने टाळ्या पिटून हसे. तेजस्वी अशा तिला बघून, मला जेव्हा माझे तिच्याकडे पहिल्यांदा लक्ष गेले, तेव्हा ती कशी उपाशी व मारझोड केलेली, चिंध्या पांघरलेली व चिखलातील गाडीच्या चाकाशेजारी मुटकुळे करून झोपलेली होती, हे आठवले. तेव्हा मला तिची इतकी दया आली, की मी माझी कीर्ती होती त्यापेक्षा वाढवून सांगितली व पिकल्सनला [मिमचा फिरता राक्षस] माझ्या इच्छापत्रातून बाजूला केले.

ती सोळा वर्षांची होईपर्यंत गाडीतील हा आनंद चालू राहिला. तेव्हा मला असमाधानी वाटू लागले की मी तिला शिकवले हे ठीक आहे. पण याहून चांगले शिक्षण मी तिला देऊ शकलो असतो. मी तिला माझे दृष्टीकोन समजावून देऊ लागलो, तेव्हा दोघांच्याही गालावरून अश्रू ओघळू लागले. पण जे योग्य असते ते तसे असतेच. रडून किंवा हसून, त्याचे महत्व कमी होत नाही.

त्यामुळे मी तिचा हात हातात घेतला आणि एक दिवस लंडनमधील मुक्या बहिऱ्यांच्या संस्थेत तिला घेऊन गेलो. एक

सभ्य गृहस्थ आमच्याशी बोलायला आला, त्याला मी म्हणालो, “सर, आता मी तुम्हाला मला काय हवे आहे, ते सांगतो. मी एक गरीब मनुष्य आहे. पण अलीकडील काही वर्षात मी थोडेफार पैसे साठवले आहेत. ही माझी एकुलती एक [दत्तक] मुलगी आहे. जन्मतः कोणी मुके बहिरे नसते. तिला कमीत कमी वेळात जास्त कसे शिकवता येईल, हे बघा. आता अधिक उशीर नको. त्यासाठी मी आत्ताच्या आत्ता पैसे मोजायला तयार आहे. हे घ्या,”

तो मनुष्य हसून हो म्हणाला. “पण मला आधी हे बघितले पाहिजे, की तिला काय काय येते आहे. तुम्ही तिच्याशी संवाद कसा साधता?” मग मी त्याला दाखवले. तिने कागदावर बरेच शब्द लिहून दाखवले व असेच काही. त्या माणसाने आम्हाला दाखवलेल्या पुस्तकातील लहानशा गोष्टीवरून सोफीने व मी आनंदाने काही संभाषण केले. तिला ती गोष्ट वाचता आली. तो मनुष्य बोलला, ‘हे अद्वितीय आहे. फक्त तुम्ही तिला शिकवले आहे, हे कसे शक्य आहे?” मी म्हणालो,

“पण फक्त मीच तिला शिकवले आहे.” “मग तुम्ही फारच हुशार आहात.” या त्याने उच्चारलेल्या शब्दांपेक्षा अजून चांगले शब्द, मी माझ्या बाबतीत कुणाकडून ऐकले नव्हते. हे त्याने

सोफीला सांगितल्यावर तिने, त्याच्या हाताचे चुंबन घेतले. ती टाळ्या पिटून हसू लागली. रडूही लागली.

आम्ही त्या माणसाला चार वेळा भेटलो. त्याने माझे नाव लिहिले, तेव्हा ते डॉक्टर असल्याबद्दल त्याने आश्चर्य व्यक्त केले. असे लक्षात आले, की ज्याच्या नावावरून माझे नाव ठेवले गेले होते, त्याच्या बहिणीकडून तो त्याचा भाचा लागत होता. त्यामुळे आमची ओळख अजून पक्की झाली. तो मला म्हणाला, "मेरीगोल्ड, आता तुम्हाला तुमच्या मानलेल्या मुलीला अजून काय शिकवायचे आहे?"

"सर, तिचे व्यंग बघता, मला तिला जगापासून कमीत कमी वेगळे करायचे आहे. सहजतेने व आनंदाने लिहिलेले सर्व काही तिला वाचता यायला हवे."

त्यावर त्याचे डोळे पूर्ण उघडून तो म्हणाला, "अरे भल्या माणसा, "मी हे का करू शकणार नाही?"

मी तो विनोद समजून हसलो. [अनुभवाने हे जाणून, की त्याशिवाय तुम्ही कसे भुईसपाट होता.] मी माझे शब्द त्यानुसार सुधारले.

संशयी डोळ्यांनी बघत तो म्हणाला, "तुम्हाला नंतर तिच्याकडून काय करून घ्यायचे आहे? तिला गावाकडे घेऊन

जायचे?” मी म्हणालो, ”सर, तिला फक्त माझ्या मालविक्रीच्या गाडीत घेऊन जायचे. तुम्हाला कळले का, की मला तिने स्वतःचे खासगी आयुष्य जगायला हवे आहे. काही झाले तरी मला, तिचे व्यंग लोकांसमोर आणायचे नाही. पैशांसाठी मी तिचे प्रदर्शन करणार नाही.”

त्या सभ्य गृहस्थाने मान हलवली. त्याला ते पटलेले दिसले. तो म्हणाला, “ठीक आहे. तिला असे तयार करण्यासाठी, तिला दोन वर्षे तुमच्यापासून लांब ठेवण्याची, तुमची तयारी आहे का? त्याने तिचे भले होईल.” तिच्याकडे बघत तो पुढे बोलला, “ती तुमच्यापासून दोन वर्षे लांब राहू शकेल का?”

मला कल्पना नव्हती, की ते एवढे कठीण असेल. [माझ्यासाठी ते नक्कीच कठीण होते.] पण कठीण असले, तरी ते करणे आवश्यक होते. तरीही शेवटी तिला तसे करण्यासाठी मी तयार केले. आणि मग आमच्यातील दुरावा मान्य करण्यात आला. प्रत्यक्ष तो झाला व मी त्या संध्याकाळी तिला त्या दारात सोडले, तेव्हा काय झाले हे मी सांगत नाही. पण मला हे माहिती आहे, की मी त्या ठिकाणावरून माझे हृदय विदीर्ण झाल्याशिवाय व घशात आवंढा आल्याशिवाय जाऊ शकलो नाही. तुम्ही मला नेहमीच्या उत्साहात पाहिले नसेल. चष्मा नाही. बंदूक नाही. माझा माल मी नेहमीच्या उत्साहाने विकू शकलो नाही.

गृहव्यवस्थापन खात्याच्या सचिवाने मला पाचशे पौंडाचे बक्षीस दिले असते, तरी मी तिची आठवण पुसून टाकू शकलो नसतो. गाडीत सुनसानपणा भरून राहिला होता. सोफी माझी होती व मी तिचा होतो, या विचाराने मी सुन्न झालो होतो. ती कधी परत येईल, हा विचार मी सतत करत असे. मी काही महिन्यात नवीन गाडी विकत घेतली. आणि तिचे काय करायचा बेत मी केला असेल? मी तुम्हाला सांगतो. मी ती तिने वाचायच्या पुस्तकांच्या मांडणीला चिकटवून ठेवली. त्यात बसायला जागा होती. मी तिचा पहिला शिक्षक होतो हा विचार करत, तिथे बसून मी तिला वाचतांना बघू शकेन अशी जागा होती. मी घाई न करता, माझ्या देखरेखीखाली, ती माझ्या मनासारखी बनवून घेतली. तिथे तिचे झोपायचे कुशनवाले बाक होते. पडदे होते. वाचायचे व लिहायचे टेबल होते. पुस्तकांच्या ओळींवर ओळी होत्या. काहींमध्ये चित्रे होती तर काहीत नव्हती. काहींची बांधणी उत्कृष्ट होती. काही उत्तम प्रतीची तर काही मध्यम होती! मी उत्तर दक्षिण, पूर्व पश्चिम, इकडे तिकडे फिरून तिच्यासाठी ढीगच्या ढीग गोळा करून आणली होती. वाऱ्याबरोबर भरकटत, रस्ता चुकतमाकत, सपाटीवरुन व टेकड्यांवरुन, मी गाडीभर पुस्तके गोळा केली. माझ्या डोक्यात एक नवीन कल्पना चमकली. त्यात माझा वेळ व लक्ष गुंतलेले राहिले. दोन वर्षे माझा वेळ छान गेला.

लोभी स्वभाव न बनवता, मी गोष्टींवर वर्चस्व गाजवू लागलो. मला काही इच्छा उरल्या नाहीत. उदाहरणार्थ, चीप जॅकच्या गाडीत मी अचानक आशावादी बनलो. माझा तुमच्यावरचा विश्वास उडाला आहे, असे नाही. पण मला आत्मविश्वास आला. तसाच तुम्हालाही येऊ शकेल. जेव्हा माझ्या लक्षात आले, की ही पुस्तके तिच्याआधी अनेकांनी वाचलेली आहेत, तेव्हा माझ्या मनात द्वेष डोकावू लागला. तिनेच पहिल्यांदा वाचावे, असे पुस्तक मी तिच्यासाठी आणू शकत नाही का, असे मी स्वतःला विचारू लागलो.

त्या विचारामुळे मी खूश झालो. आणि मी कुठलाही विचार उचलून धरणारा मनुष्य असल्याने, [तुम्हाला चीप जॅकच्या धंद्यात जगायचे असेल तर तुमच्या मनात येणाऱ्या विचारांनी तुम्हाला सर्व कुटुंब धगधगते ठेवावे लागते.] मी त्या विचारावर काम करायला सुरवात केली. माझा प्रदेश बदलायच्या विचारांनी मी झपाटलेला होतो. त्यासाठी मला संधी मिळेल तशी, एखाददोन साहित्यिक पात्र शोधून काढायची होती. रेझर, इस्त्री, हवेचा दाब, तापमान मोजणारे यंत्र, घड्याळे, जेवायची ताटे, आरसा इत्यादी माझ्या सटरफटर वस्तूंच्या संग्रहातच हे पुस्तक हवे, आणि चष्मा किंवा बंदुक यासारखे ते एकच वस्तू म्हणून ते विकले जाऊ नये, असा बेत मी केला. मी हा निर्णय घेतला, तेव्हाच दुसराही घेतला. तसाच तो तुमचाही असेल.

ती मला वस्तू विकतांना कधी ऐकू शकत नाही आणि ती मला कधीच ऐकू शकणार नाही, ही माझी खंत होती. आपल्या क्षमता लोकांपासून लपवून ठेवणे, तसेच त्या फुगवून सांगणे दोन्ही मला आवडत नाही. ज्या व्यक्तीला त्याची सर्वात जास्त पर्वा आहे, अशा व्यक्तीला तुम्ही कारण पटवून देऊ शकत नसाल, तर तुमच्या नावाची, किर्तीची किंमत काय? आता मी तुम्हाला नीट सांगतो. त्याची किंमत सहा पेनी, चार पेनी, तीन पेनी, दोन पेनी, एक पेनी, अर्धा पेनी किंवा अजून कमी आहे? नाही. अजून कमी करणे शक्य नाही. ठीक आहे. मग माझा निष्कर्ष असा आहे, माझ्या काही कामाने मी पुस्तकाची सुरवात करेन. म्हणजे मग तो नमुना वाचून, तिला माझ्या विक्रीकौशल्याची कल्पना येईल. मी मला न्याय देऊ शकत नाही, याची मला कल्पना आहे. माणूस त्याच्या डोळयाने, किंवा आवाजाने, बोलण्याच्या वेगाने, किंवा चटपटीतपणाने किंवा त्याच्या सर्वसामान्य मसालेदारपणाने लिहू शकत नाही. [निदान मला तरी ते माहिती नाही.] पण जेव्हा तो सभाधीट वक्ता असतो, तेव्हा त्याच्या बोलण्याचे तुकडे, तो लिहू शकतो --- आणि खरच, तो बोलण्यापूर्वी ते बरेच वेळा करत असल्याचे मी ऐकले आहे.

ते एकदा ठरवल्यावर, मग नावाचा प्रश्न आला. आता त्या गरम लोखंडाला आकार कसा द्यायचा, हा देखील प्रश्न माझ्यासमोर उभा राहिला. तर ते मी असे केले. तिच्याबरोबरची

सर्वात मोठी समस्या म्हणजे, मी डॉक्टर नसतांना मला डॉक्टर कसे म्हणायचे! शेवटी मला वाटले, मी खूप परिश्रम करूनही ते तिच्या मनापर्यंत योग्य रीतीने पोचवू शकत नाही. पण दोन वर्षातील तिची प्रगती लक्षात घेता, मी असा विचार केला की मी स्वतःच्या हातांनी लिहिलेले बघितल्यावर, तिला ते समजेल. नंतर मला वाटले की एका विनोदाचा तिच्यावर प्रयोग करावा. तिला तो कसा समजतो, यावर मला तिची आकलनशक्ती किती आहे, याचा अंदाज येईल. पहिल्यांदा आम्ही आमच्या हातून झालेली चूक शोधून काढली. मला वाटते, ती मला वैद्यकीय व्यवसायातील डॉक्टर समजत होती. “जर आता मी या पुस्तकाला माझ्याकडून सुचवल्या गेलेल्या औषधांच्या कागदाचे नाव दिले, आणि तिला वाटले, की ती फक्त तिच्या आवडीची व तिच्या मनोरंजनासाठी आहेत, तर ती गोडसे हसू हसेल किंवा गोडसे रडू रडेल. तो आमच्या दोघांसाठी समस्या सोडवल्याचा आनंदी पुरावा असेल. हे अगदी बरोबर झाले. जेव्हा गाडीत तिच्या बाकावर बसून, छापखान्यातून छापलेले पुस्तक ती बघेल, ‘डॉक्टर मेरीगोल्ड यांनी सुचवलेल्या औषधांची यादी’ असे त्याचे नाव ती बघेल, तेव्हा क्षणभर ती माझ्याकडे आश्चर्याने बघेल. मग पाने फडफडवत, सर्वात सुंदर पद्धतीने हसत सुटेल. स्वतःला चिमटा काढून बघेल. मान हलवून, पाने उलटत बारकाईने वाचत असल्याचे भासवेल मग दोन्ही हातांनी पुस्तक छातीशी धरत

त्याचे चुंबन घेईल व ते मला देईल. मी माझ्या पूर्ण आयुष्यात इतका प्रमुदित कधी झालो नसेन.

पण मी काय दिवास्वप्न बघत बसलो आहे. [मी तिच्यासाठी आणलेल्या अनेक अद्भुतरम्य गोष्टींमधून मी तो विचार उचलला आहे. मी त्यातील अनेक गोष्टी उघडल्या आहेत व बऱ्याचशा उघडलेल्या नाहीत पण ती अद्भुतरम्यता अनुभवणाऱ्याला मी बोलतांना ऐकले आहे की, "मी काही अपेक्षा करत नाही. या पुस्तकाने माझा सर्व रिकामा वेळ खाल्ला आहे. सर्वसामान्य वस्तूंच्या ढिगात ते पुस्तक ठेवणे सोपे नव्हते. पण ते पुस्तक जेव्हा माझ्याकडून लिहिले गेले, तेव्हा माझा त्यावर विश्वास बसेना आणि धीरही धरवेना. ते फुटबोर्डसारखेच आहे. लोकांना याची कल्पना नव्हती.

शेवटी सर्व काही करून झाले. कसा कुणास ठाऊक, आधीच्या वर्षांप्रमाणेच या दोन वर्षांचा वेळ गेला. गाडी पण नवीन दिसू लागली. बाहेरून पिवळी, लाल व ब्रासची हँड्ल्स लावलेली. मग त्याला जुना घोडा जुंपून, एक मुलगा त्या चीप जॅकच्या गाडीवर कामाला ठेवण्यात आला. सोफीला आणण्यासाठी मी स्वतः ती स्वच्छ केली. त्या दिवशी चमकती गार हवा होती. गाडीचे धुरांडे धूर सोडत होते. दक्षिणपश्चिम

रेल्वेमधून दिसणाऱ्या, वँड्सवर्थ येथील रिकाम्या जमिनीवर या खासगी गाड्या उभ्या होत्या.

एक सभ्य गृहस्थ त्याचा हात आनंदाने पुढे करत म्हणाला, “मेरीगोल्ड, तुला बघून छान वाटले.”

मी म्हणालो, “मला काही शंका आहेत. तुला मला बघून जेवढा आनंद झाला त्याहून दुप्पट आनंद मला तुला बघून झाला आहे.”

“तुला हा काळ फार लांबीचा वाटला का?”

“त्याची खरी लांबी बघता, मी असे म्हणणार नाही. पण --- माझ्या प्रिय माणसा, काय छान सुरवात झाली!”

“मलाही तसेच वाटते. सोफी किती छान रीतीने सुंदर, बुद्धिमान व भावना व्यक्त करणाऱ्या स्त्रीमध्ये बदलली आहे! दाराशी शांतपणे उभ्या असलेल्या तिला मी खरे तर माझी मुलगी म्हणून ओळखलेच नसते.”

दयाळूपणे तो सद्गृहस्थ म्हणाला, “तुझ्यावर फारच परिणाम झालेला दिसतो.”

“मला वाटते, मी मात्र कोटातील ओबडधोबड माणूसच राहिलो आहे.”

तो सद्गृहस्थ म्हणाला, “तिला गरीबीतून व संकटमय परिस्थितीतून बाहेर काढून वाढवणारा आणि तिच्या कलाने घेऊन संवाद साधायला शिकवणारा तूच होतास. पण ती आपल्याशी संवाद साधू शकत असतांना, आपण दोघेच काय बोलत बसलो आहोत? तुझ्या पद्धतीप्रमाणे तिला घेऊन ये.”

मी बोललो, “सर, मी कोट घातलेला एक गबाळा माणूस आहे आणि ती तर एक डौलदार स्त्री बनून दारात उभी आहे.”

तो सद्गृहस्थ म्हणाला, “तिला तुझ्या जुन्या पद्धतीने बोलावून, ती हलते का ते बघ.”

मला खूश करायला आम्ही दोघेही उठलो. मी तिला जुन्या पद्धतीने साद घातली, गुडघ्यात वाकत, तिने तिचे हात माझ्याकडे केले व डोळ्यातून आनंदाश्रू गाळत, ती माझ्या पायाशी धावली. मी तिला दोन्ही हातांनी उचलून घेतले, तेव्हा तिने माझ्या मानेभोवती हात टाकत, मला घट्ट मिठी मारली. आमच्या तिघांच्या जगात काही मृदू व आनंददायी पसरल्यासारखा, मी मूर्खपणे जागच्या जागी खिळून राहिलो आणि आमचा मूक संवाद सुरु झाला.

[इथे इतर लेखकांनी लिहिलेला काही भाग वगळला आहे. पण एका परीच्छेदात लिहिलेले वाचून वाचक खूश होतील.]

आता मी तुमच्याबरोबर काय करणार आहे, ते सांगतो. मी तुमच्यासमोर सामान्य वस्तूंचा ढीग मांडणार आहे. त्यात एकदा वाचून झाल्यावर मी त्यात भर घालून पुरे केलेले तिचे स्वतःचे फक्त मी वाचलेले पुस्तक, अठ्ठेचाळीस छापलेली पाने, शह्याण्णव रकाने, पांढरा शुभ्र रंग, देखणे हिरवे वेष्टण, सर्वात उत्तम कागद, आणि हा सर्व गठ्ठा केवढ्याला तर फक्त आठ पौंडांना? म्हणजे फार नाही. सहा पौंडांना? म्हणजे कमी आहे. की चार पौंडांना? मी क्वचितच अशी कल्पना करू शकतो. याच्या बांधणीसाठीच अर्धा पौंड खर्च आला असेल. इथे फक्त अठ्ठेचाळीस मूळ पाने व शह्याण्णव रकाने, चार पौंडांना आहेत. तुम्हाला एवढ्या पैशात अजून काय मिळणार! घ्या. घ्या. त्यात साहसी जाहिरातीने भरलेली तीन पूर्ण पाने आहेत. ती वाचून त्यावर विश्वास ठेवा. तुम्हाला ख्रिसमसच्या, नवीन वर्षाच्या व ते आनंदाचे व भरभराटीचे जाण्यासाठीच्या शुभेच्छा! मी ते पाठवले, तर त्याची किंमत वीस पौंडांपेक्षा कमी नसेल. बघा विचार करा. आता आयुष्यभरासाठी शेवटचा भाव सांगतो. गाडी मोडून प्रवास कसा थांबला ते ती तुम्हाला सांगेल. अजूनही तुम्हाला वाटते का, की चार पौंड ही किंमत फार जास्त आहे? मग इकडे या. चार पेनी द्या. पण हे गुप्त ठेवा.”

अशा तऱ्हेने माझा बेत यशाच्या टोकावर पोचला. आम्हाला वाटले होते, त्यापेक्षा आमच्या आयुष्यातील पुनर्मिलाफ फारच

यशदायी ठरला. गाडीची दोन चाके जसजशी धावू लागली, तसतसे समाधान व आनंद वाढू लागला व चाके थांबल्यावर तो थांबू लागला. संध्याकाळच्या मेजवानीतील मशीनने शेपूट जास्त गोल केलेल्या व काळे कान असलेल्या पांढऱ्या कुत्र्यासारखा मी खूप खूश होतो.

पण माझ्या अंदाजापेक्षा काही करायचे राहिले होते. आता, ते काय होते? तुमच्या तर्कबुद्धीला चालना देण्यासाठी, मी सांगतो, एक आकडा. बघा. विचार करा. बरोबर विचार करा. नाही जमत? नऊ? नाही. आठ? नाही. सात? नाही सहा? नाही. पाच? नाही. चार? नाही. तीन? नाही. दोन? नाही. एक? नाही. आता मी तुमच्याबरोबर काय करणार आहे, ते सांगतो. ती एकदम वेगळ्या प्रकारची आकृती आहे. सांगा. ती नष्ट न होणारी आकृती आहे का, असे विचारता? तर तसे नाही. अशा रीतीने तुम्ही कोंडीत सापडला आहात. तुम्ही ती अमर आकृती असल्याचा विचार रोकू शकत नाही. तर असे आहे. तुम्ही लवकर का सांगत नाही?

हो. ती माझ्या अंदाजाबाहेर असलेली अमर संख्या होती. पुरुषाची नाही. बाईची नाही. तर मुलाची. मुलीची किंवा मुलाची का? तर मुलाची. “मी म्हणतो माझे धनुष्यबाण असलेल्या चिमणीची.” आता तुमच्या लक्षात आले असेल.

आम्ही आता लँकेस्टरमध्ये आलो होतो. मी सर्वसाधारणपणे, दोन रात्रीचा माल खपवला होता. [तरी मी त्याना ते झटपट माल खरेदी करणारे गिऱ्हाईक होते, असे म्हणू शकत नाही.] रस्त्याच्या शेवटी असलेल्या मोकळ्या चौकात, मिस्टर स्लाय याचे किंग्ज आर्म्स व राजेशाही हॉटेल उभे होते.

मिमचा प्रवासी दलाल, पिकल्सन हा देखील तिथे होता. त्याच्याशी जास्तच नम्रपणे बोलले गेले. त्याच्या गाडीचा पत्ता नव्हता. लिलावाच्या खोलीत, पिकल्सनपर्यंत हिरवे आच्छादन घातलेले होते. ‘फुशारक्या मारणारे अभिमानी, ज्ञानी देश, छापखाना व खासगी शाळा सोडून सर्वांना फुकट यादी बंद केली आहे. तरुणांच्या गालांवर लाली पसरवू नये. किंवा फार लक्ष घालून, धक्का देऊ नये.’ अशी पाटी तिथे लावून ठेवली होती.

पैसे भरायच्या गुलाबी कॅलीको ठिकाणी लोकांच्या गलथानपणाबद्दल मिम भयानक शपथा घेत होता. दुकानातील गंभीर जाहीरात करणारे कागद, असे सांगत होते, की पिकल्सनला पाहिल्याशिवाय डेव्हिडचा खरा इतिहास नीटपणे समजणे अशक्य आहे.

मी लिलावाच्या खोलीत गेलो तेव्हा फक्त विणलेल्या जाड्याभरड्या लाल गालीच्यावरील पिकल्सन सोडून आणि आवाजाचा प्रतिध्वनी व मऊपणा सोडून, ती पूर्णपणे रिकामी

होती. यामुळे माझा त्याच्याशी खासगी व गुप्तपणे काही बोलायचा उद्देश सोपा झाला. “पिकल्सन, तुला आनंद होईल अशा तऱ्हेने, मी तुझे नाव माझ्या इच्छापत्रात टाकतो आहे. पण त्रास वाचवण्यासाठी, तुझ्या दृष्टीकोनात बसणारे, हे भाग्य आहे. तर अशा तऱ्हेने आपण हे काम पूर्ण करून टाकू.” हे मी बोलेपर्यंत ज्या कधीच पेटू शकत नाहीत अशा, लांबलचक रोमन मेणबत्त्यांची ओळ असल्यासारखा मरगळलेला दिसणारा पिकल्सन, बराच सावरला आणि त्याने संसदीय वक्तृत्व दाखवल्यासारख्या [त्याच्या] पद्धतीने मान हलवली. तसेच त्याने अजून भर घातली, की रोमनांसारखे न वागता मिमने त्याला भारतीय डेअरीवाल्याच्या मुलीबरोबर राक्षसासारखे रहायचा प्रस्ताव दिला. त्या तरूण स्त्रीच्या नावाने असलेल्या जमिनीशी काही परिचय नसल्याने व त्याच्या गंभीर दृष्टीकोनांची गळचेपी होणे मंजूर नसल्याने, तसे करण्यास नकार दिला. त्यामुळे त्या दुर्दैवी तरुण माणसाची बिअर थांबवली गेली व त्यांची शब्दाशब्दी झाली. संपूर्ण मुलाखतीत, मिम भयानकपणे गुरगुरत होता. त्यामुळे पिकल्सन पानासारखा थरथरू लागला.

पण त्या फिरणाऱ्या राक्षसाच्या, पिकल्सनच्या, सध्याच्या ताशेऱ्यांमध्ये डॉक्टर मेरीगोल्ड होता. त्याच्या शब्दांचा कमकुवतपणा पोचण्यासाठी मी त्याचेच शब्द सांगतो --- “तुझ्या गाडीला टांगलेला हा विचित्र मनुष्य कोण आहे?”

त्याला ती म्हणायचे आहे का, असे वाटून मी विचारले, “विचित्र तरुण मनुष्य?” त्याचे गोल झोके डॉक्टर या शब्दाशी थांबले. त्याच्यासारख्या शूर मनुष्याच्या डोळयातून दयनीय रीत्या पाणी आले. “मी आता अशक्त झालो आहे. पण इतका अशक्त नाही की मी काय म्हणतो आहे, ते मला कळू नये. “डॉक्टर, मी परत बोलतो. विचित्र तरुण मनुष्य.” असे दिसले की पिकल्सनला त्याचे पाय ताणायला लावले होते. [पायांना ते हवे होते, असे नाही.] रात्रीच्या गडद काळोखात व दिवस उजाडायच्या आत, जेव्हा तो कुणालाही दिसू शकणार नाही, अशा वेळेस त्याला मी दोन रात्री लँकेस्टरमध्ये असतांना, माझ्या गाडीला तोच अनोळखी तरुण मनुष्य लटकलेला दिसला.

त्याने मला कोड्यात टाकले. त्याला काय म्हणायचे आहे, ते मला समजेना. तुम्हाला आता पूर्वसूचना मिळून, तुम्ही जेवढे दचकलात, त्याहून जास्त मी दचकलो नाही. पण त्याला काय म्हणायचे आहे, ते मला समजेना. मी ते पिकल्सनला सांगितले. त्याच्या वाट्याला मी ठेवलेले पैसे त्याने त्याची शक्ती वाढवण्यात खर्च करावे व त्याचा धर्म पाळणे चालू ठेवावे, असा उपदेश त्याला करत मी तेथून निघालो. सकाळी मी अनोळखी तरुण मनुष्य कुठे दिसतो आहे का, ते पाहिले --- आणि सांगायचे म्हणजे --- मला तो दिसला. तो दिसायला चांगला व चांगले कपडे केलेला होता. टेहेळणी करत असल्यासारखा व काळजी

घेत असल्यासारखा, दर रात्री तो माझ्या गाडीशी बराच वेळ घुटमळत होता. दिवस उजाडल्यावर तो निघून गेला. पण त्याने इकडेतिकडे पाहिले नाही व कुणाची चाहूलही घेतली नाही.

एकदोन तासात आम्ही लँकेस्टर सोडले व कार्लीसलेकडे जाऊ लागलो. दुसऱ्या दिवशी दिवस उजाडतांना, मी परत अनोळखी तरुण मनुष्य कुठे दिसतो आहे का, ते पाहिले आणि परत तो तिथे होता. मी त्याला दुसऱ्यांदा उत्साहाने पसंती दर्शवली. त्याने जराही विचलित झाल्याची चिन्हे दाखवली नाहीत. त्यामुळे माझ्या डोक्यात एक विचार आला. त्यानुसार मी त्याच्यावर वेगळ्या प्रकारे व वेगवेगळ्या वेळी लक्ष ठेवले. मग माझ्या लक्षात आले की हा विचित्र माणूस मुका व बहीरा आहे.

हा शोध लागल्यावर मी चमकलो. मी सोफीला दोन वर्षे जिथे तरुण मुलांमध्ये शिकायला ठेवले होते. [त्यातील काही चांगले श्रीमंत होते.] त्यापैकी तो होता. मी स्वतःशी विचार केला, "जर तिला तो आवडत असेल, तर मला मध्ये पडायचे काय कारण आहे? मी ठरवलेले व प्रत्यक्षात आणलेले सगळे कुठे जाणार?" मी आशा केली --- मी माझा स्वार्थीपणा सोडला पाहिजे. कदाचित ती त्याला पसंत करतही नसेल. मला शोधून काढले पाहिजे. ते मोकळ्या हवेत बोलत असतांना, शेवटी मी अपघाताने, तिथे होतो. त्यांच्या नकळत एका फरच्या झाडामागे उभा राहीलो. तिघाजणांची ती हलती सभा होती. मला त्यांचा

शब्दनशब्द ऐकू येत होता व प्रत्येक हालचाल दिसत होती. बोलक्या लोकांचे संभाषण ऐकावे, तसे मला त्या मुक्या बहीऱ्यांचे झटपट व खरेखुरे संभाषण डोळ्यांनी ऐकू येत होते. जे लोक बोलू शकतात त्यांचे संभाषण ऐकावे, तसे मला ते कानानीही ऐकू येत होते. तो एका व्यापाऱ्याच्या घरातील चीनला निघालेला मुलगा होता. त्याचे वडील त्याला पाठवत होते. त्याला बायकोला घेऊन जाता येणार होते आणि त्याला सोफीशी लग्न करून तिला घेऊन जायचे होते. पण तिचा हट्ट कायम होता. त्याने तिला विचारले की तिचे त्याच्यावर प्रेम नाही का, तर ती त्याच्यावर खूप खूप प्रेम करत होती. सगळी विशेषणे मला माहिती नाहीत. पण तिला तिच्या आवडत्या, चांगल्या, उमद्या, उदार वडिलांना दुखवायचे नव्हते. [म्हणजे हातवाला कोट घातलेला, मी चीप जॅक] पण तिला त्याच्याबरोबर रहायचे होते. देव त्याचे भले करो. मी मोडता घातल्यास, तिचे हृदय मोडून पडेल. मग ती जोराने रडेल. त्यामुळे मी माझ्या मनाचा हिय्या केला. तिने त्या तरुणाशी लग्न करावे की नाही, याबद्दल माझे मन द्विधा होते. पिकल्सनला माझ्या इच्छापत्रातील मिळणारे पैसे तेव्हा मिळाले, हे त्याच्यासाठी इतके चांगले झाले. पण मला त्याच्यासाठी ते थोडे अयोग्य वाटले. कारण मला नेहमी असे वाटे, की जर ते या कमकुवत मनाच्या राक्षसासाठी नसते, तर कदाचित मी त्या तरुण माणसाचा विचारही केला नसता." पण एकदा जेव्हा मला कळले, की तिचे

त्याच्यावर प्रेम आहे व मी तिला त्याच्यासाठी विलाप करतांना पाहिले --- तेव्हा मग सगळे बदलले. पिकल्सन तिथे असतानाच मी हे मनाशी नक्की करून टाकले, की सर्वांसाठी जे योग्य आहे ते करायचे.

त्या वेळेपर्यंत ती त्या तरुणाकडून निघाली होती. [किंवा माझ्याकडून भानावर यायला काही मिनिटे गेली असतील.] तो तरुण मनुष्य तिथे असलेल्या फरच्या झाडांच्या गठ्ठ्यापैकी दुसऱ्या फर झाडाजवळ त्याचा चेहरा दंडावर ठेवून वाकला होता. मी त्याच्या पाठीला स्पर्श केला.

वर माझ्याकडे पहात तो आमच्या मुक्या बहीऱ्याच्या भाषेत म्हणाला, “रागावू नका.” मी म्हणालो, “अरे चांगल्या मुला, मी तुझ्यावर रागावलो नाही. मी तुझा मित्र आहे. माझ्याबरोबर चल.”

मी त्याला गाडीतील वाचनालयाच्या पायऱ्यांशी सोडले व एकटाच आत गेलो. ती तिचे डोळे पुसत होती.

“प्रिय मुली, तू रडते आहेस.”

“हो, पपा.”

“का?”

“डोके दुखते आहे.”

“हृदय नव्हे?”

“पपा, मी डोके म्हणाले.”

"डॉक्टर मेरीगोल्डला त्यावर औषध द्यायला हवे."

तिने चेहऱ्यावर उसने हसू हसत, माझे 'डॉक्टर मेरीगोल्ड यांनी सुचवलेल्या औषधांची यादी' हे पुस्तक उचलले. पण मला गंभीर व गप्प बसलेले पाहून, तिने ते हळूच खाली ठेवले. तिचे डोळे लक्षपूर्वक पाहू लागले.

"सोफी, त्यात औषध नाही."

"मग कुठे आहे?"

"प्रिय मुली, इथे आहे."

मी तिच्यासाठी असलेला नवरा आत आणला. आणि त्या दोघांचे हात एकमेकांच्या हातात दिले. त्या दोघांसाठी मी पुढील शब्द उच्चारले, "डॉक्टर मेरीगोल्डने जीवनासाठी सुचवलेले शेवटचे औषध!" एवढे बोलून मी दाराला कडी लावली.

लग्न जवळ आले, तेव्हा मी माझ्या आयुष्यात पहिल्यांदा व शेवटचाच निळा कोट चढवला. [निळी, चमकदार बटणे असलेला] आणि माझ्या हाताने सोफीला दूर केले. दोन वर्षे सोफी ज्याच्याकडे शिकली, तो सभ्य गृहस्थ व आम्ही तिघे, एवढे सोडून अजून कुणी नव्हते. मी आम्हा चौघांना गाडीतील वाचनालयात लग्नाचे जेवण दिले. कबुतराचा केक, डुकराचा मसालेदार पाय, दोन चिकन आणि काही बागेतील खायच्या वस्तू. उत्तम पेये. मी व त्या तरुणाने भाषण केले. खूपसे विनोद

सांगितले. आकाशात उडवलेल्या रॉकेटसारखे सर्व काही भुरकन संपले. मजेमजेत मी सोफीला सांगितले, की जेव्हा गाडी रस्त्यावर नसेल, तेव्हा मी गाडीतील वाचनालय माझी उठबस करायची खोली म्हणून वापरणार आहे. आणि सगळी तिच्याकरता असलेली पुस्तके, ती परत येईपर्यंत तशीच ठेवणार आहे. तर मग ती तिच्या तरुण नवऱ्याबरोबर चीनला गेली. ती गेली तेव्हा दुःखाने माझे हृदय जड झाले. पण मला माझ्यासाठी एक मुलगा मिळाला. जेव्हा माझी बायको व आधीची सोफी या दोघी गेल्या, तेव्हा मी एकटाच घोड्यावर बसून खांद्यावर चाबूक घेऊन, जड पाऊलांनी चालत राहिलो होतो.

सोफीने मला अनेक पत्रे लिहिली. पहिल्या वर्षाच्या शेवटी, तिने मला थरथरत्या हातांनी लिहिले, "प्रियतम पपा, आठवड्यापूर्वी मला एक छकुली झाली. येथील सर्वजण इतके चांगले आहेत, की त्यांनी मला तुम्हाला हे पत्र लिहू दिले. प्रियतम व सर्वोत्तम पपा, मला माहिती नाही. पण मी आशा करते, की माझे मूल मुके व बहीरे नसेल." मी तिला उलट टपाली लिहिले, की मला तुझ्या प्रश्नाची काळजी वाटते आहे. पण तिचे त्यासंबंधी काहीच उत्तर आले नाही. मला वाईट वाटले. पण मी तिला परत त्यासंबंधी काही विचारले नाही. खूप काळ आमची पत्रापत्री चालू राहिली. पण नंतर हळूहळू ती क्वचित केव्हातरी होऊ लागली. कारण सोफीचा नवरा दुसरीकडे हलला होता. आणि मी तर

कायमच इकडून तिकडे हलत होतो. पत्रे येवोत किंवा न येवोत पण आम्ही एकमेकांसंबंधी विचार करत असू, याची मला खात्री होती.

सोफी इथून गेल्याला पाच वर्षे उलटून गेली. अजूनही मी अग्रगण्य चीप जॅक होतो आणि पूर्वीपेक्षादेखील जास्त प्रसिद्ध झालो होतो. माझा हिवाळा जोरदार खपाचा झाला होता आणि तेवीस डिसेंबर अठराशे चौसष्टला मी मिडलसेक्समध्ये उक्सब्रिजला असतांना, माझा सर्व माल खपला. म्हणून मग मी माझ्या जुन्या घोड्याने ख्रिसमस स्वस्थपणे साजरा करायला व आतषबाजी करायला लंडनला गेलो. विकून पैसे मिळवण्यासाठी, सगळीकडून नवीन माल खरेदी केला.

मला स्वयंपाक उत्तम जमतो. तुम्हाला सांगतो, मी ख्रिसमसच्या संध्याकाळच्या गाडीतील वाचनालयात जेवणासाठी काय केले. मी दोन किडनींच्याबरोबर गाईच्या मासाचे पुडिंग केले. बऱ्याचशा अळंबी घालून, एक डझन कालव केले. पुडिंगमुळे मी फार खूश झालो फक्त कोटाची शेवटची दोन बटणे लागेनात. पुडिंग फस्त करून मी दिवा बारीक केला. शेकोटीच्या उजेडात बसून, सोफीच्या पुस्तकांकडे पाहू लागलो.

सोफीच्या पुस्तकांनी सोफीला तिथे ओढून आणले. डुलक्या घेतांना झोपण्यापूर्वी, तिचा भावविभोर चेहरा मी स्पष्टपणे पाहिला.

माझ्या पूर्ण झोपेत, हातात तिच्या मूकबधीर मुलीला घेऊन ती माझ्याशेजारी शांतपणे उभी होती. मी रस्त्यावर, रस्त्यापासून दूर, उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम दिशांना, सर्व प्रकारच्या ठिकाणी कधी वाऱ्यासारखा होतो, तर कधी नव्हतो. तिचे शांत मूल तिच्या हातात होते. जेव्हा मी एका धक्क्याने जागा झालो, तेव्हा ती जणू काही क्षणभरासाठीच केवळ माझ्याशेजारी उभी होती आणि लगेच अदृष्य झाल्यासारखी वाटली.

मी गाडीच्या पायऱ्यांवरून येणाऱ्या खऱ्या आवाजाने जागा झालो. एक मूल त्या पायऱ्या चढत येत असल्याचा तो आवाज होता. त्या मुलाचे हावभाव माझ्या इतके परिचयाचे होते, की अर्धा क्षण मला छोटे भूत बघितल्याचा भास झाला. पण खऱ्याखुऱ्या मुलाने दरवाजा बाहेरून उघडल्याचा आवाज आला व ते मूल आत आले. मोठे काळे डोळे असलेली तेजस्वी, छोटी मुलगी आत आली.

माझ्याकडे निरखून बघत, त्या छोटारडीने तिची छोटीशी टोपी काढली आणि काळ्या कुरळ्या केसांच्या बटा तिच्या चेहऱ्याभोवती पसरल्या. मग तिने तिचे ओठ उघडून, मधुर आवाजात विचारले,


"आजोबा?"

मी दचकून ओरडलो, "अरे बापरे, ती बोलू शकते."

“हो, प्रिय आजोबा. मला तुम्हाला असे विचारायचे आहे, की मला बघून तुम्हाला कुणाची आठवण येते का?”

क्षणार्धात सोफी आणि ती मुलगी माझ्या गळयात पडले आणि तिचा नवरा त्याच्या लपवलेल्या चेहऱ्यावरून माझा हात जोराने फिरवत होता. ते क्षण संपेपर्यंत आम्ही सर्वजण थरथरत होतो. तो आवेग ओसरल्यावर, मी पाहिले की ती सुंदर मुलगी अधीरपणे, झटपट तिच्या आईला खाणाखुणा करून सांगत होती, की मी प्रथम तिच्या आईला शिकवले होते. माझ्या डोळयातून दयाद्रपणे आनंदाश्रू ओघळू लागले.

# Mugby Junction
# मुगबाय जंक्शन




## प्रकरण १

“गार्ड, ही कुठली जागा आहे?

“मुगबाय जंक्शन, सर.”

“खूप वारा वाहणारी जागा!”

“हो, साधारण तशीच, सर”

“ही फारशी आरामदायक वाटत नाही.”

“हो, ते खरे आहे, सर”

“ही पावसाळी रात्र आहे का?”

“पाऊस कोसळतो आहे, सर”

“दार उघड. मी बाहेर पडतो आहे.”

उतारू उतरतांना, ओले थेंब त्याच्यावर चकाकत असलेल्या हातातील कंदिलाच्या उजेडात, गार्ड रडक्या चेहऱ्याने म्हणाला, “इथे गाडी तीन मिनिटे थांबते.”

“मला वाटते, जास्त वेळ --- कारण मी पुढे जात नाही आहे.”

“तुमच्याकडे शेवटपर्यंतचे तिकीट असले तरी, सर?”

“ते माझ्याकडे आहे. पण मी ते वापरणार नाही. मला माझे सामान दे.”

“कृपया गाडीजवळ येऊन मला ते दाखवा. सर. एक क्षणही वाया घालवू नका. पटापट नीट बघा.”

गार्ड घाईने सामानाच्या गाडीकडे गेला. प्रवासी त्याच्यापाठोपाठ गेला. गार्ड तिथे पोचला व प्रवासी बघू लागला.

“जिथे तुझा उजेड पडून चकाकतो आहे, त्या कोपऱ्यातील त्या दोन मोठ्या काळ्या बॅगा माझ्या आहेत.”

“त्यावर नाव आहे का, सर?”

“बारबॉक्स ब्रदर्स”

“कृपया, नीट उभे रहा, सर. एक दोन. याच ना?”

लॅम्पस हलला. सिग्नलचा दिवा आधीच बदलत होता. इंजिनमधून शिट्टी झाली. गाडी गेली.

दोन्ही हातांनी त्याच्या गळ्याभोवती लोकरीचा मफलर गुंडाळत, प्रवासी बोलला, “मुगबाय जंक्शन! तीन वाजून गेल्यानंतरच्या अशा भावनात्मक भारलेल्या पहाटवेळी हे आले तर!” तो स्वतःशीच बोलला. आणखी कोणी बोलायला नव्हतेच.

दुसरे कोणी असते, तरी त्याने स्वतःशीच बोलणे पसंत केले असते. नंतर तो फारच लवकर केस करडे झालेल्या एका पन्नाशीच्या आतबाहेर असलेल्या माणसाशी, म्हणजे स्वतःशीच बोलला. काळजीपूर्वक विचार करायची सवय असलेला, उदास करणाऱ्या बाबींसंबंधी विचार करत असल्यासारखे दाखवणारा,

आतला आवाज दाबून टाकलेला; तो माणूस अगदी एकटा असल्याची सर्व लक्षणे दर्शवणारा होता.

वारा व पाऊस सोडून कोणाचे लक्ष न जाता, तो उदास कट्ट्यावर उभा राहिला. धोक्याची शक्यता असल्याने काळजीपूर्वक नजर ठेवणाऱ्या त्या दोन दांडगटांनी त्याच्यावर मारा केला. तो वाद घालत म्हणाला, “मी कुठेही माझा चेहरा वळवला, तरी मला तुमच्या त्रासाचे काही वाटत नाही.”

अशा तऱ्हेने मुगबाय जंक्शनवर रात्रीचे तीन वाजून गेल्यावर, भावनात्मक भारलेल्या पहाटवेळी प्रवासी त्याला हवेचा झोका घेऊन जाईल, तिकडे गेला.

छप्पर असलेल्या जागेच्या शेवटाकडे येत, [मुगबाय जंक्शनवर ते बरेच लांबीचे होते.] तो रात्रीच्या अंधाराकडे बघत राहीला. त्या रात्रीला त्याहून भयानक जोरदार अंधारी वादळाचा तडाखा बसत होता. सोप्या दिशेने व कठीण दिशेने, अशा दोन्ही प्रकारे, त्याने त्याचा खडबडीत चेहरा वळवला. अशा तऱ्हेने भक्कम पाऊले टाकत, प्रवासी वरखाली, वरखाली, वरखाली होत राहीला. काही न शोधता, काही सापडवत राहीला.

पहाटे साडेचार वाजताच्या काळोखात मुगबाय जंक्शनची जागा अंधारी आकारांनी भरलेली होती. कफनाने झाकलेल्या

लांबलचक विचित्र प्रेतयात्रेसारख्या चमत्कारीक मालगाड्या अपराधी भावनेने चमकत्या दिव्यांपासून लांब चालल्या होत्या. जशा काही त्या त्यांच्या गुप्त, बेकायदेशीर अपराधीपणापासून दूर चालल्या होत्या. गुप्तहेराच्या पद्धतीने, जायला मिळेल तेव्हा जात, थांबायला लागेल तेव्हा थांबत व मागे जायला लागेल, तेव्हा मागे जात, अर्ध्या मैलावर असलेल्या कोळशाच्या साठ्याकडे निघाल्या होत्या. पेटलेले लाल, उष्ण कोळसे अंधारात जमिनीवर इकडे तिकडे पडत होते. धडाडून पेटलेले ते कोळसे छळीक आगीसारखे दिसत होते. त्याचबरोबर जसे काही छळ झालेल्या लोकांचे आवाज टिपेला पोचल्यासारखे, घसपटल्याचे आवाज, किंकाळ्या व गुरगुरणे कानावर पडत होते. लोखंडी गज असलेल्या पिंजऱ्यातून, मधूनच जनावरांच्या गळ्यातील घंटांचा व माना खाली घातल्यामुळे, एकमेकांवर घासून होणारा शिंगांचा आवाज येत होता. भीतीने वटारलेले डोळे, विस्फारलेली तोंडे, त्या तिथे बर्फ ओघळून गोठलेले भाग [किंवा तसे काही] त्यांच्या तोंडातून लोंबल्यासारखे दिसत होते. लाल, हिरव्या, आणि पांढऱ्या अक्षरांमध्ये, हवेत कुठल्यातरी माहिती नसलेल्या भाषा भरून राहील्या होत्या. गडगडाटात व वीजांच्या लखलखाटात लंडनला जाणारी भरधाव गाडी, जणू भूकंपालाही सामोरी गेली. सर्वत्र शांत असलेले, गंजके, वारा आणि पाऊस चालू असलेले,

दिवे मालवलेले, मुगबाय जंक्शन पुसट व मृतप्राय दिसत होते. त्याने डोक्यावर, मळभाचे अंधारी वस्त्र ओढले होते.

आता रेंगाळणारा प्रवासी जड पाऊले वरखाली टाकत हळू चालला होता, तेव्हा अंधारात एक धुरकट गाडी त्याच्या शेजारून गेली. ती जीवनाची गाडी होती. कुठल्यातरी खोल, आडव्या, अंधारी बोगद्यातून, ती अचानक काही घोषणा न होता अवतरली. जणू त्याच्या अंगावर चालून आली आणि अज्ञाताच्या दिशेने निघून गेली. ज्याला बालपण व पालक म्हणजे काय हे माहितीच नाही, असे एक मूल बिननावाच्या कडूपणासकट एका तरुणाला चिकटून जवळून रडत चालले होते. गैरप्रकारचा व काही छळीक व्यवसाय असलेल्या एका माणसाबरोबर ते दोघे होते व मागून अविश्वासू पण मित्रासारखी असलेली एक बाई ओढल्यासारखी चालली होती. काही आपटल्याच्या व झटका बसल्याच्या आवाजात सावकाश कशीबशी काळजी घेत, अंधारात ध्यान लावत, मोठ्या मंद निराशांमध्ये बुडत, तीच तीच वर्षे काटत, मतभेदांची व दुःखी अस्तित्वाची लांब, वेडीवाकडी ओळ लावत, अटेन्डंट बसला होता.

“हे सामान तुमचे आहे, सर?”

प्रवाश्याने कुठल्यातरी फालतू गोष्टीवरून नजर काढून, योग्य ठिकाणी लावली व प्रश्नाकडे नीट लक्ष देत, कसाही एक पाऊल मागे सरकला.

“ओहो, क्षणभर माझे लक्ष नव्हते. हो. हो. त्या दोन बॅगा माझ्या आहेत. तू हमाल आहेस का?”

सर, हमालाच्या मजुरीवर आहे पण लँम्पस आहे.” प्रवासी थोडा गोंधळला. “तू कोण आहेस म्हणालास?’

त्याच्या हातातील तेलकट फडके दाखवत, त्याने स्पष्ट केले, “दिवे लावणारा, सर. लँम्पस”

“नक्की. नक्की. इथे कुठे एखादे हॉटेल किंवा खानावळ आहे का?”

लँम्पसने मोठ्या गंभीरपणे बघत, त्याचे डोके हलवले व बोलला, “खरे तर नाही, सर एक नाश्ता मिळण्याचे ठिकाण आहे. पण हे तुमच्यासाठी चांगले आहे, की ते उघडे नाही. सर, ते उघडे असते, तरी तुम्हाला आवडले नसते. आवडले असते का, सर?”

“उघडे असलेले?’

“हे माझे काम नाही. कंपनीच्या कुठल्याही विषयावर मत देण्यासाठी म्हणून नेमलेला मी कंपनीचा पगारी नोकर आहे. त्याने त्या शब्दाचा उच्चार बहुतांशी टूथपीकसारखा [दातात अडकलेले

काढायची टोकेरी बारीक काडी] केला. आत्मविश्वासपूर्ण आवाजात तो म्हणाला, "तेलकट फडक्याशिवाय साध्या माणसासारखे बोलता, मी माझ्या वडिलांना देखील [पण त्यांना जिवंत होऊन परत यावे लागले असते.] नाश्ता मिळण्याच्या ठिकाणी जाऊन त्यांना ते कसे वाटते, हे बघायला सांगितले नसते. एक चांगला मनुष्य म्हणून तरी नक्कीच नाही."

प्रवाश्याने खात्रीपूर्वक रीत्या मान हलवली. "मला वाटते, मी गावात जावे का? इथे एखादे चांगले गाव आहे का? प्रवासी [तुलनात्मक रीत्या तो इतर प्रवाश्यांपेक्षा घरकोंबडा होता.] इतरांसारखाच या जंक्शनवर वाफेच्या वाऱ्यामुळे व लोखंडी सामानाच्या गर्दीमुळे त्रासलेला होता. 'मी किनाऱ्याला लागलो', असे एखादा म्हणेल, तर याचे तसे नव्हते.

"हो, सर. असे एक गाव आहे. तसेही असे एखादे गाव असतेच. पण --- " त्याच्या सामानाकडे एक कटाक्ष टाकत, तो पुढे म्हणाला,"आपल्यासाठी ही रात्रीची फार अडनिडी वेळ आहे. फार भयाण स्मशानशांततेची वेळ आहे."

"आसपास हमाल मिळणार नाही का?

त्याला विश्वासात घेत लँम्पस म्हणाला, "कसे आहे, सर. सहसा ते गाडीबरोबर निघून जातात आणि त्यांनी कदाचित ते

असते तरी, फलाटाच्या दुसऱ्या टोकाकडे चालत जात, तुमच्याकडे दुर्लक्ष केले असते. पण साधारण बारा मिनिटात बहुधा ती येईल."

"कोण येईल?"

"तीन बेचाळीस, सर. वर जाणारी क्ष गाडी गेली, की सेकंदात ही येते आणि मग ती --- " इथे आशादायक रिकामपणाने लॅम्पस भारून जातो. "--- ती जोराने धडधडत जाते."

"मला शंका आहे, की मला याचे आकलन झाले आहे की नाही."

"कुणालाही होईल की नाही, याची मला शंकाच आहे, सर. ती राजकीय आहे. आणि सहसा ती गाव सुधारणा परिषदेवरून जाते. पण संधी मिळेल तेव्हा शिट्टी मारून --- "

"तुला सहलीची गाडी असे म्हणायचे आहे का?"

"बरोबर, सर. ती राजकीय असो वा सैन्यातील, पण ती सेकंदात येते आणि जाते. पण तिला संधी मिळेल तेव्हा, ती शिट्टी देते व पुढे निघून जाते. ती सर्व काही करते --- तिच्या अखत्यारीत असेल तेवढे." लॅम्पसने पुन्हा मोठ्या आशादायी माणसासारखा चेहरा केला.

नंतर त्याने स्पष्ट केले की तुमच्या प्रश्नातील कामावरील हमाल राजकीय मेट्रनच्या आधिपत्याखाली असतात. आणि निःसंशय गाडीबरोबर निघून जातात.

मध्यंतरीच्या काळात, सभ्य लोकांनी दिव्यातील तेलाच्या वासाला फारसा आक्षेप घेतला नाही आणि लहानशा खोलीतील सभ्य लोकांना --- या वेळेपर्यंत --- थंडी वाजू लागलेली असल्याने उबदारपणा मान्य केला गेला.

ती लहानशी तेलकट खोली होती. वास हुंगण्यासाठी सूचक होती. त्यातील गंजक्या शेकोटीत अग्नी भगभग जळत होता. जमिनीवर नवीन लाकडी दिव्यांची मांडण होती. ते गाडीच्या डब्यांमध्ये नेण्यासाठी तयार होते. त्यांचा लखलखाट झाला होता. त्यांचा उजेड आणि उब, यामुळे खोलीचा भाव वाढला होता. बऱ्याच निरनिराळ्या गबाळ्या मांडण्यांमधून, खूपसे दिवे व तेलाचे डबे ठेवलेले होते. शिवाय सर्व दिव्यांसाठी खिशातील छोट्या सुवासिक हातरुमालांचा साठा देखील होता.

बारबॉक्स ब्रदर्स म्हणून [त्याच्या सामानावरील हमीपत्र म्हणून लिहिलेले शब्द] त्याने त्याची जागा घेतली आणि त्याचे हातमोजे काढलेले हात शेकोटीशी धरले. त्याने शेजारील लहानशा खूप शाई सांडलेल्या टेबलावर कोपरे टेकवली. त्यावर

काही खरखरीत कागद व फार जुने मोडक्या अवस्थेतील स्टीलचे एक पेन पडले होते.

त्या कागदांवर एक कटाक्ष टाकून, तो सहज लँम्पसकडे वळला व खरमरीतपणे म्हणाला, “

“काय रे, तू कधी कवी होतास का?”

लँम्पस त्याचे चपटे नाक खूप तेलकट रुमालाने खाजवत नम्रपणे उभा होता, त्यात नक्कीच पारंपारिक दृष्यता नव्हती. कदाचित तो स्वतःला कुणी दुसरेच समजला असता. त्याचे सारे अवयव विचित्रपणे केसांच्या मुळांकडे आकर्षित झाले होते. त्याची कांती नितळ असून विशिष्टपणे चमकणारी होती. बहुधा सतत तेलाने चोळल्यासारखी होती. लहानसे कापलेले व काळेपांढरे असलेले त्याचे आकर्षक केस एखाद्या वर असलेल्या अदृष्य लोहचुंबकाने खेचल्यासारखे उभे राहिले होते. त्याचा डोक्याचा वरचा भाग दिव्याच्या वातीसारखा होता.

बारबॉक्स ब्रदर्स म्हणाला, “पण खात्रीने, हे माझे काम नाही. ते माझे उद्धट निरीक्षण होते.”

माफी मागायच्या सुरात, लँम्पस बोलला, “सर, काही लोक कधीकधी त्यांना न आवडणारे काही करतात.”

दुसरा सुस्कारा टाकत म्हणाला, “माझ्यापेक्षा जास्त कुणालाच माहिती नाही. मी आयुष्यभर मला आवडत नाही तसा आहे. जेव्हा मी प्रथम लहानसहान विनोदी गाणी रचायला सुरवात केली, जसे की --- “ बारबॉक्स ब्रदर्सने त्याच्याकडे रागाने पाहिले.

“ --- लहानसहान विनोदी गाणी रचायला सुरवात केली, जसे की --- आणि अजून जास्त कठीण काय असेल तर नंतर ती गाणे! ते खरेच त्यावेळच्या पद्धतीविरुद्ध होते.”

यावेळी लँम्पसचे डोळे पूर्ण तेलाने चकाकत नव्हते. बारबॉक्स ब्रदर्सने काही लागते नसल्यासारखे, त्याचे लक्ष काढून घेतले व शेकोटीकडे बघायला सुरवात केली. त्याचा पाय वरील बारवर ठेवला. थोड्या वेळाने त्याने अचानक मवाळपणे विचारले, “मग तू ते का केलेस? तू ती गाणी कुठे गाईलास? लोकांसमोर रंगमंचावर?”

यावर लॅम्पसने मोठे कुतूहलपूर्ण उत्तर दिले, “अंथरूणाच्या बाजूला.”

त्याच वेळी जेव्हा प्रवाश्याने त्याच्याकडे स्पष्टीकरणार्थ बघितले त्यावेळी मुगबाय जंक्शन अचानक जोरजोरात हलू लागले. “ती गाडी जागी झाली.” लँम्पस जोराने बोलला व

उद्दीपित झाला. "तिच्या अखत्यारीत काय आहे, ते कधी कमी तर कधी जास्त असते. पण देवाशपथ आज रात्री उठणे तिच्या अखत्यारीत आहे!"

बॅगांच्या दोन काळ्या पृष्ठभागांवर बारबॉक्स ब्रदर्स ही आख्यायिका मोठ्या पांढऱ्या अक्षरात लिहिलेली होती. लवकरच त्या शांत रस्त्याने, एका ट्रकमधून चालल्या होत्या. अर्धा तास त्या आख्यायिकेचा मालक ट्रकच्या पत्र्याखाली शहारला, कुठल्या तरी वेळी हमालाने खानावळीच्या दारावर टकटक करून, पूर्ण गावाला आधी जागे केले आणि शेवटी खानावळीला!

## प्रकरण २

"तरुण जॅक्सन [उर्फ बारबॉक्स ब्रदर्स], तुला मी आठवतो आहे का?"

"तुला नाही तर मी कोणाला आठवणार? तू माझी पहिली आठवण आहेस. माझे नाव मला पहिल्यांदा सांगणारा तू होतास. दर डिसेंबरच्या बारा तारखेला माझ्या आयुष्यात वाढदिवस नावाची छळवादी जयंती येते, हे तू मला सांगितलेस. मला वाटते, आपले शेवटचे बोलणे पहिल्यापेक्षा खरे होते."

"तरुण जॅक्सन, मी कशी आहे?"

"तू मला वर्षभर काही नुकसान करणारी वाटतेस. तू कणखर, पातळ ओठांची, विचार दाबले जाणारी, न बदललेली व मेणाचा मुखवटा घातलेली स्त्री आहेस. तू मला जेव्हा धार्मिक गोष्टी शिकवतेस, तेव्हा तू मला ह्डळीसारखी वाटतेस. कारण तू मला त्याचा उबग आणतेस."

वेगळ्या ठिकाणाहून वेगळ्या आवाजात प्रश्न आला, "मिस्टर तरुण जॅक्सन, तुला मी आठवतो?"

"अगदी नक्की, सर. तुम्ही माझ्या आयुष्यातील आशेचा किरण व महत्वाकांक्षा होतात. जेव्हा मी तुमच्या क्लासला आलो, तेव्हा मला असे वाटले की मी चांगल्या तऱ्हेने बरा झालो आणि आनंदी झालो --- जरी मी तो भयानक मुखवटा घालून त्या घराच्या सीमेवर होतो. त्या शांततेत मी खाल्ले प्यायले. माझ्यासमोर रोज मुखवट्याचे बंधन होते. माझ्या खूप आधीच्या आठवणीतून मी माझ्या शाळेच्या वेळामधून, रोज रोज रोज मी तसे करत होतो."

"तरुण मिस्टर जॅक्सन, मी कुणासारखा आहे?"

"तुम्ही माझ्यासाठी खूप काही आहात. तुम्ही म्हणजे माझ्यासमोर जणू निसर्ग उलगडतो आहे. तुमच्या आस्तित्वामुळे भावना उसळलेल्या तरुण लोकांच्या गर्दीमध्ये मला तुम्ही पुन्हा

ऐकू येत आहात. तुम्ही माझ्या डोळ्यात कधी नाही ते थकलेले अश्रू उभे केले आहेत”.

वेगळ्या ठिकाणाहून वेगळ्या आवाजात प्रश्न आला, “मिस्टर तरुण जॅक्सन, तुला मी आठवतो?”

“चांगलेच आठवता. एक दिवस तुम्ही माझ्या आयुष्यात भुतासारखा प्रवेश केलात आणि जाहीर केलेत की याचे आयुष्य अचानक पूर्णपणे बदलणार आहे. तुम्ही मला दाखवले की बारबॉक्स ब्रदर्सच्या स्वयंपाकघरात माझे कंटाळवाणे स्थान कुठे आहे. [ते जेव्हा होते, मुळात ते असले तर, ते मी ओळखत नाही.] मी काय करायचे, किती पैसे भरायचे, ते तुम्ही मला सांगितलेत. नंतर दर काही वर्षांनी कंपनीसाठी मी भागीदार बनलो व कंपनीचा भाग झालो, तुम्ही मला हे देखील सांगितलेत, की मी केव्हा सही करायची आहे. मला माझ्याबद्दल किंवा त्याबद्दल अधिक काही माहिती नव्हती.”

“तरुण मिस्टर जॅक्सन, मी कुणासारखा आहे?”

“तुम्ही माझ्या वडिलांसारखे आहात. मला कधीकधी वाटते, प्रथितयश मुलाला वाढवण्यासाठी, तुम्ही पुरेसे कडक आणि थंड होतात. मला तुमची अपुरी, लहानशी रक्कम दिसत होती. तुमचा घट्ट, चॉकलेटी सूट आणि घट्ट करडा विग दिसत होता. तुम्ही पण

मरेपर्यंत, मेणाचा मुखवटा घालत होतात. तुम्ही कधीच तो काढला नाही. अजून मला तुमच्याबद्दल काही माहिती नाही.''

जसा प्रवासी मुगबाय जंक्शनवर रात्री स्वतःशी बोलत होता, तसाच तो या पूर्ण संवादादरम्यान, त्याच्या खिडकीजवळ स्वतःशी बोलत होता. नंतर त्याने जेव्हा अंधारात पाहिले, तेव्हा दुर्लक्षित आगीसारखा, म्हणजे सूर्यप्रकाशात न चमकणारा, राखेसारखा करडा रंग झालेला अग्नी त्याने पाहिला व तसाच अगदी झटपट करडा झालेला एक मनुष्य त्याला दिसला.

बारबॉक्स ब्रदर्स कंपनीची नोटरीची व बिलांचे कमिशन घेणाऱ्या दलालाची एक वेगळीच शाखा होती. तरुण जॅक्सनच्या काळापूर्वी तिने चांगले नाव कमावले होते. ती किर्ती त्याला व त्याच्या कंपनीला चिकटून बसली होती. लँबोर्ड रस्त्यापासून लांबवरील कोर्टाच्या कोपऱ्यात, तो चाचपडत, अंधाऱ्या गुहेत आला. तिच्या अंधाऱ्या खिडक्यांच्या काचांवर, बारबॉक्स ब्रदर्स अशी अक्षरे त्याच्या व आकाशाच्या मध्ये अनेक वर्षे कोरलेली होती. जेव्हा त्याने पारंपारिक अविश्वासावर स्वतःचा उंचावलेला सामाजिक दर्जा अयोग्य रीतीने पाहिला, तेव्हा त्याला त्याने केलेले प्रत्येक व्यवहार पुन्हा नीट तपासून बघावेसे वाटले. त्याकाळी त्याचा शब्द तपासलेल्या पैशाच्या कागदाशिवाय ग्राह्य

धरला जात नसे. त्यावर सगळ्या दलालांचे लक्ष असे. हे काम त्याच्याकडे त्याने स्वतः केलेल्या प्रयत्नाने आले नव्हते. उदास स्थितीतील तरुण जॅक्सनची त्याच्या प्रेयसीने व एकुलत्या एक मित्राने फसवणूक केली. त्या मित्राने जॅक्सनच्या प्रेयसीबरोबर पळून जाऊन लग्न केले. इतका शोध लावल्यावर, त्याला बालपणी कसे वाढवले गेले, याचा शोध घेतला गेला. बारबॉक्स ब्रदर्सच्या आठवणींपासून तो घाबरून मागे सरला. त्याला लाज वाटली. त्याने त्याचे डोके परत उचलले नाही.

पण शेवटी त्याने त्याच्या परिस्थितीमधून सुटका होण्यासाठी प्रयत्न केला. त्याने इतका वेळ चालवलेल्या बारबॉक्स ब्रदर्सचे तुकडे केले आणि ती कंपनी बंद करायचे ठरवले.. त्याने स्वतःहून प्रयत्न करून, हळूहळू जुना पारंपारीक व्यवसाय कमी केला. पुरेसे पैसे साठल्यावर, [पण शेवटी फारसे नाहीत.] त्याने बारबॉक्स ब्रदर्स कंपनी गुंडाळली. पोस्टाच्या डिरेक्टरीमधून व पृथ्वीवरून ते नाव रद्द झाले. फक्त दोन बॅगांवर ते नाव उरले.

खानावळीच्या खिडकीतून मुगबायच्या मोठ्या रस्त्याला त्याने स्पष्टीकरण दिले, “एखाद्याला सामान उचलायला त्यावर काहीतरी नाव पाहिजेच. आणि कधीकाळी ते खरेच अस्तित्वात होते.”

तर! --- म्हाताऱ्या जॅक्सनसाठी ते दुःखाने तरुण जॅक्सनच्या व्यंगाला चिडवणे होते.

अगदी वेळेवर त्याने त्याची टोपी घेतली व तो बाहेर गेला. तेव्हा रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला त्याला छोट्याशा गाठोड्यात त्याचे जेवण घेऊन जाणारा, मखमलचे भासणारे सुती कपडे घालून चाललेला मनुष्य दिसला. संशयातीतपणे ते गाठोडे कदाचित भरपेट जेवणाचे असावे. तो मुगबाय जंक्शनकडे जोराने धावत निघाला होता.

बारबॉक्स ब्रदर्स म्हणाला, “तो बघा दिवावाला मनुष्य! आणि तसेही --- “

हे नक्कीच विचित्र होते. इतका गंभीर, इतका स्वतंत्र वृत्तीचा व नुकतीच तीन दिवसापूर्वी संथ कामातून सुटका झालेला माणूस असा त्याची हनुवटी खाजवत, तपकिरी अभ्यासिकेत विनोदी गाणी म्हणत धावत निघालेला असावा!”

बारबॉक्स ब्रदर्स म्हणाला, “शिवाय अंथरुणाजवळ तो गाणी म्हणतो? तो पिऊन अंथरुणाजवळ गेल्याशिवाय असे कसे म्हणेल? पण तो म्हणतो. मला आश्चर्य वाटायला नको. पण ते बघायचा माझा काय संबंध? मला मुगबाय जंक्शनकडे बघायला हवे. मुगबाय जंक्शनकडे! आता यापुढे मी कुठे जाऊ? काल रात्री

डब्यात मी अस्वस्थ झोपेतून उठलो आणि मला स्वतःला इथे पाहिले, तेव्हा आता मी इथून कुठेही जाऊ शकतो, नाही का? मी आता कुठे बर जाऊ? मी दिवसा जंक्शनवर जाऊन बघतो. काही घाई नाही. आणि मला एकापेक्षा दुसरा मार्ग जास्त आवडेल.”

पण तिथे इतके मार्ग होते. जंक्शनवरील पुलावरून त्याकडे बघता, असे वाटत होते, की कंपन्यांनी गर्दी करून, जमिनीवर कोळ्यांचे लोखंडी जाळे विणून, औद्योगिक प्रदर्शन भरवले आहे. कितीतरी रेषा नवलपूर्ण रीतीने, एकमेकात इतक्या गुंतल्या होत्या, की डोळे फिरत होते. त्यातील काही पाचशे मैल धावत जाण्याचा इरादा असल्यासारख्या वाटत होत्या. आणि अचानक फालतू अडथळ्याला धडकून, त्या एका कारखान्यात घुसल्या होत्या.

मग तिथे लोक सरळ चालत होते आणि गोल फिरून ते परत आले. मालगाडीचे काही डबे कोळशानी, बाकीचे दारुनी व इतर लोखंडी सामानांनी वगैरे फार भरले होते. आणि उरलेले लोखंडी व सुती रिळे, अशा चाकांच्या वस्तूंनी ठासून भरलेले होते. इतर सर्व डबे फार चकचकीत आणि स्वच्छ होते. आणि इतर काही कामाच्या नसलेल्या सामानांनी भरलेले होते. त्यात पाय वर करून काही लोक बसले होते. [जसे काही त्यांचे मालक संपावर गेले

होते.] तिथे सुरवात, मध्य वा शेवट काही नव्हते किंवा शेवट गोंधळलेला होता.

बारबॉक्स ब्रदर्स त्यांचा उजवा हात कपाळावरील आठ्यांवरुन फिरवत पुलावर गोंधळून उभे राहिला, जसे काही तो रेल्वेच्या रूळांचा फोटो एखाद्या भावदर्शक ताटलीवर काढायचा प्रयत्न करत आहे. अशा तऱ्हेने खाली ते दृष्य बघतांना त्या आठ्या वाढत होत्या. मग लांबून घंटानाद व शिट्ट्यांचा आवाज आला. नंतर ओळीने ठेवलेल्या पेट्यांमधून बाहुल्यांसारख्या दिसणाऱ्या माणसांची डोकी बाहेर डोकावली व परत आत गेली.

मग टोकावर बसवलेले मोठ्या आकाराचे लाकडी रेझर्स वातावरण कापून काढू लागले. मग हलणारी इंजिने अनेक दिशांनी त्रासिकपणे किंचाळू लागली. नंतर एका बाजूने गाडी आली. दुसऱ्या दोन गाड्या येतांना दिसत नव्हत्या. पण त्या थांबल्या मग काही गाड्या मोडून त्यांचे तुकडे झाले. मग हलणाऱ्या वाहनांनी गाडीचे तुकडे वाटून घेतले. हे सगळे बारबॉक्स ब्रदर्सचे उर्फ जॅक्सनचे विचारचक्र चालले होते.

तो बोलला, "मी माझी पुढची खेळी अजून पुरेशी स्पष्ट केलेली नाही. काही घाई नाही. आजच, उद्या किंवा परवा माझ्या

मनाची तयारी करायचे काही कारण नाही. मी एक चक्कर मारतो.”

कसे कुणास ठाऊक, पण हे बाहेर फुटले. [कदाचित त्याला तेच व्हायला हवे असेल.] लँम्पसच्या खोलीवर व रेल्वे फलाटावर फिरणे झाले. पण लँम्पस त्याच्या खोलीत नव्हता. दिव्याच्या खोलीतील शेकोटीजवळील भिंतीवरील खुणांजवळ खांद्यावर मखमली वस्त्र घातलेली एक जोडी रेंगाळत होती. पण बाकीची खोली पूर्णपणे रिकामी होती. परत स्टेशनवर जाण्यासाठी त्याला त्याच्या रिकामपणाचे कारण मिळाले. गाड्यांच्या डब्याडब्यांवरील टपावरून रेल्वेच्या विरुद्ध बाजूच्या दृष्यातील दिवे बघण्याचे सौख्य त्याला मिळाले.

“लँम्पस कार्यमग्न असावा. मला वाटते, आज सकाळी त्याला गाणी लिहायला किंवा म्हणायला फारसा वेळ मिळाला नसावा.”

आता कडेची दृष्ये बघत बारबॉक्स ब्रदर्सने रेल्वेच्या कडेने गावाकडे जाण्याचा रस्ता धरला. भोवताली बघत तो म्हणाला, “माझे नक्की ठरत नाही, की या रेल्वे रूळांबरोबर या इथे स्थिर व्हावे की दुसरीकडे कुठे जावे! हे रूळ इथे एकमेकांपासून व गोंधळापासून अलग होतात व आणि त्यांच्या मार्गाने जातात.”

एक छोटासा डोंगर चढून तो काही झोपड्यांपाशी आला. पूर्वी स्वतःच्या आयुष्यात कधी न डोकावलेल्या, सर्वांपासून अलिप्त रहाणाऱ्या त्याने सहा ते आठ लहान मुलांना आरडाओरडा करत, एका झोपडीतून बाहेर पडून, वेगवेगळे होतांना पाहिले. ते सर्वजण एका बागेच्या दरवाज्यातून आत शिरले. वर फार उंच नसलेल्या खिडकीतील एका चेहऱ्याला त्यांनी हाताने स्पर्श केला. त्या वस्तीमध्ये वर एकच मजला होता.

आता मुलांनी असे करावे, यात काही विशेष असे नव्हते. पण खिडकीच्या भागाला लागून असलेल्या आडव्या चेहऱ्याला त्यांनी स्पर्श केला होता. बहुतेक तो नुसता चेहराच होता. काहीतरी विशेष असे दिसत होते. त्याने वर नजर वळवून परत खिडकीकडे पाहिले. त्याला खिडकीच्या कडेवर एक गाल ठेवलेला खूप तेजस्वी पण ठिसूळ चेहरा दिसला. तो एका मुलीचा वा बाईचा नाजूक हसरा चेहरा होता. तिचे निळया पट्ट्यात बांधलेले लांब, चकचकीत व सोनेरी केस तिच्या चेहऱ्याभोवती व हनुवटीखाली पसरले होते.

तो पुढे चालत राहिला. मागे वळून बघितले. परत खिडकीवरुन गेला. हळूच आत पाहिले. काही फरक नाही. टेकडीवर त्याला अचानक मोठा रस्ता लागला एरवी तो त्या

रस्त्याने खाली आला असता. पण थोडे अंतर चालून तो मुख्य रस्त्याला आला. आणि पुन्हा त्याला त्या झोपड्यांवरून जाता आले. तो चेहरा अजूनही खिडकीशी होता. पण त्याच्याकडे फारसा वळलेला नव्हता. आता तिथे दोन नाजूक हातही दिसू लागले. एखादे वाद्य वाजवत असल्यासारखी त्यांची हालचाल होती. पण त्याच्या कानावर काही आवाज तर येत नव्हता.

टेकडी उतरताना त्याने विचार केला, ‘मुगबाय जंक्शन ही इंग्लंडमधील सर्वात मूर्ख जागा असली पाहिजे. मला पहिल्यांदा इथे कुठली गोष्ट सापडली असेल, तर ती म्हणजे गाणी रचणारा व त्याच्या अंथरुणाशेजारी ती म्हणणारा. रेल्वेचे दिवे लावणारा मनुष्य. दुसरी कुठली गोष्ट सापडली असेल तर या चेहऱ्याशेजारील वाद्य वाजवणारे पण काही आवाज न येणारे, म्हणजे खरे तर न वाजवणारे दोन हात.

तो दिवस नोव्हेंबरच्या सुरवातीचा छान प्रकाशाचा होता. हवा स्वच्छ होती. उल्हसित करणारी होती. आजूबाजूचे दृष्य सुंदर रंगांचे व आकर्षक होते. लंडन शहरातील लोम्बार्ड रस्त्यावरील कोर्टातील निसर्गात फारसे रंग नव्हते. जे होते ते थोडे उदास करणारेच होते. जेव्हा दुसरीकडील हवा खूप प्रकाशाची होती,

तेव्हा तेथील तंबूमध्ये रहाणारे लोक मळभ दाटलेला दिवस बघत होते. नेहमीसाठी त्यांचा दिवस काळ्या ढगांचा होता.

त्याने त्याचे चालणे इतके आनंदाने केले, की दुसऱ्या दिवशीही तो तसेच चालला. तो आदल्या दिवशीपेक्षा झोपड्यांजवळ थोडा लवकर पोचला. त्याला वरून मुले चांगले गात असल्याचा व टाळ्या वाजवून ताल देत असल्याचा आवाज आला.

कोपऱ्यातून ऐकत तो बोलला, "अजूनही कुठल्या वाद्याचा आवाज येत नाही. तरीही मी आल्यापासून तालातील टाळ्या ऐकतो आहे. ती मुले काय गात आहेत? अरे देवा, ती नक्कीच पाढे म्हणत नाही आहेत!"

ती मुले फारच मजा घेत गात होती. एका गूढ चेहऱ्याचा आवाज प्रसंगानुरूप सगळयांना योग्य मार्गावर नेत होता. त्या स्वराचा आनंदीपणा फार छान होता. काही वेळाने गाणे संपले व मुलांची तरुण आवाजातील कुजबुज सुरु झाली. मग वर्षातील या महिन्याचे गाणे व शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्याना त्याने काय पिकवून दिले, ते गाणे मुलांनी सुरु केले. मग छोट्या पायांची गडबड सुरु झाली. आदल्या दिवशीसारखीच ती मुले मस्ती करत बाहेर आली. ते सगळे बागेच्या फाटकापाशी जमले आणि

सगळ्यांनी खिडकीतील चेहऱ्याला हात लावून जणू चुंबन घेतले. मात्र बारबॉक्स ब्रदर्स कोपऱ्यावरील त्याच्या तोट्यात जाणाऱ्या निवृत्तीच्या जागेवरून ते पाहू शकला नाही.

मात्र मुले जशी निघून गेली, तसे त्याने एका चॉकलेटी चेहऱ्याच्या व अंबाडीसारखे केस असलेल्या मुलाला धक्का दिला. त्याला तो म्हणाला, "अरे छोटारड्या, इकडे ये. हे कुणाचे घर आहे?"

त्या मुलाने त्याचा काळा हात डोळ्यांवर नेत, अर्धे लाजत व अर्धे धीटपणे त्याच्या भुवईच्या आडून सांगितले,

"फोबेचे."

"आणि फोबे कोण आहे?" बारबॉक्स ब्रदर्सने संवादामध्ये त्या मुलाइतकेच लाजत विचारले.

त्यावर मुलगा उत्तरला, "का? फोबे म्हणजे फोबे."

त्या उत्तम निरीक्षक असलेल्या छोटारड्याने प्रश्नकर्त्याकडे निरखून पाहीले आणि त्याची नैतिक चाचपणी केली. नम्र संभाषणाच्या कलेत माहीर नसलेली बिन ओळखीची व्यक्ती म्हणून, ओळखल्याचे व काही धोका नसल्याचे गृहीत धरले.

तो मुलगा म्हणाला, "फोबे म्हणजे दुसरी तिसरी कोणी नसून फोबे आहे, नाही का?"

"नाही. मला नाही असे वाटत."

मुलगा बोलला, "ठीक आहे. पण तुम्ही मला हे का विचारता?"

भविष्याची काळजी घेणे कमी करत, बारबॉक्स ब्रदर्सने नवीन पवित्रा घेतला.

"ती उघडी खिडकी असलेल्या वरील खोलीत तुम्ही काय करता? तिथे जाऊन तुम्ही काय करता?"

"अहो, शांत व्हा."

अजून जोराने मुलगा परत बोलला, "शा --- आ --- नंत व्हा." टक लावून बघत जणू तो म्हणत होता, "एखाद्या गाढवासारखे, जर तुम्हाला मला समजून घेता येत नसेल, तर तुम्ही इतके मोठे वाढलात त्याचा काय उपयोग आहे?" बारबॉक्स ब्रदर्सने म्हटले, "शाळा, ओहो, शाळा. हो. हो. हो. आणि फोबे तुम्हाला शिकवते." मुलाने मान हलवली.

"शहाणा मुलगा."

मुलगा म्हणाला, "शेवटी, तुम्ही शोधून काढलेत तर?"

"हो. मी शोधून काढले. मी तुला दोन पेनी दिल्या तर तू काय करशील?"

“खर्च करेन.”

त्याच्या झटपट उत्तरातील दृष्टीकोन बघून, त्याला अधिक वेळ उभे न करता, बारबॉक्स ब्रदर्सने लगेच त्याच्या हातावर दोन पेनी ठेवल्या आणि स्वतःची प्रतिष्ठा धोक्यात येण्यापासून स्वतःला वाचवले.

पण जाताना, खिडकीच्या कडेवरील चेहरा बघून, त्याला फोबे तिथे असल्याचे लक्षात आले. त्याने तिथे हावभाव पाहिले. पण त्यात मान हलवणे नव्हते वा झुकणेही नव्हते. त्याने डोक्यावरील टोपीही काढली नाही. तो त्या हावभावांबरोबर सलोखा करायच्या गुंत्यात सापडला. चेहऱ्याचे डोळे करमणूक झाल्यासारखे, आनंदी दिसले. आणि ओठ म्हणाले, “सर, तुम्हाला शुभ दिवस.”

परतताना पुन्हा एकदा रस्त्यावर थांबून, अनेक ठिकाणी विखुरलेल्या शांत रूळांकडे बघत बारबॉक्स ब्रदर्सने गंभीरपणे म्हटले, “मला वाटते, की मी काही वेळ मुगबाय जंक्शनला चिकटून राहिले पाहिजे. “मला ठरवता येत नाही, की कुठल्या मार्गाने जावे. खरे तर, काही ठरवण्यापूर्वी मला या जंक्शनची थोडी सवय केली पाहिजे.”

त्यामुळे त्याने खानावळीत जाहीर केले, “अजून काही दिवस मी तिथे रहाणार आहे.” त्याने त्या रात्रीच्या वेळी जंक्शनची ओळख वाढवण्याचे ठरवले. अजून दुसऱ्या दिवशी सकाळी आणि पुन्हा दुसऱ्या रात्री आणि सकाळी त्याने स्टेशनवर जाणे, तेथील माणसांबरोबर मिसळणे, रेल्वेचे सर्व मार्ग समजावून घेणे व सर्व येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांमध्ये रुची घेणे, हे चालू ठेवले. पहिल्यांदा तो लँम्पसच्या लहानशा खोलीत, डोके घालत असे. पण लँम्पस तिथे कधीच नसे. खांद्यांवर मखमली कपडे घातलेली जोडी तिथे शेकोटीवर वाकलेली सापडे. कधीकधी चाकू व पावाचा किंवा मासाचा तुकडा हातात घट्ट धरलेली ती असे आणि त्याने विचारले, ”दिवे लावणारा मनुष्य कुठे आहे?” तर उत्तर मिळे, ”रेल्वे रूळांच्यापलीकडे.” किंवा, “आता त्याचा रिकामा वेळ आहे.” [दुसऱ्या बाबतीत] त्याचा नसलेल्या दुसऱ्या कुण्या दिवे लावणाऱ्या माणसाची खासगी रीत्या ओळख करून दिली गेली. तो त्याचा लँम्पस नव्हता. लँम्पसला भेटण्यासाठी तो इतका काही आतुर झालेला नव्हता. पण तरीही त्याची निराशा झाली. व्यायामाकडे दुर्लक्ष करून, मुगबाय जंक्शनचा फार अभ्यास करण्याचे त्याने ठरवले नाही. उलट त्याने रोज एक चक्कर मारली. नंतरही नेहमी ती तशीच मारली. पण परत हवा थंड आणि

ओलसर झाली आणि त्याला ती खिडकी कधीच उघडी सापडली नाही.

## प्रकरण ३

काही दिवसांनंतर छान उजेडाची हिवाळी हवा पडू लागली. तो शनिवार होता. खिडकी उघडी होती आणि मुले गेलेली होती. त्यात काही नवल नव्हते. कारण त्याने कोपऱ्यात थांबून मुले जाईपर्यंत वाट बघितली होती.

त्याने डोक्यावरील टोपी पूर्णपणे काढत, त्या चेहऱ्याला शुभ दिवस म्हटले.

“सर, तुम्हालाही शुभ दिवस.”

“मला आनंद आहे, की पुन्हा छान आभाळ बघायला मिळते आहे.”

“सर, आभारी आहे. हा तुमचा दयाळूपणा आहे.”

“मला भीती वाटते, तुम्ही अपंग आहात का?”

“नाही सर, माझी तब्येत एकदम चांगली आहे.”

“पण तुम्ही नेहमी पडलेल्या असता?”

“हो. हो. मी पडून असते, कारण मला बसता येत नाही. पण मी अपंग नाही.” त्याच्या मोठ्या चुकीवर तिचे हसरे डोळे मजा वाटल्यासारखे दिसले.

“सर, आपण आत येण्याचे कष्ट घ्याल का? या खिडकीतून सुंदर दृष्य दिसते. तुम्हाला दिसेल, की मी मुळीच आजारी नाही. माझी काळजी करण्यासारखे काही नाही.”

तो चुळबुळ करत उभा राहिला पण शेवटी मनाचा हिय्या करून, त्याचा लाजरा हात बागेच्या दाराच्या कुलुपावर ठेवून, आत शिरला.

वरची खोली खाली छत असलेली पण पांढरी शुभ्र व एकदम स्वच्छ होती. त्यात राहणारी एकमेव व्यक्ती कोचावर पहुडली होती. तिचा चेहरा खिडकीच्या उंचीला पोचत होता. कोच देखील पांढरा होता. तिचा साधा ड्रेस केसांवरील पट्ट्याप्रमाणे फिकट निळा होता. तिची नजर नाजूक, स्वर्गीय होती. तिच्या वेगळ्याच आविर्भावावरून ती ढगात पहुडली आहे, असे वाटत होते. त्याला वाटले की तिचा असा समज झाला असणार, की तो सवयीने खालच्या जातीचा असून संभाषणचतुर नसावा. इतक्या सहजतेने तिला समजून घेता आले, म्हणून त्याला बरे वाटले आणि मग ते संपले. त्याला थोडा संकोच वाटू लागला. तथापि

त्याने तिच्या हाताला स्पर्श केला व कोचाशेजारी खुर्ची ओढून घेतली.

त्याने चाचरत सुरवात केली, "आता मला कळले, तुम्ही तुमचा हात कसा कामात ठेवता. तुम्हाला फक्त रस्त्यावरून बघतांना, मला वाटले तुम्ही काही वाद्य वाजवत आहात."

ती चटपटीतपणे व कौशल्याने लेस विणत होती. तिच्या छातीवर एक उशी पडली होती. काम करतांना तिचे हलणारे हात व चटपटीत हालचाली यामुळे त्याला [ती वाद्य वाजवत असल्यासारखे] काही वेगळे वाटले होते.

चमकदार हसू हसत, ती उत्तरली, "हे उत्कंठापूर्ण आहे. कारण मी नेहमी अशी कल्पना करते की मी काम करतांना, काही धून वाजवत आहे."

"तुम्हाला काही सांगितीक ज्ञान आहे?"

तिने मान हलवली.

"जर माझ्याकडे लेस विणण्याइतके सहजप्राप्य असे एखादे वाद्य असते, तर मला वाटते मी ते सहज वाजवू शकेन. मी असे म्हणण्याचे धारिष्ट्य करते. खरे तर, मी मला फसवत आहे. कुठल्याही प्रसंगी, मला ते कधीच माहिती होणार नाही."

“तुमच्याकडे सांगितीक आवाज आहे. मी तुम्हाला गातांना ऐकले आहे.

“मुलांबरोबर? हो. हो. तेच जर गाणे असेल, तर मी प्रिय मुलांबरोबर गाते.”

बारबॉक्स ब्रदर्सने दोन लहान कागदांकडे दृष्टी टाकली. आणि तर्क केला की तिला मुले आवडत असावीत. आणि तिच्याकडे त्यांना शिकवण्याची नवीन दृष्टी असावी.

परत ती डोके हलवत, म्हणाली, “मला मुले फारच आवडतात. मला शिकवण्यात असलेल्या रुचीशिवाय मुलांना त्यातून आनंद मिळतो. याशिवाय त्यासंबंधी काहीही माहिती मला नाही. कदाचित माझ्या छोट्या हुशार मुलांनी गाईलेल्या पुस्तकातील कविता ऐकून, तुम्ही गैरसमज करून घेतला असेल, की मी उत्तम शिक्षक आहे. मला असे वाटते. मी त्यासंबंधी फक्त वाचले आहे. आणि त्या पद्धतींबद्दल ऐकले आहे. मला त्याना शिकवायला इतके छान व प्रसन्न वाटते. ते पण माझे शिकवणे गोड मानून घेतात. सर, माझा हा शिकवण्याचा छोटासा आनंद मिळवण्याचा मार्ग आहे, हे तुम्हाला सांगायची काही गरज नाही.” तिने दोन लहान कागदांवर दृष्टीक्षेप टाकून, खोलीभर बघितले.

हा सर्व वेळ तिचे हात लेस विणण्यात गुंतलेले होते. अजूनही तो सुयांचा खणखणाट चालूच होता. आणि संभाषणासाठी तो पर्याय होता. बारबॉक्स ब्रदर्सने तिचे निरीक्षण करायची ही संधी घेतली. त्याने अंदाज केला की ती तिशीची असावी. तिचा नितळ चेहरा व मोठे चमकते डोळे काही निष्क्रीयपणे थांबलेले नव्हते, तर कार्यरतपणे व अगदी मनापासून आनंदी होते. तिने कार्यमग्न हातसुद्धा --- इतके बारीक असल्याने, थोडी करुणा निर्माण करत होते. पण मोठ्या आनंदी धैर्याने ती करुणासुद्धा, ठामपणे तिची महत्ता व नम्रता सांगत होते. त्याने तिला डोळे उचलून त्याच्याकडे बघतांना पाहीले व स्वतःचे डोळे भविष्याकडे वळवून म्हटले, "खरेच सुंदर!"

"सर, मला कधीकधी असे वाटते, की नुसते सरळ डोके कसे दिसते, हे बघण्यासाठी तरी मला एकदा बसायला आवडेल. पण असल्या गोष्टींची कल्पना करणे म्हणजे मूर्खपणा आहे. दुसऱ्या कशाहीपेक्षा ते मला खूप आवडेल."

ती बोलतांना तिचे डोळे त्या बसण्याच्या सर्वात आनंददायी, स्तुतीपर आणि मजा येईल, अशा घटनेकडे लागले होते. हे कधी शक्य नसल्याची खंत त्यात दिसत नव्हती.

ती बोलत राहिली, "ते रेल्वेचे जाळे, त्याचे धुराचे लोट, जागा बदलणाऱ्या वाफेचे लोंढे, हे माझ्यासाठी खूप जिवंत होते. व्यापारासाठी किंवा मजा म्हणून, जे लोक त्यांना पाहिजे तिथे जाऊ शकतात, अशा लोकांचा मी नेहमी विचार करते. हे धुराचे ढग मला खुणावतात. मी पण त्यांच्याबरोबर जाते आहे, असे मला वाटते. अनेक लोकांच्या गर्दीबरोबर, भविष्यात ते अजून जिवंत होतात. तिथे एक मोठे जंक्शनही आहे. मला ते टेकडीच्या पायथ्याशी दिसत नाही. पण मला ते ऐकू येते. मला माहिती आहे, की ते तिथे आहे. मी त्याच्याशी एकरूप होते. एक प्रकारे मला माहिती नाही, की मी किती जागांना व किती गोष्टींना मुकले आहे.

एखाद्याला कल्पना करायला लाज वाटेल, असे काही त्याच्या मनात आधीच आले होते. असे त्याने कधी पाहिले नव्हते. पण परिस्थिती त्याला तसे करायला लावत असल्यासारखे त्याने म्हटले, "असेच तुम्ही बाहेरील दृष्याशी एकरूप होत रहा ---"

फोबे आधीचा धागा पकडून बोलली, "सर, तुम्ही बघता आहात, तुम्हाला वाटते तशी, मी अपंग नाही. मी खरे तर चांगलीच आहे."

बारबॉक्स ब्रदर्स कदाचित स्वतःच्या थोड्या माफ करण्यायोग्य अंतर्गत गुणांनी म्हणाला, “तू फार आनंदी आहेस.”

ती उत्तरली, “पण तुम्ही माझ्या वडिलांना बघायला हवे होते. ते तर फार आनंदी असतात. सर, ठीक आहे.” जिन्यातील पायरीवर त्यांच्यातील आत्मविश्वासाने त्यांना दगा दिला तरी काही त्रासदायक, नको ते घडेल, असे त्याना वाटतच नाही. “हे माझे वडील येत आहेत.”

दार उघडले व वडील तिथे थांबले.

खुर्चीवरून उठत, बारबॉक्स ब्रदर्स ओरडला, “अरे लॅंम्पस, तू? कसे काय, लॅंम्पस?”

लॅंम्पस उत्तरला, “कुठेच नसलेला सभ्य गृहस्थ! सर, कसे काय?” असे म्हणून त्यांनी हस्तांदोलन केले. लॅंम्पसच्या मुलीला याचे आश्चर्य व कौतुक वाटले.

बारबॉक्स ब्रदर्स बोलला, “मी त्या रात्रीपासून तुला अर्धा डझन वेळा तरी शोधण्याचा प्रयत्न केला. पण तू कधीच सापडला नाहीस.”

लॅंम्पस बोलला, “असे मी ऐकले. असे मी ऐकले. कुठलीही गाडी न घेता, तिथे असणाऱ्या तुम्हाला जंक्शनवर मी नेहमी बघतो. त्यामुळे आम्ही तुम्हाला असे नाव ठेवले आहे की ‘कुठे न

जाणारा सभ्य गृहस्थ.' सर, मला वाटते, तुम्हाला अशा नावाने संबोधित केल्याने तुम्हाला नवल वाटले नसेल."

"अजिबात नाही. तू मला इतर कुठल्याही नावाने संबोधले असतेस, तसेच हे एक नाव! पण मी तुला एक प्रश्न विचारू शकतो का?"

लॅम्पस यातनामय रीतीने त्याच्या मुलीच्या कोचापासून अलग झाला.

"तू ज्या अंथरुणाशेजारी गाणी गायचास, तेच हे अंथरूण का?"

लॅम्पसने मान हलवली.

कुठल्याच नसलेल्या सभ्य माणसाने त्याच्या खांद्यावर थोपटले व त्यांनी एकमेकांकडे बघितले.

नंतर लॅम्पस त्याच्या मुलीकडून तिच्या पाहुण्याकडे बघत म्हणाला, "माझ्या शब्दावर विश्वास ठेव. मला इतके आश्चर्य वाटते आहे, की तुझी या पाहुण्याशी ओळख झाली.[या पाहुण्याने मला माफ केले तर] मी तुम्हाला ओवाळून तुमची अलाबला काढतो."

मिस्टर लॅम्पसने त्याला काय म्हणायचे आहे, ते करून दाखवले. त्याने त्याचा तेलकट रुमाल बाहेर काढला. गुंडाळून

त्याचा चेंडू केला आणि तो चिकटगुंडा त्याच्या उजव्या कानामागून वर गालापर्यंत, कपाळावरुन आडवा नेत, दुसऱ्या गालावरून खाली आणत, डाव्या कानाच्या मागे नेला. हे केल्यावर तो फारच चमकू लागला.

माफी मागत तो म्हणाला, “सर, कुठल्याही काळजीच्या किंवा उदासीच्या अवस्थेनंतर मला असे करायची सवय आहे. तुमची फोबेशी ओळख झालेली बघून खरेच मी इतका आश्चर्यचकित झालो आहे, की मला वाटते मी, तुम्ही मला माफ केले तर, मी तसेच परत करतो --- तसे त्याने केले आणि त्यामुळे तो बराच सावरला.

ते दोघेही आता कोचाशेजारी उभे होते आणि तिचे लेसकाम चालू होते. बारबॉक्स ब्रदर्स अजूनही अर्धलज्जित मुद्रेने बोलला, “तुझ्या मुलीने मला सांगितले, की ती कधीच बसू शकत नाही.

“नाही, सर. तिने ते केव्हाच केलेले नाही. तिच्या आईला [जी ती एक वर्ष व दोन महिन्याची असतांना वारली] फिट्स येत असत. ते तिने मला कधीच सांगितले नव्हते. त्यामुळे त्यावर काही उपाय केला गेला नाही. याचा परिणाम म्हणून तिच्या हातून बाळ पडले व तेव्हापासून तिचे असे झाले.”

बारबॉक्स ब्रदर्स भुवई रागीट करत बोलला, “हे तिने फार चुकीचे केले. तुझ्याशी लग्न केले. पण तिचे वैगुण्य मात्र झाकून ठेवले.”

खूप काळ या आजाराने ग्रासलेल्या मुलीची बाजू घेत लॅंम्पस बोलला, “ठीक आहे, सर. असे बघा, फोब आणि मी, आम्ही याबद्दल बोललो आहोत. देव आमच्यावर दया करो. आमच्यावर ओढवलेले हे वैगुण्य इतके आहे, की फिट्स येणे काय किंवा फिट्स न येणे काय, याबद्दल आम्ही जर लग्नापूर्वी बोललो असतो, तर कुणाची लग्नेच झाली नसती.”

“हे काही बरे घडण्यासाठीच कशावरून झाले नसेल?

तिचा हात वडीलांच्या हातात देत फोब बोलली, “या बाबतीत तसे नाही, सर.”

तिचा हात आपल्या दोन्ही हातात थोपटत, तिचे वडील बोलले, “या बाबतीत तसे नाही, सर.”

चेहऱ्यावर लाली पसरवत, बारबॉक्स ब्रदर्स बोलला, “तुम्ही माझे बोलणे दुरुस्त केले. मला रानटीच म्हटले पाहिजे. मी कबूल करतो, की ती शारीरिक कमतरता माझ्यासाठी फारशी नाही. मला वाटते, की तुम्ही तुमच्याबद्दल अजून थोडे सांगितलेत तर बरे होईल. ते कसे विचारायचे, ते मला समजत नाही. कारण मला

सामाजिक रीतीरिवाज फारसे माहिती नाहीत. मी थोडा घाबरटही आहे. पण तुम्ही ते सांगावे, असे मला वाटते.”

त्या दोघांसाठी लँम्पस आनंदाने बोलला, “अगदी मनापासून सांगतो, “पहिल्या प्रथम माझे नाव जाणून घ्या --- “

पाहुणा थोडे लाजत म्हणाला, “चालू ठेव. तुझ्या नावात काय मोठे आहे? ‘दिवे लावणारा मनुष्य’ हे नाव माझ्यासाठी पुरेसे आहे. मला ते आवडते. ते छान व बोलके आहे. अजून तुला काय हवे?”

दिवे लावणारा मनुष्य उत्तरला, “सर, का म्हणजे? खात्री करण्यासाठी. सामान्यपणे जंक्शनवर मला दुसरे नाव नाही. पण मला वाटते, तुम्ही इथे कदाचित काही खासगी कामासाठी, तुम्ही कदाचित --- “

पाहुण्याने हाताने त्याचे विचार उडवून लावले. आणि दिवे लावणाऱ्या मनुष्याला परत हात ओवाळून टाकतांना, त्याच्यात आत्मविश्वास दिसला.

जेव्हा हात ओवाळून टाकायचा विषय पाहिजे त्यापेक्षा खूप खराब पद्धतीने त्यातून आला, तेव्हा बारबॉक्स ब्रदर्स बोलला, “तू खूप कष्ट घेणारा आहेस. मग तू सांगतो आहेस, असे मी धरून चालू?”

दिवे लावणारा मनुष्य सुरवात करत होता. “हो. त्यात तसे विशेष काही नाही.” तेव्हा त्याची मुलगी बोलू लागली.

“ओहो, हो सर, ते फार कष्टाळू आहेत. दिवसाला चौदा, पंधरा अठरा तास किंवा कधीकधी ते चोवीस तासही काम करतात.

आणि तू, फोबे, तुझ्या शाळेचे काय? आणि लेस विणण्याचे काय --- ?”

“पण माझी शाळा माझा आनंद आहे.” त्याचा इतका हट्टीपणा बघून, नवल वाटत व तिचे चॉकलेटी डोळे पूर्ण उघडत, ती बोलली. मी लहान मुलगी असतानाच मी शाळा सुरु केली. कारण त्यामुळे माझा मुलांशी संपर्क वाढतो. तुम्हाला कळत नाही का? ते काम नाहीच. मी ती अजूनही चालवते. कारण त्यामुळे मला मुलांचा सहवास मिळतो. मला ते काम वाटत नाही. मी ते प्रेमाने करते. मग माझे लेसकाम.” जसे काही तिचे आनंदी बोलणे ऐकण्यासाठी, तिचे व्यग्र हात प्रामाणिकपणे थांबले. पण मग ते परत सुरु झाले. “मी जेव्हा विचार करते, तेव्हा ते माझ्या विचारांबरोबर होत जाते. मी जेव्हा गुणगुणते, तेव्हा ते माझ्या सुरांबरोबर होत जाते. आणि मग ते काम उरत नाही. तुम्हाला देखील ते संगीतच वाटले, नाही का? तसेच मलाही वाटते.”

दिवे लावणारा मनुष्य झगमगीतपणे ओरडत म्हणाला, “सर, तिच्यासाठी सगळे संगीतच आहे.”

तिची नाजूक चाफेकळी त्यांच्याकडे दाखवत, फोबे म्हणाली, “ब्रासच्या बँडमध्ये जेवढे संगीत नसेल, तेवढे माझ्या वडिलांमध्ये आहे.”

“मी म्हणतो, लाडके, तुला हे माहिती आहे, की हे खरे नाही.. पण तू वडिलांना चढवत आहेस.” त्याने स्वतःचा बचाव केला.

“नाही. असे काही नाही. मी खात्री देते. मी तसे मुळीच करत नाही आहे. तुम्ही माझ्या वडिलांना गातांना ऐकलेत, तर तुम्हाला कळेल. पण तुम्ही कधीच त्यांना गाताना ऐकणार नाही. कारण ते मी सोडून, कुणासाठीच गात नाहीत. ते कितीही दमलेले असले, तरी ते घरी येतात, तेव्हा नेहमी माझ्यासाठी गातात. जेव्हा अनेक वर्षांपूर्वी मी इथे मोडकी बाहुली होऊन पडले होते, तेव्हा ते माझ्यासाठी गात. त्याशिवाय ते गाणी रचत. आमच्याआमच्यात छोटेमोठे विनोद चालत. आजच्या दिवसापर्यंत, ते हे करत आले आहेत. ओहो, मी तुम्हाला सांगते, बाबा, या सभ्य माणसाने तुमच्याबद्दल विचारले आहे. सर, ते कवी आहेत.”

क्षणभर स्तब्ध होत दिवे लावणारा मनुष्य म्हणाला, “माझी अशी इच्छा नाही, की माझ्या आवडत्या सभ्य गृहस्थाने तुझ्या वडिलांबद्दल असे मत बनवून घ्यावे, की जसे काही चांदण्यांना उदास पद्धतीने विचारावे, की तुम्ही तेथे का आहात. लाडके अशा गोष्टीसाठी मी माझा वेळ वाया दवडण्याचे स्वातंत्र्य घेणार नाही.”

तिचे बोलणे सुधारत फोबे बोलली, “माझे वडील नेहमी उजळ व चांगल्या बाजूला असतात. आता तुम्ही मला सांगितले, की मी नेहमी आनंदी असते. यासाठी ते मला नेहमी मदत करतात.”

वाद घालायच्या पावित्र्यात दिवे लावणारा मनुष्य म्हणाला, “लाडके, ते ठीक आहे. त्याने कशी मदत होईल? सर, हे तुमच्या जवळच ठेवा. तिच्याकडे बघा. आता बघत आहात तसेच नेहमी तिला नेहमी कामात असलेली बघाल --- सर, शेवटी आठवड्याला फक्त काही शिलिंग मिळणारी --- नेहमी समाधानी असणारी, चैतन्यमय, नेहमी सगळ्या प्रकारच्या दुसऱ्या लोकांमध्ये रुची घेणारी, अशी ती आहे. मी असे म्हणतो आहे. पण तुम्ही तिला आता बघत आहात, तशीच ती नेहमी असते. त्यामुळे तिला कसला काही फरक पडत नाही. जेव्हा रविवारी मला सुट्टी असते, आणि सकाळच्या घंटा वाजू लागतात, तेव्हा

मला भिडणाऱ्या आवाजात प्रार्थना व आभार मानलेले ऐकू येतात. माझ्यासाठी इतक्या मृदु आवाजात देवाची स्तोत्रे म्हटली जातात, की खोलीबाहेर ती ऐकूदेखील जात नाहीत --- ते सूर मला --- माझी खात्री आहे --- स्वर्गातून येतात आणि परत तिथेच जातात.

असेही असेल की या शब्दांचे साहचर्य या शांत, पवित्र वेळाशी असेल. किंवा या शब्दांचे मोठे साहचर्य अंथरुणाला खिळलेल्या मुलीशेजारील त्या दयाळू येशूचे असेल. पण इथे तिच्या कुशल बोटांनी लेस विणणे थांबवले आहे. ती बोटे वडिलांच्या गळ्याभोवती पडली आहेत. पाहुण्याला सहज दिसते आहे, की त्या वडील व मुलीमध्ये फारच नैसर्गिक जिव्हाळा आहे व तो फक्त दुसऱ्यासाठी आहे. तो दिखाऊ नसून लाजाळू आहे. पूर्णपणे आनंदी असा आहे. ती सहजप्रवृत्ती आहे किंवा मिळवलेली आहे. पण दोघांचाही तो सहज असलेला वा मिळवलेला स्वभाव आहे. काही क्षणात त्याचा विनोदी स्वभाव दाखवत, दिवे लावणारा मनुष्य दुसऱ्यांदा हात ओवाळत होता. तर फोबेचे हसरे डोळे [त्यांच्या पापण्यांवर फक्त एक चकचकीत बिंदू होता.] फिरून परत तिच्या वडिलांवर, तिच्या कामावर व बारबॉक्स ब्रदर्सवर खिळले.

“सर, जेव्हा माझे वडील तुम्हाला सांगत होते, की दुसऱ्या लोकांना जरी माझ्याबद्दल काही माहिती नसले, तरी मी दुसऱ्या लोकांमध्ये रुची घेणारी आहे, तेच मी तुम्हाला सांगितले. ते कसे आले, ते तुम्हाला माहिती पाहिजे. ते माझ्या वडिलांमुळे माझ्यात आले.”

वडीलांनी विरोध दर्शवत म्हटले, “नाही, मुळीच नाही.”

“सर, तुम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवू नका. ते मी म्हटले तसेच आहे. त्यांच्या कामात त्यांना जे जे दिसते, ते ते सर्व मला सांगतात. तुम्हाला नवल वाटेल, ते माझ्यासाठी रोज किती भरभरून आणतात. ते गाडीच्या डब्यांकडे बघतात व मला सांगतात की स्त्रिया कसा पेहराव करतात, जेणेकरून मला साऱ्या फॅशन्स माहिती व्हाव्यात. डब्यांकडे बघून ते मला सांगतात की त्याना कशा प्रेमिकांच्या जोड्या दिसतात. ते मला नवीन लग्न झालेल्या जोडप्याच्या हनिमूनबद्दलही सांगतात. जेणेकरून मला सर्व काही माहिती व्हावे. मला पुष्कळ वाचायला मिळावे, म्हणून ते खूप वर्तमानपत्रे व पुस्तके माझ्यासाठी गोळा करून आणतात. हवाबदलासाठी प्रवास करणाऱ्या आजारी लोकांबद्दलही ते मला सांगतात. जेणेकरून मला त्यांच्याबद्दलही माहिती व्हावे. थोडक्यात मी जेव्हा ते मला सर्व काही सांगतात, अशी सुरवात

करते, तेव्हा ते त्यांनी बघितलेले व कामाच्या ठिकाणी घडलेले सर्व काही मला सांगतात. तुम्हाला कल्पना येणार नाही, की ते कायकाय सांगतात व निष्कर्ष काढतात.

लॅम्पस म्हणाला, “लाडके, वर्तमानपत्र व पुस्तके गोळा करण्यासंबंधी हे स्पष्ट आहे, की मला त्यांचा दर्जा ठरवता येत नाही, कारण ते वाचण्याची माझी गरज नाही.

हे बघा सर, हे असे आहे. हा सुरक्षारक्षक आहे. तो मला म्हणेल, “दिवे लावणाऱ्या मनुष्या, कसे काय? मी हे वर्तमानपत्र तुझ्या मुलीसाठी वाचवले आहे. ती कशी आहे? मुख्य हमाल मला म्हणेल, “लॅम्पस, हे घे. बरीचशी वर्तमानपत्रे तुझ्या मुलीसाठी ठेवली आहेत. ती आता पूर्वीपेक्षा बरी आहे का? त्यामुळे तिचे दुप्पट स्वागत आहे. लग्न झालेल्या व न झालेल्या जोड्यांबद्दल बोलायचे. तर मी त्यांचे वर्णन जेवढे नैसर्गिकपणे घरी आणता येईल तेवढे आणतो. मी एवढे बघतो, की शेजारील पाजारील कुठल्याही प्रकारची जोडी आपण होऊन फोबेकडे येऊन तिला काही गुपिते सांगणार नाही.

तिने विजयाने तिचे डोळे उचलून बारबॉक्स ब्रदर्सकडे बघत म्हटले, “सर, खरेच, ते खरे आहे. जर मी उठून चर्चमध्ये जाऊ शकत असते, तर मला माहिती नाही, की मी किती वेळा

नववधूची नोकराणी झाले असते. पण जर मी ते केले असते, तर प्रेमात पडलेल्या काही मुली माझ्यावर जळल्या असत्या. आणि तसेही कुणीही मुलगी माझ्यावर जळणार नाही. आणि माझ्या उशीखाली केकचा अर्धा तुकडा ठेवायला सुद्धा तयार होणार नाही.'' सुस्कारा टाकत, तिचा चेहरा वळवत व वडिलांकडे बघून हसत, ती बोलली.

मोठ्या हुशार अशा छोट्या मुलीच्या आगमनामुळे बारबॉक्स ब्रदर्सला समजले की झोपड्यांमध्ये घरगुती वातावरण होते आणि ती काही कामासाठी आलेली होती. तिच्याकडे बादली होती व झाडू. झाडू तिच्या तिप्पट उंच होता व बादलीचे वजन तिला झेपत नव्हते. त्यामुळे तो जायला उठला. निघतांना तो म्हणाला की फोबेची काही हरकत नसेल, तर तो परत येईल.

'तो परत येईल.' हे तो निघतांना पुटपुटला. त्याच्या चालीवरून असे वाटत होते, की तो नक्की परत येणार. कारण तो एका दिवसानेच परत आला.

फोबेच्या हाताला स्पर्श करत व तिच्या कोचाजवळ बसत, तो बोलला, ''मला वाटते, तू मला परत कधीच बघणार नाहीस, असा विचार करत होतीस का?''

तिचे नवलपूर्ण उत्तर होते, ''मी असा विचार का करेन?''

“मी असे गृहीत धरले, की तू माझ्यावर विश्वास ठेवणार नाहीस.”

सर, तुम्ही गृहीत धरले? तुमच्यावर इतका अविश्वास दाखवला गेला आहे का?”

“मी हो म्हटले, तर खरे बोलल्यासारखे होईल. पण मी माझ्याकडून खरोखरच तुझा विश्वास मोडू शकलो असतो. पण त्याचे आता काय? मागील वेळी आपण जंक्शनबद्दल बोलत होतो. मी परवापासून तेथे अनेक तास काढले आहेत.”

तिने हसून विचारले, “आता तू कुठल्या ठिकाणचा सभ्य गृहस्थ आहेस?”

“कुठल्यातरी ठिकाणचा आहेच, पण कुठल्या, ते मला अजून माहिती नाही. तुला कधीच तर्क करत येणार नाही की मी केव्हापासून भटकतो आहे. माझ्या जन्मापासूनची हकीगत मी तुला सांगू का?”

तिच्या हातांनी काम थांबवले. तिने त्याच्याकडे अविश्वासपूर्ण आश्चर्याने पाहिले.

बारबॉक्स ब्रदर्स त्याच्या खुर्चीत चुळबुळ करत म्हणाला, “हो. माझ्या जन्मापासून. मी जन्मापासून माझा मीच आहे. ज्याची आधीची प्रकरणे फाडून फेकली गेली आहेत, असे न समजणारे

पुस्तक मी आहे. माझ्या बालपणाला बालपणाचा काही डौल नव्हता. माझ्या तारुण्याला तारुण्याचा काही डौल नव्हता. अशा हरवलेल्या सुरवातीकडून काय अपेक्षा करणार? त्याला खोलवर असे वाटले, की त्याचे व तिचे डोळे मिळाले. त्याच्या छातीत काहीतरी लकाकून कुजबुजले, "बालपणाच्या डौलाची व तारुण्याच्या लज्जतीची ही अत्यंत दयाळू जागा आहे का? ओहो, असा विचार करणे लाजिरवाणे आहे!"

स्वतःला सावरत व गिळायला त्रास होत असल्यासारखे दाखवत, बारबॉक्स ब्रदर्स बोलला, "हा माझा रोग आहे. हे चुकीचेही असेल. मला कळत नाही, मी हे कसे बोललो. मला आशा आहे की माझ्या कामजीवनातील जुन्या गमावलेल्या आत्मविश्वासामुळे किंवा जुन्या कडू फसगतीमुळे, की काय, मला माहिती नाही. मी पूर्णपणे चुकीचेही बोलत असेन."

तिच्या हातांनी शांतपणे, तिने हळूहळू तिचे काम सुरु केले. तिच्याकडे दृष्टीक्षेप टाकत, त्याने पाहिले की तिचे डोळे विचारपूर्वक तिचे काम बघत होते.

त्याने परत चालू केले, "मी माझ्या जन्मापासून प्रवास करतो आहे. कारण रोजचा दिवस माझ्यासाठी उदासवाणा दिवस असतो. माझा पहिला मनमोकळा वाढदिवस पाच की सहा

आठवड्यांनंतर येतो आहे. त्याच्या खाणाखुणा मागे टाकण्यासाठी किंवा तो दिवस चिरडून टाकण्यासाठी, त्या सगळ्या घटना माझ्या नजरेतून हद्दपार करण्यासाठी, त्यावर नवीन गोष्टी रचण्यासाठी, मी भटकतो आहे.”

जसा तो थांबला, तसे तिने त्याच्याकडे पाहिले. आणि त्याच्या दुःखासाठी तिने तिचे डोके हलवले.

जसे काही त्यात काही स्वसंरक्षणाचे गुण रेंगाळत असावेत, तसे त्याने पुन्हा चालू ठेवले. ”तुझ्या आनंदी स्वभावाला हे समजणार नाही. मला माहिती होते, हे होणार. आणि ते झाल्याचा मला आनंद आहे. तथापि माझ्या या प्रवासात, [जो मी स्थिर घराचा विचार सोडून, पुढे अखंड करणार आहे.] मी या जंक्शनवर थांबलो, जे तू तुझ्या वडिलांकडून ऐकले असशील. याचे दुष्परिणाम खूपच गोंधळात टाकणारे होते. इथून कुठे जावे, ते मला समजत नव्हते. माझ्यापुढे अनेक रस्ते असल्याने, मी अजून स्थिरस्थावर झालो नाही. मी काय करेन, असे तुला वाटते? तुला तुझ्या या खिडकीतून किती रस्ते फुटलेले दिसतात?”

तिने स्वारस्य घेऊन बाहेर पहात म्हटले, “सात”

थंडपणे हसत, तिच्याकडे बघत बारबॉक्स ब्रदर्स म्हणाला, “सात, ठीक आहे. मी लगेच माझ्या मनाशी ठरवतो, की हा सात

आकडा लगेच कमी करायचा. हळूहळू कमी करत तो एकवर न्यायचा --- हे माझ्यासाठी फार मोठे काम आहे.”

बाहेरील दृष्यावर तिची तेजस्वी, विस्फारित नजर टाकत ती म्हणाली, “पण हे फार मोठे काम असल्याचे तुम्हाला कसे कळले?”

अजून एक थंड हसू फेकत व त्याच्या बोलण्यात बरीच सुधारणा करुन सहजता आणत, बारबॉक्स ब्रदर्स म्हणाला, ”अशा तऱ्हेने खात्री करत, चांगल्या उद्देशाने तुझे वडील रोज कुठून एवढे सर्व गोळा करत होते, कुणास ठाऊक! मी परत एकदा वेगळ्या उद्देशाने थोडे काही गोळा करतो. जंक्शनवर ‘कुठे न जाणारा सभ्य गृहस्थ.’ अजून जास्त प्रसिद्ध व्हायला हवा. तो त्याने पाहिलेली, ऐकलेली व सापडलेली प्रत्येक गोष्ट रस्त्याच्या सुरवातीला एकत्र करेपर्यंत, त्याचा शोध चालू ठेवेल. त्यामुळे रस्त्यांची निवड त्याच्या शोधानुसार तो करेल.”

हाताने तिचे काम सुरु होते. तिने परत भविष्याकडे नजर लावली, जसे काही पूर्वी तिथे नसलेले काही त्यात दिसते आहे आणि ते बघून तिला एक प्रकारचा नवीन आनंद झाल्यासारखी ती हसली.

बारबॉक्स ब्रदर्स म्हणाला, “एक गोष्ट विचारायला मी विसरता कामा नये. [आतापर्यंत एवढे मिळवून] या मोहिमेत मला तुझे सहकार्य हवे आहे. मी सात रस्त्यांच्या सुरवातीला जे एकत्र करेन, त्याकडे तू इथे झोपून बघत रहा. आणि तुझ्याकडील माहितीशी त्यांची तुलना कर. करशील? असे म्हणतात एकापेक्षा दोन डोकी बरी. मी असे म्हटले पाहिजे, की ते त्यात कुठली डोकी आहेत, त्यावर अवलंबून आहे. पण माझी खात्री आहे की जरी आपली ओळख नवीन असली, तरी तू व तुझ्या वडिलांनी याहून बऱ्या गोष्टी शोधल्या आहेत. फोबे, माझ्यापेक्षा त्या नक्कीच चांगल्या आहेत.”

त्याच्या प्रस्तावामुळे खूप आनंद होत, तिने त्याला तिचा संवेदनायुक्त उजवा हात दिला व ऋणाईत होऊन त्याचे आभार मानले.

बारबॉक्स ब्रदर्स म्हणाला, “हे छान झाले. पुन्हा कौल मागायला मला विसरता कामा नये, [एवढे झाल्यावर] कृपया, तू तुझे डोळे बंद करशील का?

अशा विचित्र प्रकारच्या मागणीवर खेळकरपणे हसत, तिने तसे केले.

हळूच दाराकडे जात व परत येत, बारबॉक्स ब्रदर्स म्हणाला, “ते बंदच ठेव. तुझ्यातील प्रामाणिकपणाला स्मरून, मी तुला तसे सांगेपर्यंत ते बंदच ठेवशील का?”

“हो, नक्की.”

“छान. मी एका मिनिटासाठी तुझी लेसची उशी तुझ्याकडून घेऊ शकतो का?”

अजूनही आश्चर्यचकित झालेल्या व हसणाऱ्या तिने उशीवरून हात काढून घेतला व बाजूला ठेवला.

“मला सांग तुला सात नंबरच्या रस्त्यावर काल सकाळच्या जलद गाडीने सोडलेले धुराचे लोट व वाफ इथून दिसले का?”

“एल्म व सूचीपर्णी झाडांमागे?”

बारबॉक्स ब्रदर्स डोळ्याने त्याकडे निर्देश करत म्हणाला, “तोच रस्ता.”

“हो. मला ते वितळतांना दिसले होते.”

“त्यातून काही वेगळे सूचित होतांना दिसले होते का?”

“ती आनंदाने उत्तरली,

”नाही.”

“स्तुती म्हणून नाही. पण त्या गाडीत मी होतो. मी गेलो --- डोळे उघडू नको --- माझ्या मूळ मोठ्या गावापासून हे आणण्यासाठी! ते तुझ्या या लेसच्या उशीच्या अर्ध्याएवढेही मोठे नाही. ते अगदी सहज हलकेपणे तिथे बसेल. या लहानशा किल्ल्या छोट्या पियानोच्या किल्ल्यांसारख्या आहेत. तू त्यातून आनंदी संगीत वाजवू शकतेस. माझ्या आवडत्या मुली, आतापुरते तू डोळे उघडू शकतेस --- अच्छा!”

त्याच्या लाजऱ्या पद्धतीने त्याने त्याच्या मागे दार लावले आणि फक्त बघितले की असे करतांना, तिने भावनातिरेकाने ते बक्षीस छातीशी धरून कुरवाळले. हे बघून त्याचे हृदय तृप्त झाले. पण तरीही त्याला थोडे वाईटदेखील वाटले. कारण नैसर्गिकपणे तिचे तारुण्य उमलून, [तिचे लग्न झाले असते] तर तिने त्या दिवशी तिच्या स्वतःच्या बाळाचा झोपेतला आवाज ऐकला असता.

## प्रकरण ४

चांगली इच्छा व चांगल्या उद्देशासकट कुठल्याच नसलेला सभ्य मनुष्याने, दुसऱ्याच दिवशी सात रस्त्यांच्या सुरवातीच्या भागात संशोधन सुरु केले. त्याचे निष्कर्ष फोबेने नंतर

व्यवस्थितपणे लिहून काढले. सत्य सांगणाऱ्या पुस्तकात त्यांच्या योग्य जागी ते ठेवले. पण या कामात तिचा फार वेळ मोडला. पण [खूप फायदेशीर प्रकारच्या पुस्तकांचे पुढच्या पिढीच्या लोकांसाठी] जे उच्च विद्वान ते वाचायचे कष्ट घेतात, त्या सगळ्या वाचनीय मजकुराचे असेच होते. ‘रिकाम्या वेळात, काही सेकंदात ते भिरकावले जाते.’

तरीही हे कबूल केले पाहिजे, की बारबॉक्स ब्रदर्सने कुठल्याही प्रकारे घाई केली नाही. त्याने संशोधनात जीव ओतून काम केले. त्यात आनंदही होता. [त्याच्या दृष्टीने, तो खरा आनंद होता.] कधीकधी फोबेच्या शेजारी बसून तिचे त्या वाद्यातील अधिकाधिक प्राविण्य मिळवत जाणे बघणे, तिच्या अंगभूत व नैसर्गिक रुचीचा विकास झालेला पहाणे, त्याच्यासाठी चांगले होते. आनंदाशिवाय हा एक व्यवसायही होता. काही आठवड्यात, ते वाद्य तिचा खूप वेळ घेऊ लागले. याचा परिणाम असा झाला, की त्याने त्याच्या वाढदिवसाची भीती बाळगण्याआधीच तो त्याच्यावर मजेने येऊन आदळला.

परिषदेने ठरवलेल्या अनपेक्षित परिस्थितीमुळे हे सर्व जास्त ठळकपणे झाले. [मदत करण्याच्या काही प्रसंगी, मिस्टर दिवे लावणारा मनुष्य फारच चमकत होता.] शेवटी निवड करायच्या

रस्त्यांना मान देत, ते कुठल्याही प्रकारे संशोधनाची मदत घेत नव्हते. कारण त्यानी ही रुची या रस्त्यावर एकवटली होती व दुसरी रुची दुसऱ्या, पण यावरून कुठल्या एका रस्त्याची निवड करायचे काही कारण दिसत नव्हते. तसेच जेव्हा शेवटची परिषद भरवली गेली, तेव्हा व्यापाराचा तो भाग सर्वात शेवटी पुढे आला.

फोबे म्हणाली, "पण सर, आपल्याकडे तर फक्त सहा रस्तेच आहेत. सातवा रस्ता मुका आहे का?"

त्याची हनुवटी खाजवत, बारबॉक्स ब्रदर्स म्हणाला, "फोबे, तुला माहिती आहे की तुझे बक्षिस आणण्यासाठी मी त्या रस्त्याने गेलो. ती तीच गोष्ट आहे."

तिने हो नाही करत विचारले, "सर, तुम्ही परत त्या रस्त्याने जाल का?"

"अजिबात नाही. तो हाय वे आहे."

मोहक हसत फोबे म्हणाली, "मला तुम्ही ते छानसे बक्षिस दिलेत, त्याच्या अत्यंतिक प्रेमाखातर, मला तुम्ही त्या रस्त्याने गेलेले आवडेल. माझ्यासाठी तो रस्ता, इतर रस्त्यांसारखा कधीच असणार नाही. तुम्ही इतकी चांगली गोष्ट तिथे केलीत, त्यासाठी तुम्ही तो घेतलेला मला आवडेल. तुम्ही मला ते बक्षिस देऊन, फार आनंदी केले. तुम्ही हा थोर दयाळूपणा दाखवून मला त्या

रस्त्यावर सोडलेत, तर मला असे वाटेल की माझ्या या खिडकीशी मी बाहेर बघत बसतांना, तुमची भरभराट होईल आणि एक ना एक दिवस तुम्ही माझ्याकडे परत याल.

"माझ्या प्रिय फोबे, मी तसे करेन. नक्कीच करेन."

तर मग सरते शेवटी कुठे न जाणाऱ्या सभ्य गृहस्थाने कुठले तरी तिकीट काढले. तो जाणार असलेले गाव त्याचे मूळ गाव होते.

तो इतका वेळ जंक्शनवर रेंगाळत होता, की तो तेथून निघाला, तेव्हा डिसेंबरची अठरा तारीख उजाडली होती. गाडीत बसल्यावर त्याने विचार केला, 'खूपच उशीर झाला. त्याने गंभीरपणे प्रवास सुरु केला. मी 'माझ्यात व मी' यापासून पळून चाललो आहे. उद्या मी डोंगरावर जाण्यासाठी निघेन. मी वेल्सला जाईन.'

धुके पसरलेल्या डोंगरांवरून जाताना, खळाळते झरे पाहतांना, पाऊस, थंडी, विस्तिर्ण समुद्रकिनारा व खडकाळ रस्ता अनुभवतांना, त्याच्या भावनांना थोड्या कळांसकट नाकारता येणार नाही, असा फायदा झाला. तरी त्याची इच्छा होती, तितक्या असोशीने तो ते अनुभवू शकला नाही. तिच्या नवीन

सांगितीक बक्षिसासकट त्या गरीब मुलीने तिला पहिल्यांदा येत असे, तसा एकाकीपणाचा अनुभव घेतला.

तिने ते धुराचे ढग व वाफ पाहण्यापूर्वी तो गाडीत तिचा विचार करत बसला होता. तिच्या खिडकीतील लांबचे दृष्य नाहीसे झाल्यावर, तिचा चेहऱ्यावर दुःखाची सावली पसरली असेल का? त्याने तिचे खूप भले केले आहे हे सांगतांना, तिने अजाणतेपणे त्याचे जुने, भावनिक आयुष्यातील स्थिर होण्यासंबंधीचे असमाधान त्याला असा विचार करायला लावून दूर केले असेल का, की मनुष्याचे दुःख भरून निघू शकते. वेल्सची दृष्ये बघतांना त्याच्या मनामध्ये असे विचार चालू होते. त्याच्या आत पण जिवलगापासून दूर झाल्याची, रितेपणाची उदास भावना भरून राहिली होती. एक आल्हाददायक पाठलाग संपल्याची, त्याच्यासाठी नवीन असलेली भावना त्याला अस्वस्थ करत होती. शिवाय मुगबाय जंक्शन सोडल्याची व अलीकडेच वेळ घालवण्यासाठी छान सहवास मिळवल्याबद्दल त्याला स्वतःविषयी अधिक प्रेम वाटत होते.

त्याचे ते सुंदर मूळ गाव आता फार लांब राहिले नव्हते. गाडीचा धडघड आवाज व त्यावर आदळणारे इतर प्रतिध्वनी स्टेशन जवळ आल्याचे सांगत होते, हे काही कमी नव्हते.

गावातील दिव्यांची झगमगती किरणे, लाल विटांची घरे, लाल विटांची उंच धुराडी, रेल्वेच्या लाल विटांच्या कमानी, लपलपत्या ज्वाळा, धुराचे ढग, कालव्याची दरी आणि कोळशाचे ढिगारे, या सर्वांवर, प्रवासाच्या शेवटी झालेला गडगडाट!

त्याने निवडलेल्या हॉटेलमध्ये, त्याच्या मोठ्या बॅगा व्यवस्थित ठेवलेल्या बघून आणि जेवणाची वेळ निश्चित करून, बारबॉक्स ब्रदर्स गर्दीच्या रस्त्याने फिरण्यासाठी बाहेर पडला. त्याला असा संशय येऊ लागला, की मुगबाय जंक्शन हे अनेक दिसणाऱ्या व न दिसणाऱ्या गाड्या तिथून जाणारे जंक्शन होते आणि त्याने त्यालाही अगणित मार्ग खुले केले आहेत. काही वेळापूर्वी तो त्या रस्त्यांवर आंधळेपणाने विचार करत फिरला आहे. आता बाहेरच्या जगासाठी त्याच्याकडे, डोळे आणि विचार आहेत. कसे श्रमिक लोक जगले, त्यांनी प्रेम केले व मेले, कसे त्यांना डोळयांचे व हातांचे प्रशिक्षण दिले गेले, नजरेतील व स्पर्शातील फरक यामुळे ते वेगवेगळ्या कामगारवर्गांमध्ये विभागले गेले व त्यांच्या बुद्धी व शक्तीनुसार, त्यांची अजून विभागणी झाली. सामान्य आयुष्यात वापरले जाणारे काही दागिने ते किती सुबकपणे बनवू शकतात, याबरोबर समाजोपयोगी कौशल्ये, जोडकामातील कसब, इत्यादी गोष्टी पण बघितल्या गेल्या. [श्रेष्ठत्वाचा भाव आणून ढोंग करणाऱ्या माणसांमध्ये

असलेला स्वाभिमान, ते आहेत त्यापेक्षा अधिक शहाणे असण्याचे नम्रपणे दाखविण्याची इच्छा, त्यांच्या स्वभावातील सुस्थिरता, प्रश्न संपल्यावर बोलण्याची पद्धत, प्रसिद्ध अभ्यासावरील त्यांचे ताशेरे आणि सार्वजनिक भिंतींवर लिहिलेल्या मजकुरातून होणारे त्यांचे मनोरंजन] हे सगळे लक्षात घेऊन, त्याने त्याचे चालणे संस्मरणीय बनवले. त्याने विचार केला, "मी सुद्धा एका पूर्णत्वाचा लहानसा भाग आहे. स्वतःची व इतरांची सेवा करण्यायोग्य होण्यासाठी, किंवा आनंदी होण्यासाठी, मला माझी रुची सामान्य वर्तुळाबाहेर वाढवली पाहिजे."

त्या दिवशी दुपारपर्यंत तो त्याच्या प्रवासाच्या शेवटाकडे येऊन ठेपला असला तरी, तो आतापर्यंत इतका वेळ काही न जाणवता गावातून फिरला होता. दिवेलागणी झाली होती. दुकाने प्रकाशाचा लखलखाट करू लागली होती. त्याला रहायच्या ठिकाणी परतण्याची आठवण झाली. तो तसे करू लागला असतांना, एक छोटा हात त्याच्याकडे आला व लहानशा आवाजात बोलला,

"मी हरवले आहे, मला मदत करा."

त्याने खाली पाहिल्यावर त्याला सुंदर केसांची एक मुलगी दिसली.

तिने गंभीरपणे परत तेच शब्द उच्चारत म्हटले, “मी खरेच हरवले आहे.”

बराच गोंधळून, तो थांबला. आजूबाजूला कोणी तिला मदत करणारे दिसते आहे का, ते पाहिले. कोणी नव्हते. मग तो खाली वाकून म्हणाला,

“बाळा, तू कुठे रहातेस?”

ती म्हणाली, “मी कुठे रहाते, मला माहिती नाही. मी हरवले आहे.”

“तुझे नाव काय?”

“पॉली.”

“तुझे दुसरे नाव काय?”

उत्तर लगेच आले व ते कळण्यासारखे नव्हते.

त्याला जसे कळले, तसे उच्चारत, त्याने म्हटले, “ट्रिव्हिटस”

मुलगी मान हलवत म्हणाली, “नाही. तसे काही नाही.”

“छोटारडे, ते पुन्हा सांग.”

यावेळेस तो आवाज वेगळाच होता. गोंधळच होता. त्याने तो उच्चारायचे साहस केले. "पॅडेन्स?"

ती छोटी मुलगी म्हणाली, "नाही. तसे काही नाही."

"अग चिमुरडे, परत एकदा सांग."

सगळा बेकार प्रकार! यावेळेस तिच्या तोंडून चार अक्षरे उमटली. "हे टॅपिटॅवर नसावे?" वैतागून, त्याचे डोके टोपीने खाजवत बारबॉक्स ब्रदर्स म्हणाला.

मुलगी शांतपणे बोलली, "नाही, ते तसे नाही."

अजून एकदा ते दुर्दैवी नाव बरोबर उच्चारायचा कसून प्रयत्न करतांना तिच्या तोंडून आठ अक्षरे बाहेर पडली.

निराश होत्साता बारबॉक्स ब्रदर्स म्हणाला, "आपण हे इथेच सोडून दिलेले बरे."

अजून जवळीकेने त्याच्या हातात हात गुंफत, ती छोटारडी म्हणाली, "पण मी हरवले आहे. आणि तू माझी काळजी घेशील. नाही का?"

जर एका बाजूला माणसाला दया वाटत असेल आणि दुसरीकडे मूर्ख अनिश्चिती वाटत असेल, तर तो मनुष्य म्हणजे बारबॉक्स ब्रदर्स होता. 'हरवले आहे' त्या मुलीकडे बघत, हे शब्द त्याने परत उच्चारले. आशा पल्लवित होत, मुलीने वर

त्याच्याकडे बघत विचारले, “माझी खात्री आहे. मी नक्की हरवले आहे. काय करायचे? तू कुठे रहातोस?”

साधारण त्याच्या हॉटेलच्च्या दिशेने निर्देश करत, तो उत्तरला, “तिथे.”

मुलगी म्हणाली, ‘आपण तिथे गेलेले बरे, नाही का?”

तो म्हणाला,” खरेच, मला माहिती नाही. पण दुसरे काय करणार?”

तर मग त्याच्या छोट्या विचित्र मैत्रिणीबरोबर, तो एक मूर्ख राक्षस असल्यासारखे वाटत, ते हातात हात घालून निघाले. तिच्या छोट्याशा मताने, तिने त्याला त्याच्या लज्जित कोषातून नीट बाहेर काढले.

पॉली म्हणाली, “मला वाटते, आपण तिथे पोचलो, की जेवण घेऊ?

“तो आनंदाने बोलला, “ठीक आहे. आपण जेवण घेऊ.”

मुलीने विचारले, “तुला तुझे जेवण आवडते का?

बारबॉक्स ब्रदर्स म्हणाला, “हो. का? पूर्णपणे आवडते.”

पॉली म्हणाली, “मलाही माझे आवडते. तुला कोणी बहीण भाऊ आहेत?”

“नाही. तुला आहेत का?”

“माझे वारले.”

त्यामुळे त्याचे मन व शरीर जड होऊन, बारबॉक्स ब्रदर्स म्हणाला, “ओहो!” या उद्धटासारख्या तोकड्या शब्दानंतर संभाषण पुढे कसे चालू ठेवावे, ते त्याला कळेना. पण पॉली संभाषण चालू ठेवण्यास उत्सुक होती.

त्याच्या हातातून हळूवारपणे तिचा हात फिरवत, तिने विचारले, “जेवणानंतर तू माझे मनोरंजन करणार आहेस काय?

बारबॉक्स ब्रदर्स निराश होत म्हणाला, “मला जराही कल्पना नाही. पण पॉली, पण मी ते नक्की करेन.”

पॉली म्हणाली, “मी तुला काय ते सांगते. तुझ्या घरी पत्ते आहेत?”

फुकट बढाई मारत बारबॉक्स ब्रदर्स बोलला, “पुष्कळ आहेत.”

“छान. मग मी घरे बांधेन. तू माझ्याकडे बघ. पण तू ती घरे फुंकरून पाडायची नाहीत.”

बारबॉक्स ब्रदर्स बोलला, “नाही. नाही. नाही. फुंकर नाही. फुंकर चांगली नाही.” त्या मूर्ख छोटारडीसाठी आपण काही भलत्याच छान छान गोष्टी बोलायचा वेडेपणा केला, असे त्याला

वाटू लागले. पण पॉलीला त्याची लाजिरवाणी अवस्था तात्काळ समजली. ती सहृदयतेने म्हणाली, “तू किती विनोदी मनुष्य आहेस!”

या उदासवाण्या पराभवानंतर प्रत्येक मिनिट मोठे व जड होऊ लागले व मन कमकुवत होऊ लागले. बारबॉक्स ब्रदर्सने एक वाईट काम सुरु केले. पॉलीच्या गुलामगिरीत तो अडकला. कुठलाही राक्षसदेखील एवढ्या शांत शरणार्थी भावाने विजयोन्मादासह सगळ्या जिंकलेल्या गुलामांना शरण गेला नसता.

तिने त्याला विचारले, “तुला एखादी गोष्ट सांगता येते का?”

आता तो लाजिरवाण्या कबुलीवर आला होता. “नाही.”

पॉली बोलली, “तू एक मूर्ख मनुष्य असला पाहिजेस, नाही का?”

“हो.” परत तो लाजिरवाण्या कबुलीवर आला होता.

“मी तुला एखादी गोष्ट शिकवू का? पण तू ती लक्षात ठेवली पाहिजेस व नंतर तुला ती कुणाला तरी सांगता आली पाहिजे.”

त्याला वाटले की त्याला त्यातून खूप मानसिक आनंद मिळेल व तो नम्रपणे ती मनात साठवून ठेवेल. तर पॉलीने त्याच्या हातातील तिच्या हाताला एक नवीन वळण दिले. त्यातून ती मजा

करायचे व अद्भुतरम्यतेत शिरायचे सुचवत होती ज्यात ‘म्हणून’ असे, आणि ‘त्यामुळे’ असे, ‘त्यामुळे तो मुलगा’, त्यामुळे ती परी’, ‘त्यामुळे तो केक चार यार्ड गोल होता व पावणे तीन यार्ड उंचीचा होता’ असे शब्दप्रयोग असतील. जास्त अधाशीपणा केल्यामुळे परी गोष्टीत शिरून, त्या मुलाला शिक्षा करते, अशी अद्भुतरम्यता आणून गोष्ट रुचीपूर्ण केली जाते. हा उद्देश साध्य होण्यासाठी, परी केक बनवते आणि मुलगा तो केक खातो. खातो. खातो. त्याचे गाल फुगतात. फुगतात. फुगतात. गोष्टीत खूप उपप्रसंग आहेत. पण जास्त मजा तो केक गट्टम करण्यात व मुलगा फुगत जाण्यात व त्याला तसे झालेले बघण्यात आहे. बारबॉक्स ब्रदर्सने गंभीर चेहऱ्याने गोष्ट कानात साठवून ठेवली. त्या उद्योगी शहरातील फुटपाथवर कोपराने ढुशा देत, गोष्टीतील एकही प्रसंग चुकू दिला नाही. नाहीतर त्याला आडवे तिडवे छेडले गेले असते व दोषी ठरवले गेले असते.

ते हॉटेलमध्ये आले. तिथे बारमध्ये त्याला संकोचून सांगावे लागले, “त्याला एक लहान मुलगी सापडली आहे.”

तेथील सर्वजण त्या लहान मुलीकडे पाहू लागले. कोणालाच ती माहिती नव्हती. तिचे नाव माहिती नव्हते. तिने ते

सांगितल्यावर, एका नोकराणी म्हणाली कॉन्स्टॅंटिनोपल --- पण ते बरोबर नव्हते.

बारबॉक्स ब्रदर्सने हॉटेलच्या अधिकाऱ्यांना सांगितले, "मी माझ्या छोट्या मैत्रिणीबरोबर खासगी खोलीत जेवेन. आणि तुम्ही कृपया पोलिसांना सांगायचे काम करा, की अशी अशी मुलगी इथे सापडली आहे. मला आशा आहे, की लवकरच तिची चौकशी होईल. पॉली, चल ये."

अगदी सहजतेने व शांतपणे पॉली आली. पण उभा जिना बघून, ती बावचळली, तेव्हा बारबॉक्स ब्रदर्सने तिला उचलून घेतले. जेवण फारच यशस्वी ठरले. आणि पॉलीच्या मार्गदर्शनाखाली, बारबॉक्सचे बकरीप्रेम तिला मासाचे तुकडे करून देण्यात व दाट रस ताटलीत सारखा पसरवण्यात, खर्ची पडले. हे दृष्य बघण्यासारखे होते.

पॉली म्हणाली, "आता जेवतांना तू भलेपणाने, मी तुला शिकवलेली गोष्ट मला सांग."

नकळत बारबॉक्स ब्रदर्सच्या अंगावर सिव्हील सर्व्हिस कमिशन परीक्षेसारखा काटा आला. खरोखर काही न ठरवता, गोष्टीतील कुठल्या प्रसंगी केक अवतीर्ण झाला, एवढेच नव्हे तर त्याची मापे काय होती, हे आठवत त्याने घाबरत सुरवात केली.

पण प्रोत्साहन मिळाल्याने त्याने ते चांगल्या प्रकारे निभावले. गोष्टीतील मुलाचे गाल लक्षात येण्याइतके वर आले होते, भूक वाढली होती. तिच्या आतील इच्छेच्या जोराने, परी थोडी घाबरली होती. चांगल्या स्वभावाच्या राक्षसाने जड पाऊले टाकत मेळावा पार केला.

पॉली म्हणाली, “मी तुला चांगले व्हायला सांगितले होते आणि तू चांगला झाला आहेस, नाही का?”

बारबॉक्स ब्रदर्स उत्तरला, “मला अशी आशा आहे.”

त्याचा नम्रपणा इतका होता, की पॉलीने त्याच्या उजव्या हाताला असलेल्या तिच्या खुर्चीवर चढून, त्याच्या चेहऱ्यावर तेलकट बाऊलमधील चमच्यासकट दोनदा थोपटून उत्तेजन दिले आणि एक डौलदार पापाही दिला. पण खुर्चीवर चढण्याच्या प्रयत्नात, ती पुढे झुकल्यामुळे बशांवर पडली. त्यामुळे बारबॉक्स ब्रदर्स ओरडला, “अग डौलदार परी, सांभाळ! पॉली, मला वाटते, आता आपण शेकोटीत पडणार आणि आपली काही खैर नाही.”

पॉली म्हणाली, “तू किती घाबरट आहेस, नाही का?”

तो उत्तरला, “हो. मी थोडा खजील झालो आहे. अरे बापरे, पॉली, तुझा चमचा झळकवू नकोस किंवा मग एका कडेला जा. तू हसतेस तेव्हा तुझे पाय वर उडवू नकोस. नाहीतर तू मागे पडशील.

अग, पॉली, पॉली, पॉली.” त्याच्या प्रयत्नात अयशस्वी झाल्याने, बारबॉक्स ब्रदर्स दुःखी झाला. “आपण धोक्यात आहोत.”

ज्या तऱ्हेने पॉलीने पडण्याचा सपाटा लावला होता, त्यामुळे त्याला खरेच भविष्यातील परिस्थिती सुरक्षित दिसत नव्हती. जेवणानंतर त्याने तिला एका बुटक्या स्टुलावर बसायला सांगितले. तो बोलली, “तू बसलास, तर मी बसेन.” त्यामुळे सर्वत्र शांतता पसरावी म्हणून त्याने वेटरला टेबल बाजूला करून पत्त्याचा गठ्ठा व काही छोटी स्टूले व लिहायला कागद आणायला सांगितला. त्याने त्याला व पॉलीला खोलीतील आरामशीर उबदार खोलीत शेकोटीसमोर स्थानापन्न केले.

बारबॉक्स ब्रदर्स वाईनचा लहान पेला घेऊन छोट्या स्टुलावर पॉलीकडे विचारपूर्वक बघत बसला. तिने तिचा श्वास रोधून, चेहरा निळा होईपर्यंत पत्त्यांचे घर यशस्वीपणे बांधले. नाहीतर त्याने कदाचित ते पाडले असते.

घर बांधून व पाडून झाल्यावर थांबत पॉलीने विचारले, “एवढे काय बघतो आहेस? नम्रपणे तिच्यावर सत्ता गाजवत, त्याला कबूल करायला लाज वाटत, क्षमा मागत, तो बोलला, “पॉली, मला भीती वाटते, मी तुझ्याकडे जरा रोखून बघत होतो.”

पॉलीने विचारले, “तू रोखून का बघत होतास?”

तो स्वतःशी पुटपुटला, “मी सांगू शकत नाही. पॉली, तू आठव. मला माहिती नाही.”

“म्हणजे आपण गोष्टी करायच्या आणि का केल्या ते मात्र स्वतःला माहिती नाही, असे का?”

तिने तिच्या पत्त्यांच्या घरावर डोके वळवले, तेव्हा तिचे कुरळे केस कपाळावर पसरले. त्याने तिच्याकडे परत रोखून बघितले. तो मनाशी बोलला, “अशी सुंदर मुलगी मी यापूर्वी कधीच पाहिली नव्हती. मी कधी स्वप्नात तरी तिची कल्पना केली होती का? एखाद्या दुःखी स्वप्नात?”

त्यातून तो काहीच निष्कर्ष काढू शकला नाही. त्यामुळे तो तिच्याबरोबर तीन, चार किंवा पाच मजली घरे बांधू लागला. चहानंतर तिचे डोळे चोळत, ती म्हणाली, “आता कोण येत असेल?”

त्याने अंदाज केला, “वेटर?”

पॉली म्हणाली, “नाही. झाडणारा. मला झोप येते आहे.” बारबॉक्स ब्रदर्ससाठी नवीन आव्हान!

पॉली म्हणाली, “मला नाही वाटत की आज रात्री मला माझे पालक सापडतील.

तुला काय वाटते?”

त्यालाही वाटत नव्हते. पंधरा मिनिटांनी खरोखरच झाडणारी आली. कॉनस्टॅंटिनोपल ---असे म्हणणारी ती नोकराणी होती. ती म्हणाली की त्या मुलीला आरामात झोपता आले पाहिजे त्यामुळे ती तिच्या खोलीत तिच्याबरोबर मुलीला झोपवेल.

एक नवीन भीती त्याच्या मनात आल्यामुळे बारबॉक्स ब्रदर्स म्हणाला, “तू ती अंथरुणावरून पडणार नाही, याकडे व्यवस्थित लक्ष देशील.”

हा सर्व प्रकार पॉलीला इतका मनोरंजक वाटला, की तो त्याच्या स्टुलावर बसून पत्ते उचलत असतांना, तिच्या दोन्ही हातांनी त्याच्या मानेला वेढा घालून, तिची खळी पडणारी हनुवटी त्याच्या खांद्यात रुतवत त्याला मागे पुढे झुलवले.

ती म्हणाली, ”ओहो, तू किती घाबरट आहेस! तू अंथरुणातून पडतोस का?”

“न --- नाही. सहसा नाही.”

असे बोलून पॉलीने त्याला तो जाऊ नये म्हणून, दोन तीन वेळा मिठी मारली. मग तिने तिचा गुपित सांगणारा छोटासा हात कॉनस्टॅंटिनोपल म्हणणाऱ्या नोकराणीच्या हातात देत, तिच्याबरोबर सहज गप्पा मारत, तरातरा छोटी पाऊले टाकत, काळजीचा मागमूस न ठेवता, तिला पार खोलीबाहेर काढले.

त्याने तिच्याकडे पाहिले. पडदा बाजूला केला. टेबल व खुर्च्यांची जागा बदलली आणि अजूनही तिच्याकडे बघत राहिला. अर्धा तास त्याने खोलीत फेऱ्या मारल्या. तो बोलला, “फार गुंगवून टाकणारा छोटा प्राणी! नाही, पण तसेही नाही. टोकाचे जिंकणारा छोटासा आवाज! पण तेवढेही नाही. म्हणजे तेवढे तर आहेच पण अजून काहीतरी जास्त आहे. मला ही मुलगी ओळखीची का वाटते आहे? जेव्हा तिने मला रस्त्यात स्पर्श केला, तेव्हा अजाणतेपणे मला कसे काय ओळखले? मी तिच्याकडे खाली पाहिले, तेव्हाच तिने वर कसे काय पाहिले?”

“मिस्टर जॅक्सन!”

दचकून त्याने त्या दबलेल्या आवाजाच्या दिशेने पाहिले आणि उत्तरादाखल तिला दारात उभे असलेले पाहिले.

“ओहो मिस्टर जॅक्सन, माझ्याशी कडकपणे वागू नका. माझ्याशी उत्तेजनपर एखादा शब्द बोला. मी तुम्हाला विनंती करते.”

"तुम्ही पॉलीची आई आहात?”

“हो. पॉली स्वतःच एक दिवस तुम्हाला हे सांगेल. तुम्ही बघता आहात, की ती म्हणजे सुकलेल्या पानातील गुलाब आहे. जंगलातील हिवाळी फांद्यांवरची ती उन्हाळी फूट आहे, तेव्हा एक

दिवस या काळजीग्रस्त, दुःखी बाईकडून तिचे केस पिकल्यावर, पॉलीचा पाठलाग केला जाईल. त्याच्यासमोर एके काळी धडधडून पेटणाऱ्या आगीची विझलेली राख उभी होती. त्याने प्रेम केलेली ती बाई होती. याच बाईला त्याने गमावले होते. तर अशी त्याच्या कल्पनेची सत्यता होती. काळाने त्याचा क्रूर हात फिरवून, तिला असे बनवले होते. त्याचे हृदय नवलाईने व दयेने भरून गेले.

त्याने तिला खुर्चीवर बसवले. तो धुराड्याच्या कोपऱ्यात हातावर डोके ठेऊन त्याचा चेहरा अर्धवट झाकून उभा राहिला.

त्याने विचारले, "तू मला रस्त्यात बघून, मुलीला माझ्याकडे धाडलेस का?"

"हो."

"म्हणजे त्या छोटारडीने मला फसवले?"

'मला अशी आशा आहे, की यात फसवणूक नाही. मी तिला म्हटले, आपला मार्ग चुकला आहे आणि मला माझा वेगळा मार्ग शोधला पाहिजे. त्या सभ्य गृहस्थाकडे जा आणि त्याला सांग की तू चुकली आहेस. तुला लगेच आसरा दिला जाईल."

"कदाचित तू हा विचार केला नाहीस, की ती किती लहान आहे?

“ती फार निर्धाराची आहे.

“बहुधा ती फार लहान असल्याने असेल.”

थोडा वेळ थांबून त्याने विचारले, “तू हे का केलेस?”

“ओहो, मिस्टर जॅक्सन, हे तुम्ही मला विचारता? मला वाटले की माझ्या निरागस मुलीकडे बघून तरी, तुम्हाला माझ्याबद्दल सहानुभूती वाटेल. फक्त माझ्याबद्दल नव्हे तर माझ्या नवऱ्याबद्दलही.”

तो गरकन वळला आणि खोलीच्या दुसऱ्या टोकाकडे गेला. धीमी पाऊले टाकत तो परत आला आणि त्याचा आधीचा दृष्टीकोन घेत बोलला,

“मला वाटले, तू अमेरिकेला निघून गेलीस?”

“आम्ही गेलो. पण आमचे तेथील आयुष्य सुखकर झाले नाही. आणि आम्ही परत आलो.”

“तू या शहरात रहातेस का?”

“हो. मी इथे संगीत शिक्षिका आहे. माझ्या नवऱ्याचे पुस्तकाचे दुकान आहे. तू मला क्षमा करशील का? आम्ही आमच्या गरजेपुरते मिळवतो. ते आमचे दुःख नाही. माझा नवरा अनेक दिवस खूप आजारी आहे. तो कधीच बरा होणार नाही ---

“तू काय ते ठरव. जर तुला माझ्याकडून दोन धीराचे शब्द हवे असतील, तर ते मी देईन. माझ्या पूर्वाश्रमीच्या प्रिये, मी ते जुने दिवस विसरलेलो नाही.”

तिला एकदम रडू फुटले. “देव तुझे भले करो.” असे म्हणत तिने तिचा थरथरणारा हात पुढे केला.

“शांत हो. तू शांत झाल्याशिवाय, मी शांत होऊ शकत नाही. तुला रडतांना बघून मला सांगता येणार नाही, इतके दुःख होत आहे. माझ्यावर विश्वास ठेऊन मोकळेपणे बोल.”

तिने तिच्या पदराने डोळे पुसले आणि जरा वेळाने ती शांतपणे बोलू लागली. तिच्या आवाजाला पॉलीचा स्वर होता.

“माझ्या नवऱ्याच्या शारीरिक दुखण्याने त्याचे मन मुळीच दुर्बळ झालेले नाही, याबद्दल मी तुला खात्री देते. पण त्याचे दुखणे व ते कधीही बरे होणार नाही, याबद्दलची त्याची जाण, यामुळे तो एका कल्पनेवर मात करू शकत नाही. ती त्याच्यावर सतत स्वार झालेली असते. ती त्याच्या यातनामय आयुष्याचे लचके तोडून, ते कमी करत असते.”

ती थांबलेली बघून तो म्हणाला, “माझ्यावर विश्वास ठेव. मोकळेपणे बोल.”

“या मुलीपूर्वी आम्हाला पाच मुले झाली आणि ती सगळी स्मशानात पुरली गेली. त्याची अशी श्रद्धा होती की त्याना शाप होता आणि या मुलीला देखील तो शाप उचलून नेणार.”

“कसला शाप?”

त्याला आणि मला, दोघांनाही सद्सदविवेकबुद्धीला स्मरून असे वाटत होते, की आम्ही तुला फार छळले. मी त्याच्याइतकी आजारी असते, तर मलाही मनात तसेच वाटून माझा छळ झाला असता. हे कायमचे ओझे आहे. माझा विश्वास आहे, की मी मिस्टर जॅक्सनपेक्षा, म्हणजे तुझ्यापेक्षा खूप लहान असले, तरी त्याला आनंदित करणारी एकमेव मैत्रिण होते. त्याला व्यापारात जास्त फायदा झाला, की तो माझ्याकडे जास्त ओढला जायचा. त्याच्या खासगी विश्वासास पात्र असलेली अशी मी एकमेव होते. आणि मी तुला त्याच्यापासून व माझ्यापासून तोडले. आणि तू बेसावध असतांना, दोघेही गुप्त झालो. त्याच्यावर एकदम या आजाराचा हल्ला झाल्यावर, तो माणूस, भयानक झाला. त्याची झोप उडवणारा हा रोग बरा होऊ शकत नव्हता. त्यामुळे आमच्या छोट्या फुलांवर शाप येऊन आदळला.”

ती बोलायची थांबली. तेव्हा त्याने विचारले, "तू त्याला आनंदित करत होतीस, हे कशावरून? हे तू कसे काय म्हणू शकतेस?"

अलीकडील काही आठवड्यात मला तुझी भीती वाटू लागली. माझा विश्वास होता, की तू मला कधीही माफ करणार नाहीस."

"अलीकडील काही आठवड्यात" त्याने परत म्हटले. "या काही आठवड्यात तू तुझे माझ्याबद्दलचे मत बदललेस का?"

"हो."

"कुठल्या कारणाने?"

"मी या गावात काही संगीताच्या सुरावटी खरेदी करत असतांना, तू आत आलास आणि मी जाम घाबरले. मी माझा चेहरा लपवला व दुकानाच्या काळोख्या कोपऱ्यात उभी राहिले. मी तुला स्पष्ट करतांना ऐकले की तुला अंथरुणाला खिळलेल्या मुलीसाठी वाद्य हवे आहे. तुझा आवाज व हावभाव इतके मृदु झाले होते आणि तू ते वाद्य निवडण्यात खूप रस दाखवलास. तू ते वाद्य घेऊन जातांना इतक्या आनंदाने, कोवळेपणाने व काळजीने नेलेस, की तू फार मोठ्या मनाचा माणूस असल्याची माझी खात्री

झाली. ओहो, मिस्टर जॅक्सन, जर इतकी आपुलकी तू माझ्याबद्दल दाखवली असतीस तर!"

फोबे ते वाद्य त्या क्षणी लांबवर असलेल्या तिच्या कोचात बसून वाजवत असेल का? त्याला तो आवाज ऐकू येऊ लागला.

मी दुकानात विचारले, की तू कुठे रहातोस, पण ते मला समजले नाही. तुझ्या बोलण्यावरून मला समजले, की तू पुढच्या गाडीने परत चालला आहेस. [पण कुठे ते तू काही बोलला नाहीस.] मी त्या दिवशी गाडीच्या वेळेस स्टेशनवर यायचे ठरवले. माझ्या शाळेच्या वेळेमधून कसे तरी जमवून मी तुला बघायची संधी घेतली. मी तिथे माझी शाळा सांभाळून नेहमी जाऊ लागले. पण आजच्या दिवसापर्यंत, काही मी तुला पाहिले नाही. तू रस्त्याने चालताना तंद्रीत चालत होतास. पण तुझ्या चेहऱ्यावरचे शांत भाव पाहून, मी माझ्या मुलीला तुझ्याकडे पाठवले. जेव्हा तुला खाली वाकून मुलीशी कोवळेपणे बोलतांना पाहिले, तेव्हा मी देवाजवळ प्रार्थना केली, की मी तुला दुःख दिले, त्याबद्दल तू मला क्षमा करशील. आता मी तुला, मला व माझ्या नवऱ्याला क्षमा करण्याची विनंती करते. मी व तो दोघेही खूप तरुण होतो. आयुष्यातील अशा अजाण साहसाच्या वेळी शिस्तीत चालणाऱ्या माणसांशी कसे वागावे, हे आम्हाला कळले नाही. तू

उदार मनुष्य! तू चांगला मनुष्य! त्यामुळे माझे उथ्थापन कर व मी तुझ्यावर केलेल्या अन्यायाचे काही करू नकोस --- मग त्याने तिला क्षमा मागायला लावली नाही. एखाद्या दयाळू धर्मगुरूने एखाद्या मुलीला करावे, तसे शांत केले.

“आभारी आहे. तुझे भले होवो. आभारी आहे.”

पुढे बोलण्यापूर्वी त्याने पडदा बाजूला करून, थोडा वेळ बाहेर पाहिले.

“पॉली झोपली का?

“हो. मी आले तेव्हा मी तिला वर जातांना पाहिले आणि मीच तिला झोपवले.”

“मला आनंदी करणाऱ्या तिला उद्या माझ्याजवळ ठेव आणि या छोट्या डायरीत तुझा पत्ता लिही. संध्याकाळी मी तिला तुझ्याकडे व तिच्या वडिलांकडे पोचवतो.”

दुसऱ्या दिवशी सकाळी नाश्ता तयार झाल्यावर, तिचा उन्हाने लाल झालेला चेहरा घेऊन पॉली ओरडली, “शुभ प्रभात! मला वाटले मला काल रात्री इथे आणले, नाही का?”

“तसेच झाले. पॉली, मी दिवसभर तुला इथे ठेवतो व संध्याकाळी तुला तुझ्या घरी सोडतो.”

पॉली म्हणाली, ‘तू म्हणशील तसे. तू फार शांत आहेस, नाही का?”

पण पॉलीला एक कल्पना सुचली. ती बोलली, “मला वाटते, तू शांत असलास तरी, मी तुला पापा दिला पाहिजे.”

पापा दिला व घेतला गेला. ते गप्पा मारत नाश्ता करू लागले. पॉली म्हणाली, “अर्थात तू माझे मनोरंजन करणार आहेस.”

बारबॉक्स ब्रदर्स बोलला, “अर्थात!”

तिच्या अपेक्षित आनंदाची पूर्ती झाल्याने, पॉलीला हे जरुरीचे वाटले, की तिचा टोस्टचा तुकडा दुसऱ्या पायावर आडव्या केलेल्या मासल गुडघ्यावर, ठेऊन जाडा उजवा हात खालून डाव्या हाताजवळ आणून, फटकारा मारल्यासारखे करावे. यानंतर स्वतःला सावरत, पॉलीने खूपशा खळ्या पाडत, लाडीकपणे विचारले,

“माझ्या आवडत्या मोठ्या माणसा, आता आपण काय करणार आहोत?

बारबॉक्स ब्रदर्स बोलला, “का? मी विचार करत होतो, पॉली, तुला घोडे आवडतात का?”

“छोटे घोडे मला आवडतात. विशेषतः त्यांची शेपटी लांब असेल तर --- पण फार लांब नाही, बर का!”

चमत्कारिक आत्मविश्वासाच्या थंड जोशात त्याला मिळालेल्या सल्ल्याला अनुसरून, बारबॉक्स ब्रदर्स बोलला, “ठीक आहे. पॉली, काल मी भिंतीवर दोन मोठी शेपटी असलेल्या व अंगावर ठिपके असलेल्या लहान घोड्यांची चित्रे पाहिली --- “

पॉली अतिशय आनंदाने ओरडली, “ नाही. नाही. नाही. अंगावर ठिपके असलेले नको.”

“गोल रिंगमधून उड्या मारणारे ठिपके असलेले छोटे घोडे --- “

परत पॉली तशीच किंचाळली, “नाही, नाही, नाही! ते कधीच गोल रिंगमधून उड्या मारत नाहीत.’

“हो. ते मारतात. मी तुला खात्रीने सांगतो, की ते तसे करतात व केक खातात.”

पॉली म्हणाली, “ते केक खातात! तू काही गोष्टी सांगतोस, नाही का?”

“देवाशपथ, खरे सांगतो आहे. ते बंदुकीतून गोळी उडवतात.”

[बंदुकीतून गोळी उडवण्याइतका जोर घोड्यांमध्ये असेल, असे पॉलीला वाटले नाही.]

चांगला बारबॉक्स पुढे बोलला, “मी विचार करत होतो, की तू आणि मी सर्कसला जाऊ. तिथे ते छोटे घोडे असतील. ते आपल्याला आंतरीक समाधान देतील.”

पॉलीने विचारले, “म्हणजे आपले मनोरंजन करतील? तू किती कठीण बोलतोस, नाही का?”

जास्त कठीण बोलल्याबद्दल माफी मागत, तो बोलला,

“हो. म्हणजे आपले मनोरंजन करतील. तोच त्याचा अर्थ आहे. तिथे घोड्यांशिवाय इतरही आश्चर्ये असतात. आपण ती सगळी बघू. चमचमणारे कपडे घातलेले स्त्रीपुरुष, हत्ती, वाघ, सिंह हे सगळे आपण बघू.”

नाक वाकडे करून, पॉली किटलीकडे पहात राहिली. जणू ती तिचे अस्थिर मन दाखवत होती.

एक सत्य असलेले वचन ती म्हणाली, “ते कधीच बाहेर पडत नाहीत?

“हत्ती, वाघ, सिंह? नाही लाडके, कधीच नाही.”

पॉली म्हणाली, “नाही लाडके, कधीच नाही? आणि अर्थात घोड्यांना कुणी घाबरत नाही.”

“जगात कुणी नाही.”

पॉली म्हणाली, “जगात कुणी नाही.”

व पुढे बोलला, “मी असाही विचार करत होतो, की बाहुली निवडण्यासाठी एखाद्या खेळण्यांच्या दुकानात जावे --- “

टाळ्या वाजवत, पॉली ओरडली, “कपडे घातलेली नाही! नाही. नाही. कपडे घातलेली नाही.

“पूर्ण कपडे घातलेली! घरासकट व घरातील गरजेच्या सामानासकट --- “

पॉलीने छोटीशी किंकाळी मारली. ती आनंदातिशयाने, चक्कर यायच्या बेतात होती.

तिची खुर्ची मागे करत, ती आळशीपणे उद्गारली, “तू मला किती आवडतोस! ये. आपण मिठी मारू. नाहीतर मला उठून तुला मिठी मारायला हवी.”

कायद्याची बूज राखून, हा आकर्षक कार्यक्रम अंमलात आणला गेला. बाहुलीची खरेदी महत्वाची होती --- त्यासाठी ती मुलगी लहान घोड्यांना गमावायला तयार झाली असती --- त्यामुळे खेळण्यांच्या दुकानाला प्राधान्यक्रम मिळाला. वीस बाहुल्या नापसंत करून, तिच्याएवढ्याच उंचीच्या सुंदर बाहुलीला, मिस मेल्युकाला घेऊन पॉली जादुभऱ्या खेळण्यांच्या

दुकानात निर्भेळ आनंद साजरा करत होती. गुलाबी रंगाची सॅटीनची पँट, काळी मखमली टोपी. निळा फ्रॉक असे बाहुलीचे कपडे होते. सर्कसमध्ये ठिपकेवाल्या घोड्याने बंदुकीचा नेम मारतांना कुणालाही पाडले नाही. रानटी पशूंच्या खेळात, सर्वत्र धूर पसरवला गेला होता. शेवटी मिस मेल्युकाच्या सर्व संसारासह पॉली घरी आली. पण तोपर्यंत ती इतकी झोपेला आली होती, की तिचे डोके खांद्यावर पडू लागले, तेव्हा बारबॉक्स तिला म्हणाला, “पॉली, झोप. काही झाले तरी, तू या अंथरुणावरून खाली पडणार नाहीस” पॉली तिच्या आश्चर्यकारक स्वर्गात झोपी गेली.

त्याने खिशातून एक चुरचुरीत कागद काढला. तो काळजीपूर्वक घडी करून पॉलीच्या फ्रॉकच्या छातीजवळ ठेवला. त्याबद्दल तो काहीच बोलला नाही. त्याबद्दल काही बोलायचे नव्हते. संध्याकाळी ते मोटारीने गावातील जुन्या घरांच्या भागात गेले आणि कोर्टासमोरील लहानशा घरात गेले. गाडीच्या चालकाला बारबॉक्स म्हणाला, “मुलीला जागे करू नकोस. मी तिला आहे तशीच आत नेईन.”

पॉलीच्या आईने दार उघडले. त्यातून उजेड पडला. तळमजल्यावरील खोलीत पॉलीला नेले. तिथे सोफ्यावर एक

आजारी मनुष्य त्याचा आजाराने बारीक झालेला हात डोळ्यांवर ठेऊन झोपला होता.

दयाळू आवाजात बारबॉक्स म्हणाला, ट्रेशम, मी तुझ्या झोपलेल्या पॉलीला परत तुझ्याकडे घेऊन आलो आहे. मला तुझा हात दे व तू ठीक असल्याचे सांग."

आजारी माणसाने त्याचा उजवा हात पुढे करून बारबॉक्सच्या हाताचे चुंबन घेतले व बारबॉक्ससमोर डोके वाकवले. "आभारी आहे. आभारी आहे. मी म्हणू शकतो, की मी ठीक आहे व आनंदी आहे."

बारबॉक्स म्हणाला, "हा शूरपणा झाला. ट्रेशम, मी असे विचारतो, पॉलीसाठी, तू तुझ्याशेजारी इथे जागा करशील का? पॉली सापडल्यावर तिला तुझ्याशिवाय कोणाकडे सुपूर्द करणार? तू माझ्याकडून तिला घेशील का?" वडीलांनी मुलीसाठी हात पसरल्यावर, दोन्ही माणसांनी स्थिर नजरेने एकमेकांकडे पाहिले.

एवढे बोलून त्याने खांद्यावरील तिचा पीचसारखा मऊ गाल कुरवाळला व तिला तिच्या वडिलांजवळ खाली ठेवले. तो सोफ्यावर बसला.

“ट्रेशम, माझ्याकडे एक कल्पना आहे. [मी आता म्हातारा होत चाललो आहे. आणि म्हाताऱ्यांच्या डोक्यात कधीकधी काही कल्पना येतात.] “ट्रेशम, ती तुझी लाडकी आहे का?”

“सांगता येणार नाही, इतकी लाडकी आहे.”

“देव तिचे भले करो. पॉलीच्या शांत चेहऱ्याकडे बघत, तो बोलला, “पॉली, हे काही फार नाही. एका आंधळ्या व पापी माणसासाठी एका लहान मुलीला आशीर्वाद देणे ठीक आहे. पण त्याच्या दुष्ट डोक्यात व पापी आत्म्यात --- शाप देण्याइतके दुष्ट विचार येणे शक्य नाही. त्यापेक्षा तो स्वतःच्या गळयात धोंडा अडकवून खोल समुद्रात उडी घेणे पसंत करेल. माझ्या लाडक्या बाळे, जग आणि फुलत रहा!” एवढे बोलून त्याने तिचा पापा घेतला. “मोठी हो. वेळेवर देवदूतांसारख्या मुलांची आई हो.”

त्याने परत तिचा पापा घेतला व चालू पडला.

पण तो वेल्सला गेला नाही. तो कधीच वेल्सला गेला नाही. तो गावात चक्कर मारायला गेला. त्याने तेथील काम करणारे व बागडणारे लोक पाहिले. इकडे तिकडे सर्व ठिकाणी तो फिरला. कारण आता तो बारबॉक्स ब्रदर्स आणि कंपनी होता आणि त्याने हजारो भागीदार त्या एकाकी कंपनीत घेतले होते.

शेवटी बऱ्याच वेळाने तो त्याच्या हॉटेलच्या खोलीवर आला. शेकोटीसमोर उभे राहून, गरम पेय घेऊन, गावातील घड्याळाने टोले दिल्याचे ऐकल्यावर, स्वतःचे घड्याळ त्याबरहुकूम लावत, त्याने संध्याकाळ संपताना पाहिली. बारा वाजले. परत एकदा घड्याळ बघून त्याचे डोळे धुराड्यावरील आरशातील स्वतःच्या प्रतिबिंबाकडे वळले.

हसत तो स्वतःला म्हणाला, "काय राव, आधीच हा तुझा वाढदिवस आहे. तू छान दिसतो आहेस. मी तुझे वाढदिवसाबद्दल अभिनंदन करतो."

यापूर्वी त्याने स्वतःचे असे अभिष्टचिंतन कधी केले नव्हते. गुरु ग्रहाच्या कृपेने, स्वतःच्या वाढदिवसापासून पळ काढणे आता बदलले. ही फोबेला समजावून सांगण्याची गोष्ट आहे. तिला सांगायची गोष्ट खूप लांबलचक आहे. रस्त्यावरून उडी मारून ती गोष्ट न सांगितली जाता पळाली आहे. "मी पुढे जाण्यापेक्षा, मागे जातो. आता मी माझ्या मित्राकडे, दिवे लावणाऱ्या मनुष्याकडे जातो."

तो परत मुगबाय जंक्शनला गेला व तेथे स्थाईक झाला. ती रहायला व फोबेचे आयुष्य उजळवायला, तिला संगीत शिकवून त्याला आनंद मिळवायला सोयीस्कर जागा होती. प्रसंगवशात

कधी पॉलीला आणणे व लोकांना भेटण्यासाठी सर्व प्रकारच्या ठिकाणी जाणे, यासाठी ही सोयीस्कर जागा होती. त्यामुळे तो इथे स्थाईक झाला. त्याचे घर उंचावर होते. शेवटी सार काढायचे तर पॉलीने स्वतःने कदाचित [त्याने नव्हे.] हे ठरवले होतेः

एकदा डोंगरात रहाणारा एक बारबॉक्स होता. आणि तो गेला नसेल, तर तो अजून तिथे असेल.

मुगबाय जंक्शनबद्दल जे पाहिले गेले, ऐकले गेले व कुठल्याच नसणाऱ्या सभ्य माणसाकडून इकडून तिकडून जे गोळा केले गेले, तेच हे सगळे!

# अनुवादिकेची ओळख



## डॉ. वृषाली जोशी

B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे वीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५



ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)




डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके









वृषाली जोशी
विश्वकथा-४

वृषाली जोशी
विश्वकथा१

वृषाली जोशी
विश्वकथा-३

वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI

वृषाली जोशी
विश्वकथा-२

THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


सॉमरसेटमॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
BEFORE
THE PARTY

वृषाली जोशी
THE SHAKESPEARE STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado about Nothing
Twelfth Night






शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक कराल ते पुस्तक उघडेल








## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.

## डॉ. वृषाली जोशी यांचे हे विसावे पुस्तक.

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशातही राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशीच वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतू मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(९), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस

आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (६), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५)असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्य च्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।